हाकारा

वर्ष पहिले । अंक चौथा । ऑक्टोबर-डिसेंबर १९८०

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

कार्यकारी मंडळ

अध्यक्ष	गं. बा. सरदार
उपाध्यक्ष	अनंतराव बोधनकर
	काळूराम दोधाडे
चिटणीस	रा. के. मुटाटकर
सहचिटणीस	जगदीश गोडबोले
	विजय भानू
खजीनदार	अनिल गोरे
सभासद	गोविंद गारे
	श. गो. देवगावकर
	नान्सी गायकवाड
	जनार्दन वळवी
	शरद कुलकर्णी
	थियो रेमिडियोस

सल्लागार मंडळ

बाबा आढाव	जयंत पाटील
बाबा आमटे	विजय परुळकर
रावसाहेब कसबे	अनुताई वाघ
सुधा काळदाते	विलास संगवे
विजय तेंडुलकर	वाहरु सोनवणे
वि. म. दांडेकर	गीता साने
मधुकर देवल	छाया सुरतवंती
चित्रा नाईक	दत्ता सावळे

आ. ना. नारळकर

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता ।

हाकारा



(महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक)

अनुक्रमणिका

संपादकीय २

गोंडी लोकगीतांमधील सौंदर्य आणि वास्तवता
भुजंग मेश्राम ३

सावकारी हिशोब
विठ्ठल एस्. पाडेकर ८

नागवन पेटले आहे
भुजंग मेश्राम १०

विसाव्या शतकात
गंगाधर कुरसंगे ११

माडियांच्या नृत्यगीतातील साहित्य
शैलजा देवगावकर १२

रक्तखिळा
माधव बावने १५

कळसूत्री बाहुल्या, जनसंपर्क आणि जाणीव जागृती
हेमंत कानिटकर १८

माडियांची हस्तकला
श. गो. देवगावकर २१

हर्रे कुमरा
सुखदेव बाबू उईके २३

लोकगीतांची मोहनमाळ
प्रफुल्ल देव २६

ग्रामीण चित्रणात जिवती
धनंजय नाकाडे २९

शिक्षक मात्र पोटासाठी
सुखदेव बाबू उईके ३०

कविता ३०–३१

आदिवासींची वास्तुशास्त्रकला
का. रा. रडे ३३

भारतीय आदिवासी कला
रंजन रॉय ३५

आदिवासी साहित्य व कला
लक्ष्मण कर्वे ३७

ठाकरांची गाणी
प्रदीप गायकवाड ३९

आदिवासी लोकगीते
सिंधुताई अंबिके ३९–४१

पुस्तक परीक्षण
अनिल काळे ४२

संस्था परिचय ४४

संवाद ४६

वर्ष पहिले, अंक चौथा
ऑक्टोबर–डिसेंबर १९८०
वार्षिक वर्गणी : १५ रुपये
या अंकाची किंमत : ४ रुपये
पत्रव्यवहाराचा पत्ता :
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद,
द्वारा : मानवशास्त्र विभाग,
पुणे विद्यापीठ पुणे ७

कार्यकारी संपादक
जगदीश गोडबोले

संपादक मंडळ
रा. के. मुटाटकर
शरद कुलकर्णी
भाऊ मांडवकर

प्रकाशक : प्रा. रा. के. मुटाटकर, सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे यांनी
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे यासाठी
साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०
येथे छापून प्रसिद्ध केले.
मुखपृष्ठ : यशोधर मठपाल

संपादकीय

आदिवासी साहित्य व कला

'हाकारा' च्या प्रत्येक अंकासाठी आम्ही एखादा प्रमुख विषय चर्चेसाठी योजित असतो. त्या अनुसार आत्तापर्यंत आम्ही 'जबरन-जोत' जमिनीची समस्या, आदिवासी व शिक्षण आणि आदिवासी व वन-संवर्धन या विषयांवरचे तीन अंक प्रसिद्ध केले आहेत. वर्षातील या चौथ्या आणि शेवटच्या अंकाचा विषय 'आदिवासी साहित्य आणि कला' असा आहे.

आदिवासींसाठी खास पत्रिका काढताना ज्या स्वरूपाचे प्रश्न अनेकांनी आमच्यासमोर उभे केले होते, तशाच स्वरूपाचे प्रश्न या अंकाचा विषय समोर ठेवताच अनेकांनी केले. प्रतिवादी दोन प्रकारचे व प्रकृतीचे होते. काही मित्रांचे म्हणणे होते की एका बाजूला सर्व शोषितांच्या एकजुटीची प्रक्रिया चालू असताना 'आदिवासी' किंवा 'दलितांचे' साहित्य-कला असा सवतासुभा कशाला ? तर काही मंडळींचे आग्रही प्रतिपादन होते की वास्तविकत: आदिवासी हे हिंदु समाजाचेच अविभाज्य घटक असताना, त्यांचे असे 'वेगळे' साहित्य-कला असूच शकत नाही ! अशामुळे आदिवासींमध्ये फुटीरपणाची प्रवृत्ती वाढीस लागेल !

प्रश्नकर्त्यांच्या प्रामाणिक सद्हेतूबद्दल आम्हाला संशय नाही. पण त्याचबरोबर या व अशा प्रश्नांची उत्तरे 'हो' अथवा नाही, या स्वरूपात देता येत नाहीत. आदिवासी, शोषित समाजाचाच एक भाग असले तरी, समाजाच्या प्रत्येक थरात आपापली अस्मिता असते. एकजूट म्हणजे साचेबंदपणा असे आम्ही मानत नसल्याने, एकतेची जाणीव ठेवूनहि प्रत्येक गटाने आपली अस्मिता, संस्कृति टिकवणे शक्य व आवश्यक आहे असे आम्ही मानतो.

भारतात प्रादेशिक संस्कृतीचे स्वतंत्र अस्तित्व व व्यक्तित्व आहे, त्याचप्रमाणे उच्चजाती, दलित व आदिवासी या संस्कृतीतहि भिन्नता आहे. दलित व आदिवासी, दोन्ही समाज शोषित. पण दोन्हींचे अनुभवविश्व, पर्यावरण वेगळे आहे.

दलित, प्रादेशिक व राष्ट्रीय स्तरावर व्यापक समाजाचे एक पण शोषित अंग म्हणून वावरले आहेत. तर आदिवासी, जंगल, डोंगर-दऱ्यांमधून रहात असल्याने एकंदर समाजापासून अलग राहिले. त्यामुळे त्यांच्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक संघटना व साहित्य-कला भिन्न राहिल्या.

आदिवासींची वाद्ये त्यांच्या परिसरातील वेगवेगळ्या झाडांच्या लाकडांपासून बनविलेली असतात. या वाद्यांवर अथवा तंबाखूच्या लाकडी डब्यांवर कला-कुसर प्रामुख्याने प्रगट होते. नृत्याचा ठेका जंगलातील लयीशी एकरूप होणारा असतो. झोपड्या परिसराशी नाते सांधून असतात. कविता पशु-पक्षी झाडांशी गुंजारव करीत असतात. आदिवासींच्या कथेतील देवीहि त्यांच्या स्त्रियांप्रमाणेच डोक्यावर लाकडी मोळी घेऊन जाणारी असते.

सर्व शोषितांची एकजूट करतानाहि निसर्गात स्वच्छंदपणे बहरलेल्या या संस्कृतीच्या वेगळेपणाच्या वास्तवाचे भान ठेवणे आवश्यक आहे.

आदिवासींच्या स्वतंत्र अस्मितेत फुटीरपणाचे काळे सावट पाहाणाऱ्यांना स्वतंत्र अस्मितेची की फुटीरपणाची भीती वाटते तेच अनेक वेळा समजत नाही. समाजपुरुषाचे सर्व साहित्य विलीन व्हावयास पाहिजे; पण त्याची जाण उच्चवर्णीयांनी निर्मिलेल्या साहित्यासहि हवी. राष्ट्रीयत्वाच्या नवीन गरजा पुढे येत असताना विलिनीकरणाचा अर्थ दलित-आदिवासींनी आपल्या संस्कृतींना निकृष्ट ठरवून उच्चवर्णीयात विलीन व्हावे असा होत नाही. याविरुद्ध बंड करून उठलेल्या दलितांच्या जागृत अस्मितेचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्यात दिसू लागले आहे. आदिवासीहि 'नागवन पेटले' असल्याची जाणीव आपल्याला देत आहेत !

(पृष्ठ ४८ वर पहा)

गोंडी लोकगीतांमधील सौंदर्य आणि वास्तवता



भुजंग मेश्राम

प्रत्येक संस्कृतीचा इतिहास हा येणाऱ्या पुढील काळात अनेक कारणांसाठी आवश्यक असतो. हा इतिहास चिरंतन ठेवण्याचे काम साहित्यहि करते; परंतु ज्या संस्कृतीला असले माध्यम नाही किंवा असूनहि त्या संस्कृतीच्या लोकांची त्या माध्यमाशी काही कारणांनी तोंडओळख नसेल, तर तिथे इतिहास जोपासून संस्कृती टिकवण्याचे काम रूढी, परंपरा, दंतकथा-लोककथा आणि लोकगीते करीत असतात.

गोंडी संस्कृती ही वेदपूर्व संस्कृती होती हे आता सर्वमान्य झालेले आहे. मतभेद आहेत ते फक्त गोंडी लीपीबद्दल. लिपीचा हा वादग्रस्त मुद्दा सोडला तरी गोंडी संस्कृती अजूनहि पुष्कळशा प्रमाणात मूळ स्वरूपी आहे. ही संस्कृती टिकवण्यासाठी लोकगीतांनी महत्त्वाचे काम केले हे नाकारता येत नाही.

प्रस्तुत लेखातील लोकगीते ही मराठवाड्यात किनवट तालुक्यातील, आंध्र प्रदेशात अदिलाबाद जिल्ह्यातील व विदर्भात अमरावती जिल्ह्यातील गोंड लोकांमधून मिळवलेली आहेत. भौगोलिक व भाषिकदृष्ट्या ही बाब महत्त्वाची आहे.

किनवट तालुक्यात आंध्र-सरहद्दीवरील गोंडीमध्ये ही लोकगीते मोठ्या उत्साहात गाईली जातात. ही लोकगीते प्रामुख्याने गोंडी देवदेवतांची असल्यामुळे त्यांच्या धार्मिक जीवनाचे प्रतिबिंब त्यात स्पष्ट दिसते. पेरसा पेन ह्या देवाबद्दल एक गोंडी लोकगीत प्रसिद्ध आहे. हंगामातील कार्तिक महिन्यात जेव्हा ह्या देवाचा महोत्सव साजरा होतो, तेव्हा गोंडी स्त्रिया सामुहिकपणे हे गीत नाचत म्हणतात :

'मावी पिडांग याया मावी गुडांग याया वोरें सुडाना
अहतरे सम्दोर याया कोया वावरे बती ऊडांना'

आपली ही दुःखे आणि गावे बाई त्या मोठ्या देवानेच बघावी आणि सांभाळावी आपण सर्व उपेक्षित असलो तरी मात्र आपल्या संस्कृतीचे भरघोस पीक घ्यावे.

देवाची प्रार्थना थोडीहि ढळू न देता धार्मिक गीतांमधूनही वेदना व्यक्त करणारे गोंडी लोकगीत हे एक साधन बनते.

उपेक्षित असूनहि आपली संस्कृती टिकवण्याची धडपड ही जाणीवपूर्वक आहे. 'संस्कृतीची शेती' सारखी प्रतिमा आणि त्याला लय, ताल व नृत्याची जोड मिळाल्याने गीत अधिक उठून दिसते.

'जाग्लो किसीकुन पंडूसिकाट कोयाखोम मावी हाकव्दे
खोम जोनो याया पंडी पंडार बतों आंदीमाकून तुडाना'

आपण सारे जागरण करू या. आपल्या कर्तृत्वाने नीतीचं पीक पिकवू या, ह्या पिकवलेल्या पिकाची मळणी करण्याआधी मात्र आपण स्वतःला तपासून घ्यावे. आपली ही दुःखे आणि गावे त्या पेरसा पेननेच बघावीत आणि सांभाळावीत.'

'जागरण' आणि 'नीतीचं पीक', या प्रतिमांनी पुन्हा गीताचे सौंदर्य वाढले आहे. आपली संस्कृती जोपासतांनाच स्वतःचे परीक्षण करण्याची भाषा पवित्रतेचे, मंगलतेचे पापुद्रे उघडत जाते. ती जागरूकतेचाही आग्रह धरते.जागरणाची जाणीव ही सामाजिक जाणीव-ही जाणीव इथे व्यक्तीगत नसून सामूहिक आहे. गोंडांच्या धार्मिक जीवनातील सामूहिकता ह्यातून स्पष्ट व्हावी.

'आंदीं येत्काट आटा–पेन येतार झेंडा–मा येंडींपंदा नावीर इंदाना याया–रंडे दिनम इद माया–कवाना आडाना'

आपल्या निर्मळतेबद्दल देवाने जाब विचारण्या-आधीच आपण संस्कृतिनिष्ठ राहण्याची शपथघेऊ या. सर्वांना आपण आपलेच मानावे ग सखे. कारण दोन दिवसाचे आहेत हे वारे. कधी रडावे कधी हसावे. आपली ही दुःखे आणि गावे त्या पेरसा पेननेच बघावी आणि सांभाळावे.'

'पेरसा पेन' म्हणजे सर्वांत मोठा देव. 'पेरसा पेन' हा निसर्गाचा प्रतिकात्मक शब्द आहे. कारण हा देव बांबूच्या काठीला बरछी आणि रानगाईच्या शेपटीचा गोंडा यांनी सजवलेला असतो. शिवाय रानातच असतो, परंतु 'पेरसा पेन' म्हणजे महादेव का ? ह्या प्रश्नावर बरेच मतभेद आहेत. गोंड लोक मात्र 'पेरसा पेन'ला व महादेवाला वेगवेगळे पुजतात आणि बांबूची काठी व रानगाईचा गोंडा महादेवाचे प्रतीक नाही. शिवाय शंक-राचेच दुसरे नाव महादेव समजले जाते तर गोंडांच्या मतानुसार निसर्ग म्हणजेच मोठा देव. म्हणजेच हे दोन्ही देव भिन्न तरी असावेत वेदपूर्व परंपरेत त्यांचा कुठे तरी संबंध असावा. ह्याला श्री. शं. बा. जोशींची पुस्ती जोडता येईल. महादेव हा पूर्वीचा आदिवासींचा देव होता. परंतु कालांतराने तो आर्यांनी उचलला. (१) आदिवासींवर लिहिणाऱ्या समाजशास्त्रज्ञांनी महादेवा बद्दल सविस्तर सखोल लिहिलेले नाही. महादेव कोळ्यां-वर लिहिणारे डॉ. गोविंद गारे ह्यांनी सुद्धा. यामुळे अलीकडील कांही संशोधक आदिवासी निसर्गपूजक होते हे मान्य करून आता ते हिंदूंचे सण साजरे करतात, म्हणून ते 'मागासलेले हिंदू' होत असा युक्तिवाद कर-तात. (२) ते कोण आहेत हे ठरवण्याठी सण किंवा संस्कृतीकरण हेच निकष लावले जात असतील, तर आज मुंबईमध्ये जे पाश्चिमात्यकरण सुरू आहे त्यांचे काय ? आपण त्यांना 'मागासलेले पाश्चिमात्य' म्हणू. असली निकषे लावणारे संशोधक ह्या मताशी सहमत होतील काय ? हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

आपल्या गोत्राची पूजा करताना गोंडी संस्कृतीच्या आद्यपुरुषाची पूजा केली जाते. पहांडी–कोप्पा लिंगा. साधारण सगळीकडे हे गीत प्रचलित दिसते.

मटावेलये लिंगा रो–चोहोय नि तुंगारो ॥
कोयाते खोमनी मिमेरा भोण्यानी–भोण्यारा
तोडो ते तोडो रो सातापे बारी रो ? तोडो रो
हाभार वाडाना, दहान वाडारो ॥ १ ॥
नालुंगे झेंडांगे, नालुंगे गुडांगें–किती नालूंगे
नालुंगे यादीगे, नालूंग जुगांदिग–किती नालूंगे
हाभाडून वाता मेदूंडे, चकोट बा बारा रो ॥ २॥

(डोंगरदऱ्या हिंडणाऱ्या हे लिंगा, तू आमच्याकडून तुझा जयजयकार स्वीकार कर. गोंडी संस्कृतीचा तूच उद्गाता आहेस, निर्मिक आहेस. आमच्या समाज-जीवनाची माती रखरखीत व ओसाड झाली आहे. आभाळ सांडावा तसा ह्यावर तुझ्या कृपेचा वर्षाव कर. ... आमच्याकडून तुझा जयजयकार स्वीकार कर'

'तूच आमच्या देवांचे चार गोत्रसमूह निर्माण केले आहेस. चार झेंड्यांची प्रतीके सुद्धा. लिंगा आभाळाला आता पुजाऱ्यासारखे अंगात आले आहे. तेव्हा तू विजेच्या रूपात गायन कर आणि आमच्या जयजयकाराचा स्वीकार कर)

लिंगपूजा हा प्रकार गोंडी संस्कृतीमध्ये आजहि पाहायला मिळतो. पहाडी कोप्पा लिंगाबद्दल बऱ्याच दंतकथा व गीतें प्रसिद्ध आहेत. त्या विस्तारभयास्तव इथे देत नाही. फक्त काही संबंध दाखवण्याचे धाडस मी करीत आहे.

अगदी प्रथम भारतात आलेले वेदीक लोक शिश्न-देवाच्या पुरुषाच्या लिंगाची पूजा करणाऱ्या लोकांबद्दल तुच्छतेने उल्लेख करीत. (३)

लिंगपूजेबद्दल श्री. प्र. रा. देशमुख यांनी 'सिंधु संस्कृतीः ऋग्वेद व हिंदू संस्कृती' ह्या ग्रंथात बरीच चर्चा केली आहे. (४)

–'आर्यांच्या शत्रूंची तुच्छतादर्श व उपहासात्मक जी नावे ऋचांतून आली आहेत त्यात 'शिश्नदेवा असेही संबोधले आहे. शिश्न म्हणजे लिंग. लिंगपूजा दर्शवणारा 'शिश्नदेवा' हा शब्द वेदातील ऋचांतून आला आहे.

'न यातव इन्द्र जूजुवुर्नो न वन्दना शविष्ठ वेद्याभिः।
स शर्धदर्यो विषुणस्य जन्तोर्मा शिश्नदेवा अपि गुर्ऋतंनः ॥ (ऋग्वेद ७–२१–५)

(हे बलशाली इंद्रा, जादुविद्या जाणणारे (आमचे शत्रु) आपल्या विद्येने आमचा नाश न करोत. शिश्नदेव आमच्या यज्ञावर मात न करोत.)

हे लिंगपूजक म्हणजेच नंतरचे शिवपूजक नव्हेत असे बऱ्याच प्रभृतीचे मत आहे. शैव पंथ हा वैदिक संप्रदाय

असणे शक्य आहे असे कोणी म्हणू शकतील. वेदातील शिस्नदेवा, (५) ह्या वाक्यात लिंगपंथीयांविषयी तिरस्कार ध्वनित होतो असे पुष्कळ आधुनिक विद्वानांचे मत आहे. लिंग शब्दाची उत्पत्ती संस्कृतात मिळत नाही. तो शब्द एशियाटीक भाषेतून आला असे काही विद्वानांचे मत आहे.

शिव व लिंग हे एकच अशी कल्पना अजून बरीच सार्वत्रिक दिसते. मोहंजोदारो, वगैरे ठिकाणी मिळणाऱ्या लिंग व योनी प्रतिकांचा संबंध शैव पंथाशी लावण्याचा प्रयत्न बऱ्याच विद्वानांनी केला आहे. मुळात हे दोन्ही पंथ निराळे असून कालक्रमाने त्याचा समन्वय करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. (६)

लिंगाच्या आकाराचे अनेक दगड हरप्पा उत्खननात उपलब्ध आहेत. हे तेथील लोकांचे देव असावेत असा साधार तर्क आहे. (७)

मोहंजोदारो हरप्पा येथील लिंगपूजेचा संबंध गोंडी संस्कृतीतील पहाडी कोप्पा लिंगाशी लावता येईल का? अर्थात. लिंगपूजेच्या उत्पत्तीवरून दिसणारे साम्य आपणास विचारात घ्यावे लागल्यास त्यात वाईट काही नाही.

आजही आंध्र-पट्टीवरील (प्रामुख्याने) व सर्वसाधारण सगळीकडील गोंड अभिवादन करताना 'चोहोय लिंगो' म्हणतात. चोहोय म्हणजे 'जय होवो.' 'लिंगाचा जय होवो' असा अर्थ ह्यातून निघतो. ह्यावरून खरी लिंगपूजा कशी असू शकते ह्याचा प्रत्यय येतो. प्रजननाची व प्रजजनवादाची मूळ कल्पनाच लिंगापासून निघाली आहे (८) ज्या लिंगामुळे मानव निर्माण होतो अशा लिंगाची पूजा करणे हा तत्त्वाचाहि भाग असू शकतो. ही भौतिकवादी विचारसरणी म्हणूनसुद्धा संबोधता येईल.

आणखी एक मुद्दा राहिला. दुसऱ्या कडव्यात ४ गोत्र केल्याचा उल्लेख आहे. पहांडी कोप्पा लिंगाने एक वेळ त्यांच्याच ४ टोळ्या केल्या असा उल्लेख गोंडी दंतकथा मधून येतो. ती विभागणी अशी ४–५–६–७ म्हणजे गोंडांचे देव फक्त २२. ह्यातूनच चार गोत्रसमूह निर्माण झाले हे स्पष्ट आहे. तरी पण डॉ. सोहनलाल चूडामणीसारखे विद्वान २२ देवात पुन्हा ११ देव मिळवून ३३ देव झाले असे प्रतिपादन करतात. (९) परंतु ते स्पष्टीकरण देत नाहीत. आणखी कुणी ३३ देवांचा ३३ कोटी देवांशी संबंध लावू शकतील. मात्र ते विसंगत व खोटे होईल.

केसलागुडा ह्या गावी भरणाऱ्या गोंडांच्या जत्रेविषयी लोकगीत प्रसिद्ध आहे.

'पुस जंगो रो पुस जंगो रो
निंदा लाता–गाडो पुहा–नागोबाना केसलागुडा
केसला केडा रो केसला केडा रो
मिडचा लाता निम सुडा–नागोबाना केसलागुडा
कान्याल तोडो रो कान्याल तोडो रो
नेर्सा लाना तनया पुत्ता–नागोबाना केसलागुडा
तनवा तड रो तनवा तड रो
उसार बिस्तार निम सुडा–नागोबावा केसलागुडा
नागोबाल रो नागोबाल रो
सिनुर याडी किम पुजा–नागोबाना केसलागुडा

पुस नक्षत्राचा चंद्र भरत आला आहे. मित्रा, तू केसलापूरच्या यात्रेला जाण्यासाठी गाडी जुंपून तयार हो.

केसल्याच्या झाडांचे वन कसे चंद्रप्रकाशात चमकत आहे बघ ना, सगळा केसलाअरण्य कसा न्हाऊन निघाला आहे!

ह्या काळचाशार भूमीने आपल्या संस्कृतीची वारुळे जपून ठेवलीत. चल तर, सगळा केसलागुडाच वारुळमय झालाय.

नागोबाच्या दर्शनासाठी जाताना आनंदाच्या पावसात तुझ्या काळजाला पूर येईल. तेव्हा एक कर, केसलागुडाच्या नागोबालाच न्हाऊ घाल.

आता नागोबाच्या यात्रेला जातच आहेस तर तनमनाने त्याची पूजा कर. समृद्धी देणारा तो आहेच.

नागोबा हा गोंडाचा देव. तो त्यांचा मूळचा देव असावा. श्रीमती इरावती कर्वे म्हणतात. 'पश्चिम विंध्य व सातपुडा प्रदेशातील गोंडलोक नागवंशाचे वंशज तर नव्हेत ना अशी शंका येते. कारण ह्यातील बरेच लोक नागाशी संबंध दाखवतात.

गोंडी संस्कृतीत 'धनेगुडा' हे नाव प्रसिद्ध आहे. इथेच गोंडी संस्कृती होती. मात्र ह्या ठिकाणाचा पत्ता अजून लावता आला नाही. मात्र त्याबद्दल माहिती एका लोकगीतातून मिळते:

'फरो फाटार फरो फाटार धनेगुडा
वुत्ता मावा कोयतुरा ।। १ ।।
थडी येताल मुने सुडा
नालुंग सगाना धनेगुडा ।। २ ।।

नार दोहतोर नार दोहतारें मा लिंगाल
पियासी पेन्क रंगेंदा ॥ ३ ॥
तोडी कितोर तोडी कितोर पेटीतलासी
वुर्सी वंजीना रो अरा ॥ ४ ॥

(वरपर्यंत पठार आहे तिथे धनेगुडा वसलेले आहे. सगळा पठार गुड्यातील घरांनी भरलेला आहे.

जवळून वाहणाऱ्या नदीच्या काठावरून जरी तू पाहिलेस तरी, चार गौत्रांचे ते नगर तुला दिसू शकेल.

हे गावत्या पहाडी कोप्पा लिंगाने २२ देवांना घेऊन बांधलेलं आहे. त्यांच्याच हातांची ही करामत बघ.

हे नगर वसवल्यावर त्यांनी पोटासाठी जमीन जवळ केली व त्यात तांदळाचे रोपटे लावले, ज्यामुळे आजपर्यंत आपण आलो आहोत.)

गोंडजमात कुठे कुठे आहे तिथे तिथे धनेगुडाबद्दल कथा, गीते आहेत. ह्याचा अर्थ धनेगुडा नावाचे ऐतिहासिक स्थान असले पाहिजे. वरपर्यंत पसरलेले पठार, जवळून वाहणारी नदी, २२ देवांनी केलेले काम, शेतीची सुरुवात व भाताचे पीक हे सगळे वर्णन चमत्कृतिपूर्ण आहे. धनेगुडचाच्या ह्या वर्णनाशी व इतिहासाशी मिळतेजुळते वर्णन मात्र अजून कुठे मिळालेले नाही. काही गोंड ते नगर दुसरे तिसरे कोणते नसून माहूरच होते असे सांगतात. आजहि काही भागातील गोंड-डंडारीची सुरुवात माहूरच्या पांडव-लेणी नामक प्रचलित असलेल्या गुहेपासून करतात व तिथेच समाप्ती करतात.

गोंडामधील जंगोबाई ह्या देवतेच्या समारंभातील असेच एक लोकगीत फार प्रसिद्ध आहे.

' झवूर झवूर वडीवाता झल्झुल मिड्या लाता
नलेंज सिकाटीते
वटवतांम हे जंगोबाई तरा नि कुही
वर जो लहाकिते
ढोढेरा मरा नेंड आता कोया मरा निड्ये
पिडींतांग डूवेंग मिड्या लातांग ढोंढेरा
आकी-आकीते !

(झुळझुळ वारा वाहात आहे आणि अंधारात एक तारा चमकतो आहे. अशा सजीव रात्री आम्ही तुझ्या कृपेशिवाय तहानलेले आहोत. हे जंगोबाई ! तुझ्या कृपेची विहीर लवकर उघड, आम्ही आता आतूर झालो.

तुझ्यामुळेच ह्या आपटयाच्या झाडाला महत्त्व आल्याने ते आमचे छत्र बनले आहे. कणकेवरील दिव्यांच्या प्रकाशात आपटयाचे पान न् पान आता धुऊन निघाले आहे.)

ही जंगोबाई म्हणजेच चंद्र. चंद्राला गोंडात स्त्रीलिंगी देवता मानले जाते. ह्यावरून सूर्यदेव, चंद्रदेवता अशा त्यांच्या निसर्गदेवतांची कल्पना स्पष्ट होण्यासारखी आहे.

मृगनक्षत्राच्या मुहूर्तावर गोंडलोक धरतीमायची ओटी अशी भरतात. (१७)

सोनेता तिफून हिराना जाडा ।
चांदीता कासरांग संतांग ।
संगलोड्लो मळमिना जोडा ।
पोहराना सरता विटा ॥
मोतींना कळोपने येद्दाना मोहतुर
धरुतरींना ओटीं निहता ॥

(सोन्याच्या तिफणील चांदीच्या कासऱ्यांनी हिऱ्याची धुरा बांधिली आणि लग्नाच्या माझ्या अर्धांगीने पेरणीची सुरुवात मुहूरांच्या सरत्यातून करून मोत्यांच्या ओंजळीने धरतीमायची ओटी भरली.)

पेरणीनंतर पिके निघतात. शेत पिकांच्या भरतीने नाचू लागते. हा आनंद गोंडलोक गीतातून व्यक्त करतात— (१२)

' मोटेरा मोट पारंग जियाल ।
वळीं नेकाल पिलम पोया ॥
तला मिसे मिचके कियाल ।
कन्क मिर्चांन पदो ॥
सिपीसेरभा नींक मुकदीरा ।
कोई कुयवान सहाबार ॥ '

(मोटेच्या पाण्याने ढोलकीचे बोल उमटले. वाऱ्याने बासरी छेडली अन् जमिनीत डोके खुपसून लपलेल्या लसणाने छछोर मिरच्यांवर डोळे मिचकावले. हे संगीत देवता ! तुला आम्ही वंदन करतो, तुझ्याकडून आशिश मागतो.)

गोंडलोक 'डोंडेंरा पेन' किंवा जलदेवतेचीही आराधना करतात.

' सरंगर सिलकाना ऊंदी कु रे रे ।
सरंगर कुरेकंना उन्दी झोळी ॥
सरंसर झोळीना उन्दी समदुरे ।
सरंगर समदुरता डोंडेरा याले॥
आपीने बा येर तुंगांना ॥ '

(साठ पाझरांचा एक झरा. साठ झऱ्यांची एक

नदी. साठ नद्यांचा एक समुद्र. साठहि समुद्र जिने सामावून घेतले. त्यात आपण बा आंघोळ करावी.)

जलदेवता ही गोंडांची निसर्गदेवता. ही निसर्गदेवता पाझरांपासून समुद्रापर्यंतच्या उत्क्रांत प्रतिमांमधून व्यक्त होते. ती व्यक्त होतानाच धार्मिक संस्कारांच्या विकासाचे स्वरूप सांगते ह्याला महत्त्व आहे. आपल्या भौतिक जीवनातील निसर्गदेवांच्या श्रद्धेमधून वास्तवता कशी व्यक्त करता येते ह्याचा प्रत्यय गोंडी लोकगीतांमधून येतो. म्हणजे एकाच पातळीवरून सौंदर्यदृष्टी आणि त्यातून ओसंडणारी मुकी वास्तवता गोंडी लोकगीतांत साकार होताना दिसते.

संदर्भ :

१. मऱ्हाटी संस्कृती : काही समस्या, शं. बा. जोशी, पृ. १११.

२. The Sheduld Tribes–G, S. Ghurye p. 3,29,59.

३. हिंदू समाज : एक अन्वयार्थ (प्रकरण आचारातील विविधता) इरावती कर्वे, पृ. ५.

४. सिंधुसंस्कृती, ऋग्वेद व हिंदुसंस्कृती– प्र. रा. देशमुख, पृ. १६८.

५. मऱ्हाटी संस्कृती : काही समस्या, शं. बा. जोशी, पृ. ११३.

६. मऱ्हाटी संस्कृती : काही समस्या, शं. बा. जोशी पृ. ११२, ११५.

७. सिंधु संस्कृती : ऋग्वेद व हिंदु संस्कृती, प्र. रा. देशमुख, पृ. ७०.

८. सिंधु संस्कृती : ऋग्वेद व हिंदु संस्कृती, प्र. रा. देशमुख, पृ, १६८.

९. गोंड समाजकी सांस्कृतिक पृष्ठभूमी–डॉ. सोहनलाल चूडामणी,, वन्यजाती जुलै, १९६८, पृ. ११५.

१०. मराठी लोकांची संस्कृती–इरावती कर्वे, पृ. २२५.

११. गोंडांची आदिम दैवते, सा. विदर्भ समाचार, पृ. ३.

१२. गोंडी भाषेतील वाङ्मय–व्यंकटेश आत्राम, नव भारत, सप्टेंबर १९७९, पृ. ३७.

‘ हाकारा ’

दलित-आदिवासींच्या प्रश्नामध्ये आपल्याला आस्था आहे. ‘परिषद’ व ‘हाकारा’चे वर्गणीदार होऊन आपण या सामाजिक ‘हाकाऱ्या’त सहभागीहि झाला आहात. आपला सक्रीय सहभाग कायम राहील याची खात्री आहे.

हाकाराची १९८१ सालची वर्गणी रुपये पंधरा अथवा हाकारा व परिषदेची संयुक्त वार्षिक वर्गणी रुपये वीस कृपया पुढील पत्त्यावर पाठवावी.

महाराष्ट्र मानव-विज्ञान परिषद,
द्वारा मानवशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे ४११ ००७.

–संपादक

सावकारी हिशोब

विठ्ठल एस. पाडेकर



'बाय धनजीशेठ हाय का घरात ?'... चैत्यानं ओटीवरूनच धनजीशेठच्या बायकोला हाक दिली. घरातून बाहेर येत शेठच्या बायकोनं विचारलं– 'कोन रं ! कोन हाय ?'...' मी हाव चैत्या. ' चैत्यानं घाबरत खालच्या आवाजात उत्तर दिलं– ' जरा पैसं मागायच व्हतं ...'

आषाढ-श्रावणातले दिवस होते. गेल्या सात-आठ दिवसांपासून चैत्या, चैत्याची बायको, पोरं अक्षरशः कंदमुळं, झाडपाल्यावर होती. त्यातच थोडी जाणती दोन पोरं तापानं फणफणायला लागली. चैत्याची बायको पोरांकडच गुंतून राहिली. चैत्या एकटाच मजुरीला जायचा. एकट्याची मजुरी ती किती ?... एक पायली (७०० ग्रॅम तांदूळ=१ रुपया) एवढ्या सहा-सात माणसांचे या एका पायलीनं काय होणार ?

आता कंदमुळं, झाडपाला आणायला देखील कोणी राहिले नव्हते. अगदी उपाशी मरायची वेळ आली होती. चैत्यानं एक दिवस धनजीशेठकडून व्याजानं पैसे घ्यायचे ठरवून सकाळीच शेठच्या घराचा रस्ता धरला.

उगीचच सतवायचं म्हणून धनजीशेठची बायको म्हणाली– ' पण आम्हा पायी पैसं निही मिलं. कितीक पायजेल व्हतं ?' नाराजीच्या सुरात चैत्या उत्तरला– ' थोडक, दोन-एक इसा ' (चाळीस) ... ' कयाला पायजत ?

चैत्यान त्याची व्यथा सांगायला सुरुवात केली. ' गेल्या दहा दिसांपासून घरात काही निही मिलं. त्याच्यात दोन पोरं तापानं जाम फनफनल्यात. धड रोजालाहि जाता येत निही न काही निही–
अगदी उपासी मरायची येळ आली. काय बी कर. पन येवढी गरज भागवा ..'

धनजीशेठच्या बायकोला आता समजलं होतं बकरा चांगलाच फासात अडकलाय. त्याच्यावर कशीहि सुरी चालवली तरी नको म्हणणार नाही. सावकारीणबाईन आता सावकारी हिशोबाला व डावपेचांना सुरुवात केली–

' पैसं तर खरांच निही मिलत, पण ' हे; आल्यावर करतील काही तरी, पालघरा गेल्यान. तांव बस !'... चैत्या बसू लागला तोच सावकारीणबाई अधिकाराच्या सुरात म्हणाली...'चैत्या शेठ येत तांव एक काम कर– ' ह्या अथ ऽऽऽ घोण्यावर (आढ्यावर) गलतय जरा. जंगलातून सागाच्या पानांचा पुडा आणून देस. ही घे कोयती. '

कालपासून चैत्याच्या पोटात अन्नाचा कण देखील गेला नव्हता. त्यात घरी पोरांची ओढ लागली होती. तरीपण तो नाही म्हणू शकला नाही.,गुपचुप उठून जंगलाचा रस्ता धरला.

बाराएक वाजेपर्यंत सागांच्या पानांचा पुडा चैत्यानं घरी आणून टाकला. तेवढ्यात धनजीशेठ आले.चैत्याला बघून विचारले– ' क्या रं काय काम आनल ?' चैत्यान केविलवण्या सुरात त्याची व्यथा ऐकवली. पाय धुता धुता शेठनं बायकोचेच शब्द उच्चारले... ' पण पैसं निही मिलत. बर बस, जेवतो तांव, मंगा सांगतो काय ते ..' असे म्हणत शेठजी घरात निघून गेले.

चैत्याला आता भूक अनावर होत होती. त्यान शेठच्या एका मजुराकडून तांब्याभर पाणी मागवून घेतलं. पाणी पिऊन तसाच दम धरून बसला. अर्ध्या पाऊण तासानं शेठजी ढेरी चोळीत बाहेर आले व ढेकर देऊन बोलू लागले– ' चैत्या पैसं खराच निही, पण तुझ्या काकीसनं शब्द दिलाय, तिचा शब्द म्हंजी माझा

शब्द. आज तू निही मिलत पण उद्या काही करी करन. उद्या ये ... पण चैत्या रिन घेतान बेस वाटतं पण देतानं फार जिवावर येतं. तुला मी देतांव पण तू परत कसं फेडसील, असा, दोन एक खाचर आवल्याय का निही ?'

पैसे मिळण्याच्या आशेनं चैत्या थोडचा हुशारीनं म्हणाला...' हां...आवल्यात ना दोन एक.' मंग तू मला इस (२०) रुपये मणानं दोन मण कोणब्याचं भातच दिऊन टाक.' चैत्या काहीहि विचार न करता 'हो ! हो, देन.' म्हणाला. 'मंगा उंद्या न्याहारीच्या वक्ताला ये, चैत्या जाण्यासाठी उठू लागला तोच शेठ हुकमी आवाजात म्हणाला...' घोण्यावर एवढी पानं दाबून देस, मंगा जाय, हाँव !'

चैत्यानं गुपचुप घोण्यावर पानं दाबली अन् चार-पाच वाजता घराकडे परतला. आता भुकेनं चैत्याचे पायात पाय गुंतत होते. शरीराचा तोल जात होता.

पैसे देण्याच्या आधीच शेठनं सावकारी हिशोबानं चैत्याकडून (दिवसभर काम केल्याची मजुरी) ३ रु. वसुली केली होती.

दुसऱ्या दिवशी चैत्या न्याहारीच्या वेळेवर आला. शेठजी खुर्चीत रेलून बसले होते. 'राम ! राम ! शेठ' म्हणत चैत्या ओटीच्या कडेला खांबाला टेकून बसला. चैत्याजवळ काही नाही हे बघून शेठ म्हणाला– 'असा रिकाम्या हातानं कोठं काम होत असतं निहीर !' चैत्या काय ते समजून म्हणाला– 'पैस निही मिलं रं शेठ !' 'मंगा असा सांगना' म्हणत शेठनं खिशात हात घालून नेमके तीन रुपये काढून म्हणाला, हे घे तुला देयाचं त्याच्यातलं... जा घेऊन ये.'

चैत्या बाटली घेऊन आला. त्यातली एक–दोन घोट चैत्याला देऊन बाकीची शेठनं आपल्या घशात लोटली. दारू पिऊन झाल्यावर चैत्याला म्हणाला तुझी काकीस घरा निही मिलं, आता कव्हा येल कोण जाणं अता असां करं ! उद्याच ये ! उद्या नक्कीच देन. ह्याच वक्ताला ये !'

चैत्याचा नाइलाज होता, तरी तो थोडा हुशारीनं बोलला 'शेठ काय बी कर, पण उद्या नक्कीच दे, हाँव. भात पिकल्यावरोबर कोनब्याचं दोन मण घरा आणून देन.' पैसे देण्याच्या आधीच धनजीशेठच्या सावकारी हिशोबानं आणखी तीन रुपये वसुली केली.

दुसऱ्या दिवशी चैत्या पुन्हा त्याच वेळेवर आला.

कालच्या बाटलीचे तीन रुपये कापून घेऊन ३७ रु. चैत्याच्या हातावर देत शेठ मोठ्या रुबाबात चैत्याला फुशारकी सांगू लागला– 'आपु एखाद्याला शब्द दिला म्हंजी दिला, कंधी माघारी घेयाचा निही ! खरा का निही ?' म्हणत चैत्याकडं बघितलं. 'व्हय शेठ तुम्ही म्हणजे देवमानूस.' 'आरं पण चैत्या एखांदी आनता त बेस व्हता. जाय घेऊन ये.' चैत्यानं पुन्हा एक बाटली आणली. पैसे हातात देताच शेठच्या सावकारी हिशोबानं आणखी ३ रुपये वसुली केली.

शेठनं चैत्याला पुन्हा बजावलं– 'चैत्या, पण परत कराया तुझ्या घरा हेलपाट माराया लावू नको, हाँव ! तुमची लोकां फार व्याट. तुमच्या लोकानला पैसं द्यावं निही, तुला म्हून देतांव.'

'निही, निही शेठ, तुझ्या घरा पोच आणून देन, मंगा त झालं.' म्हणून चैत्या जाण्यासाठी उठू लागला तोच शेठची बायको चैत्याला म्हणाली– 'अरं, काकडीचं दोन एक येलं लावल्यात का निही.' चैत्यानं झटपट उत्तर दिलं, 'लावल्यान, क्या ?' 'मिह्यानं लावेल व्हतत् तसच गेलं. काय झालं कोण जाणं. दोन एक काकडचा, ना काही भाजी हवी वाडात, तू राहून देस आमच्यासाठी.' चैत्यानं तेही मान्य केलं.

अजून सावकारी हिशोब पूर्ण झाला नाही म्हणून की काय शेठ आणखी त्याच्याकडून बाँड करून घेऊ लागला– 'अरं दोन–एक पिलोटी (कोंबडचा) राहूं दे, हाँव ! एक दिस अंबट (रस्सा) करून प्यावा म्हणतो. एक दिस येन न्याला, दे हाँव !' चैत्यानं कुठलेहि आढेवेढे न घेता हेहि मान्य करून टाकलं. जणू चैत्याला 'नाही' हा शब्दच माहीत नाही.

आजपर्यंत धनजीशेठच्या सावकारी हिशोबानं रोख ९ रुपये वसुली झाली. आणखी दोन मण भात, काकडी, भाज्या, कोंबडचा इत्यादींचा चैत्याकडून करून घेतलेला कबुली जबाब.



नागवन पेटले आहे

ह्या घनदाट अरण्यामधून जाणारे सगळेच रस्ते
वळणदार एकमेकांना छेदणारे
संपूर्ण वनदेहावर कायम त्या बेरजांची ऋसी नागचिन्हे
एकटा सूर्य वगळला तर सगळेच मोसमी पक्षी
येऊन गेलेत इथल्या ओल्या फांद्यांवर.
त्यांच्या पायातील एकेका प्रकाशबीजाने कदाचित
भरली असती अंधाराची घागर आणि
मांडला असता नागवृक्षांच्या खांद्यांवर त्यांनी
डोळ्यांचा जागर.
ज्यांच्या डोळ्यांवर असतात सर्वच क्षितिजांची स्वप्ने
मात्र त्यांना जमत नसते हे.
किंवा जमल्यास ओळखता येत नाहीत वारे.
शिडाच्या जहाजागत बिच्चारे सगळे.
कोठेहि कसा दिसत नाहीये मला पहाडी कोप्पालिंगो
किंवा त्याच्या उद्ध्वस्त गुहांची नगरे.
फक्त आकाशफांदीवर तेवढी उरलेली ही
नागडोळ्यांची अप्रक्षिप्त झुंबरे.
हिरव्या रानांची जाणिवदार कुरणे असतात सदैव
पोसीव, पहाडाच्या काळजासाठी.
कुठलासा काळा गायकी कुठला दानमहिमा
हातात नाचते रानहाडी बासरी.
स्मृती चाळल्यागत जुने घास लाळत जिभेवर
रानभर पसरत जातात ह्या बेदरक्ताच्या
रवंथदार गाई.
अख्खी कुरणें कशी करपत जातात त्यांच्या तोंडी.
किंवा काती म्हणून बाजारात येतात ह्या
झाडांच्या साली.
प्रादेशिक बातम्या, गॅझेट आणखी बरेच काही...
पुंगीवर नाचवल्यागत उजेडी युक्त्या त्यांच्या.
आणि भर उन्हात मस्त राबतात
विकासाच्या नर्सऱ्या.
उद्ध्वस्ता, आपलीच प्रेते आणि आपल्याच मोळ्या.
गच्चदार आभाळल्या रात्रीतून ह्या जंगलाचा वारुळ
चिर्रर्र पोखरत जातोय.
गुंफांची दारे उघडताना रानवारा कसा सळसळतोय.
इतक्या युगांनी त्याला त्याचे रक्त पटले आहे.
आता नागवन पेटले आहे.

—भुजंग मेश्राम

विसाव्या शतकात

या विसाव्या शतकात सुद्धा
मला उंबरठ्यावर नाही जागा
ऐकतो हल्ली तुळशीला सुद्धा
रजस्वलेची चालते सावली
कारण म्हणे,
जग फार पुढं गेलंय् !

या विसाव्या शतकात सुद्धा
वेठबिगार मी आणि या दंडाबेड्या
जॉर्ज म्हणतो, ' रानटीपणा '
पाहुनी बन्सीलालच्या हाती बेड्या
कारण म्हणे,
जग फार पुढं गेलंय् !

या विसाव्या शतकात सुद्धा
' पॉव्हर्टी लाइन 'च्या खालीच मी
तरीहि ओरड चोहोबाजुनी
' साल्याची राखीव जागा बंद करा '
कारण म्हणे,
जग फार पुढं गेलंय् !

या विसाव्या शतकात सुद्धा
वीतभर पोटात चतकोर भाकर
' जग धावतंय् तू सुद्धा धाव,
कॉम्पिटिशन कर, कॉम्पिटिशन कर '
कारण म्हणे,
जग फार पुढं गेलंय् !

—गंगाधर कुरसंगे

संवाद

'हाकारा' आपण वाचलेत ! आदिवासींच्या प्रश्नासंबंधी चर्चा घडवून आणणाऱ्या या नियतकालिकाबद्दल आपणास काय वाटते ? मजकुरात अणखी कोणती विविधता हवी, आणखी कोणत्या प्रश्नांचा तपशीलवार विचार व्हावा याबद्दल आपल्यालाहि काही तरी म्हणायचं आहे, कृपया हाकाराला ते त्वरित लिहून पाठवा. आपल्या प्रतिक्रियांचा समावेश हाकाराच्या पुढील अंकात ' संवाद ' या सदरात करण्यात येईल.

—संपादक

माडीयांच्या नृत्यगीतांतील साहित्य

सौ. शैलजा देवगावकर

भामरागडच्या परिसरातील माडियागोंड ही जमात अति–मागास (Primitive) म्हणन ओळखली जाते. अजूनही 'नैसर्गिक' जीवन जगणारे हे माडिया आपल्या अतिपुरातन संस्कृतीची जपणूक करीत आहेत हे त्या भागात फेरफटका करणाऱ्याच्या सहज लक्षात येते. सरळ, थोडे भित्रे, निरागस मनाचे आणि अतिशय कमी गरजा असलेले हे आदिवासी, गोंडांचीच एक शाखा होत. माडिया ही गोंडांचीच एक पोटशाखा होय हे मानवशास्त्रीय आणि भाषिक अध्ययनावरून स्पष्ट झालेले आहे. महान आणि अनंत काळापासून चालत आलेल्या समृद्ध गोंडी संस्कृतीचे जतन करणाऱ्यांपैकी माडिया ही एक जमात असली तरी त्यांच्या स्वतःच्या परिस्थितिजन्य वैशिष्टयांची छाप त्यांच्या संस्कृतीवर आणि साहित्यावर प्रामुख्याने आढळते. कमरेखाली पंचासारखे गुंडाळलेले वस्त्र एवढाच ज्यांचा पोषाख अशा माडिया स्त्रिया व मुली जेव्हा कमरेवर हात ठेवून व सोबतीणीच्या गळयात दुसरा हात टाकून वर्तुळाकार नाचू लागतात तेव्हा त्यांच्या ओठांमधून गीतरूपाने त्यांचे साहित्य व संस्कृती पाझरू लागते.

सायंकाळी घोटुलसमोर (युवागृह) नित्यनेमाचा नाच असो की विवाहाच्या वेळी चारसहा मोठ्या झाडांच्या होळीजवळ शेकडोंच्या संख्येने केलेला स्त्री-पुरुषांचा नाच असो, नृत्यगीत हे असायलाच हवे. मुख्य म्हणजे त्यांना आपल्यासारखे बसून गाताच येत नाही. आधी ताल-नृत्यातील पदन्यास–व नंतर गीत असा क्रम असतो. प्रामुख्याने चार स्वरांमध्येच (सा, सा, नि, प) बद्ध केलेल्या या गीतांमध्ये इतके विविध विषय हाताळलेले असतात की एखादा विद्यापीठातील वाङ्मयाचा प्राध्यापकही स्तिमित होई. अर्थात शृंगाररस हा त्यांच्या एकूण जीवनाचा व साहित्याचा स्थायीभाव होय.

प्रियकराला उद्देशून प्रेयसी काय म्हणते ते पहा–

रेलाँ रे ऽ रेलाँ ऽ ऽ ऽ
नावारे च्याते मरका मरा
मरका मरा वारून वातारे
आली शृंगार डोले वाता
रेलाँ रेलाँ रे ऽ रेलाँ
नावारे ज्याते लिंबू मरा
लिंबू मरा वारून वातारे
आली शृंगार डोले वाता
रेलाँ ऽ ऽ रे रेलाँ ऽ ऽ
नावारे च्याते सितामरा
सितामरा वारून वातारे
आली शृंगार डोले वाता
रेलाँ रें ऽ रेलाँ ऽ ऽ
नावारे च्यातेशिती मरा
रेंगा मरा वारून वातारे
आली शृंगार डोले वातारें
रेंलाँ ऽ रे रेंलाँ ऽ ऽ
नावरें ज्वानी मंता हौशा
तू रं हिद मंता
रेंलाँ ऽ रें रेंलाँ रें ऽ ऽ

(प्रियकरा ! किती सुंदर माझी ही बाग ! हे आंब्याचं झाड सुंदर बहरलं असून मंद वाऱ्याने कसं डोलतं आहे. तसंच हे लिंबाचं झाड, हे पण लिंबांनी बहरलं असून वाऱ्यावर डोलतं आहे. आणि हे सिताफळाचं झाडसुद्धा वाऱ्यावर डोलतं आहे. ही शेवंती पहा, आपल्या सुगंधी

फळांनी बहरली असून मंद वाऱ्यावर डुलते आहे.

प्रियकरा माझं यौवन असच नाही का ! पण तू या वेळी इथं नाहीस...)

'रे रेलाँ ऽ रेलाँ ऽऽ' हे प्रत्येक गाण्यात पालुपद असून ते केवळ एक लय आणि ठेका किंवा ताल यासाठीच योजिलेले असते.

निसर्गातील फळाफुलांच्या बहरावरून स्वतःच्या यौवनाची कल्पना प्रियकराला देण्याची ही पद्धती या नृत्यगीताच्या वाङ्मयीन समृद्धीची साक्ष देते असं कोण म्हणणार नाही ?

लग्नसमारंभात तर अशा नृत्यगीतांना उधाण येते.

रिरीलो ऽऽ रे रेलां ऽऽ
जोडी जोडी इनदादी
वंजी वालवाल दादी वंजीवाल वाल
गाडा नूका दोसते दादी—
वंजी वालवाल दादी वंजीवाल वाल.
उसके निवा जोडी दादी
वंजी वालवाल . . .
पूनम जोडीं दोरकोदादी
वंजी वालवाल, दादी वंजीवाल वाल
कोरट पारी लेने दादीं
वंजी वालवाल, दादी वंजीवाल वाल
दूरत बोकडा दोहोनेके,
असके निवा जोडी दोरके दादीं
वंजीं वालवाल, दादीं वंजीवाल वाल.

(दादी—नवऱ्यामुलाला उद्देशून 'दादी' म्हटले आहे, जेव्हा तू गाडीभर धान (तांदूळ) देशील तेव्हा तुला मुलगी (नवरी) मिळेल. बायको फुकट मिळत नसते दादी म्हणून धान देऊन नवरी ने, चांगला बोकड देशील तेव्हा नवरी तुला मिळेल, म्हणून गाडीभर धान दे व बायको घेऊन जा)

या गीतात नवरदेवाची थट्टा तर आहेच; पण लग्न करणे म्हणजे गंमत नसून ती एक जबाबदारी आहे या गोष्टीची जाणीव करून देण्यात आली आहे.

नंतर नवरीला तिच्या सखीमैत्रिणी म्हणतात—

रेलां ऽ ऽ रेलां ऽ ऽ
साली मेटा होनू दादी रि रीलोऽ ऽ
किनीर, विनीर होनू दादी रि रीलो.
निवा दायना जोडी दादी रि रीलो
किनीर विनीर होनू दादी,
किनीर विनीर
रे रेलां रे ऽ ऽ रेलां ...

(वर्षभरासाठी जा बाई, तुझा नवरा तुला नेईल; हासत नाचत जा.

दादी (नवरामुलगा) मुलीला घेऊन घरी जा, तुझ्या जोडीदारणीला घेऊन, हासत नाचत आपल्याघरी जा, हासत नाचत जा.)

हासत नाचत जा अशी. बिदाई केली तरी मुलीच्या माहेरच्यांच्या मनाला विरहाचं दुःख कुठ तरी टोचत-बोचत असतचं आणि शेवटी निरोपाच्या गाण्यात ते पुढील नृत्यगीतातून प्रगटताना दिसतं.

मुलाकडच्या मांडवात मुलीकडची मुलेमुली म्हणतात (मुलीला उद्देशून)—

रि रीलो रिऽऽ रीलो ऽऽ
साले मुंडा रोयता
निवा मुलू रोयता
निवा रेलो मुलूये ... रि रीलो ऽऽ
धर्मम् पाटा ओसता
साले मुंडा रोयता
निवा रेलो मुलूयें ... रि रीलो ऽ ऽ
निकू पोहची दायनू
नीवा जीवा ऊयाँ
निवा रेलो मुलूयें— रिरीलो ऽऽ

(साल असलेल्या झाडाचा खांब वाकला, (माडियांच्या लग्नसमारंभात झाडापासून बनविलेल्या खांबाला धार्मिक महत्त्व असते.) तुझ्याकडचे लोकही (भावनांनी) भरले, हे सर्वजण गाणे फुकटच (उगीचच—लटके) म्हणत आहेत. हे धार्मिक गीत आहे, साल झाडाचा खांब वाकला आहे, तुझ्या लोकांनाही भरून आलेले आहे व हे गीत गाणे फुकटच आहे. हे मुली, तुझे लोक तुला पोहचवून परत जातील तेव्हा तुझा जीव लहान होईल (तुला दुःख होईल), हे मुली हे सर्वजण फुकटच गाणे गात आहेत.)

वरील गाण्यातून प्रगट होणाऱ्या भावना अत्यंत उत्कट आणि प्रभावी असून

'गंगा यमुना डोळ्यात उभ्या का ?
जा मुली जा, दिल्या घरी तू सुखी रहा,'

या भावगीताची किंवा आपल्याकडील लग्नात विहिणींच्या जेवणाच्या वेळी म्हणण्यात येणाऱ्या 'विहीण' गीताची आठवण करून देतात. खरंच या

माडीयांना 'मागासलेले'. का म्हणायचे हे समजत नाही !

लग्नाप्रमाणेच सणांच्या वेळी या नृत्यगीतांना बहर येतो. विजयादशमीला मोठा सण असतो. दसरा गीते फार लोकप्रिय आहेत. अहेरीचे जमीनदार हे केवळ त्यांचे परंपरागत राजेच नव्हे (हल्ली राजे विश्वेश्वर-रावमहाराज) तर कुलदैवतच. दसऱ्याला सर्व माडिया अहेरीला अक्षरशः ओसंडतात. आनंदाचा जल्लोष असतो. तेव्हा पुढील नृत्यगीते त्यांचा आनंद व्यक्त करतात.

रिरीलो ऽऽ रिरीलो ऽऽ
तिना नामूर, नेई नामूर हो ऽऽ हो
तेदाना उड्डाना
मावोर बाबाना डेरा
तिना नामूर, नेई नामूर
नेई नामूर...नाना...तीती ऽऽऽ
अहेरी नाटे जोम्मेदार
राम राम बोलो
तेदाना उड्डाना
मावोर बाबाना डेरा
तिना नामूर .. नेई नामूर... हो...हो...
रिरीलो ऽऽ रिरीलो ऽऽऽ

(उठत बसत (मजल-दरमजल करीत)
आमच्या राजाचा (बाबाना) तंबू
(म्हणजे राजाकडे निघालेल्या लोकांचा जमाव)
हळूहळू पुढे सरकत जात आहे,
उठत, बसत; उठत बसत.
अहेरी गावच्या जमीनदाराला
रामराम करून (येण्यासाठी)
उठत, बसत,
आमच्या राजाचा तंबू पुढे जात आहे,
उठत, बसत, उठत बसत.)

या गीतातील ताल, आणि जोशीला भाव एखाद्या मार्चिंग साँगशी जुळणारा आहे.

अहेरीला पोहोचल्यावर राजांच्या हवेलीवर जमून राजाला उद्देशून नाचत, गात ते म्हणतात—

बाबाले बाबाले ऽऽ
डागता पोरान, डागी बाबाले
नीम्मे चीटी, लोहानींन बाबाले
नीम्मे डागी, लोहानीन बाबाले,
पटीन–पटीन चीटी बाबाले
लोहानीन बाबाले
डागता पोरान डागी बाबाले.

(हे राजा राजा
तू पत्र पाठवून आम्हाला (दसऱ्यासाठी) बोलावलंस
पत्रावर पत्र पाठवून बोलावलस
प्रत्येक पट्टीत (रेव्हेन्यू विभागांना पट्टी म्हणतात)
पत्रावर पत्र पाठून बोलावलेले
म्हणून, हे राजा, आम्ही तुझ्यापाशी आलो.)

धर्म असो की सामाजिक प्रसंग असो त्यांचे लोक-साहित्य, वाङ्मय, पुराण हे सर्व गीतांमधूनच प्रगटते व त्यामुळेच लिपी नसूनहि त्याचे वर्षानुवर्षे जतन होते. अशा या माडियांच्या या साहित्य परिचयाचा समारोप त्यांच्याच एका स्वागतगीताने करू या.

येरे वाईरो, येरे वाईरो ऽऽ
मर्मीत वाईरो, मर्मीत वाईरो..रे रेलाँ ऽऽ
मर्मीत वाई कबाळ किसी हन्दन
निम्म संगोन, नम्म संगोन प्रतिकित्त वाई
सांगोना दिवाना बरीवायो रे रेलाँ ......
रे लाँ ऽऽ

(या हो या, पाहुणं या
आमच्या बोलावण्याला, टाळू नका
आम्ही तुमचे, तुम्ही आमचे, रंगरंगोली करू या
या हो या, पाहुणे या.)

रक्तखिळा

माधव बावने



राऊत गुरुजींना बी. डी. ओं. नी जेव्हा त्यांची बदली कोटापल्लीला झाल्याचे सांगितले, तेव्हा त्यांच्या मनातले काहूर हे कुठल्याही आठवडे बाजाराच्या कोलाहलापेक्षा कमी नव्हते. एका बाजूला आदिवासी मनाशी नाते जोडण्याची इच्छा फेडून घेण्याची संधी चालून आलेली, तर दुसरीकडे " जन विजन झाले आम्हा " ही उक्ती साकार होत होती. तेथे गेले तर मनुष्य या सुसंस्कृत शब्दाशी जणु फारकत होणार होती. रदबदलीचा काहीएक परिणाम घडून आला नाही. प्राथमिक शिक्षकाला आपल्या प्रारब्धाशी तडजोड ही जणु कायमचे ' वरदान ' असावे !

अहेरीवरून कोटापल्लीस जाण्याचा मार्ग म्हणजे केवळ 'विनोबा ट्रान्सपोर्ट (व्ही.. टी.)!' ३५ मैल सायकल किंवा पायी ! दोन मैल क्वचित पायी गेले की मित्रमंडळींकडून वाहवा मिळविण्याच्या पैजेच्या तुलनेत हा ३५ मैलांचा प्रवास ही आमची गरज ठरणार होती, कारण कितीहि टाळले तरी पगाराच्या पैशासाठी आठ दिवसांच्या सुटचा घेऊन त्यांना दरमहा नाइलाजाने यावे लागणारच होते. बाहेरच्या दुनियेशी आता तसा संबंध तुटणारच होता.

वाहणाऱ्या जखमेला शेला गुंडाळत वणवण भटकणाऱ्या अश्वत्थाम्यासारखे राऊत गुरुजी आपली वेदना दाबीत सायकलने कोटापल्लीच्या दिशेने मजल–दरमजल करीत निघाले. रस्त्यावरची माहिती तशी थोडीफार होती; पण आता निबिड अरण्याची संगत कशी शहारे आणीत होती. रानपक्ष्यांची सुरमयी किलबिल आता त्यांना मुद्दाम डिवचावे म्हणून तुणतुण्यासारखी वाटत होती.

१५ मैलांवरील रोही या गावात हाशहुश्य करीत पोहचल्यानंतर जेव्हा एका कोमटी दुकानदाराने " या गुरुजी, कुठे निघालात ?" म्हणून स्वागत केले; तेव्हा एवढ्या अंधाऱ्या रात्री एखादा प्रकाशाचा कवडसा दिलासा देऊन जावा, तसे राउतांना झाले. आता ह्यापलीकडे मराठी बोलणारा माणूस कसा विरळ होणार, याची त्यांना चांगलीच जाणीव होती. यापलीकडच्या मुलुखात आल्यापासून त्यांनी हौसेखातर चार-दोन गोंडी भाषेतील शब्द तसे पाठ केले होतेच. दुकानातच जेव्हा चहा पिऊन झाल्यावर राऊत गुरुजींनी दुकानदारास तिकडे निघाल्याचे कारण, इलेक्शन ड्युटी किंवा शिरगणती नसून,आपली बदली झाली असे सांगितले,तेव्हा दुकानदाराचे हास्य मावळून, त्याची जागा चिंतेने घेतली. सुंदर निरभ्र आकाशात एकाएकी काळ्या ढगांनी गर्दी करावी, तसा त्यांचा चेहरा पाहून राऊत गुरुजींना धस्स झाले. खूप खोदून विचारल्यावर दुकानदार म्हणाला, " गुरुजी, कुणाला सांगू नका. कारण ते गाव एवढ्यात जरा जास्ती भयानक झाले आहे. अंधश्रद्धेपायी आता ते लोक दोन–तीन वर्षे नरबळी देत असतात !" हे ऐकून राऊत गुरुजी गलितगात्र झाले. मृत्यूच्या अप्रत्यक्ष विचारांनी देखील तेवढ्या प्रसन्न समयी शिरशिरी निर्माण झाली. बदलीच्या रूपाने तर त्यांना मृत्यूने आमंत्रण पाठविले नव्हते ! चार-दोन क्षण कुणीच बोलले नाही; पण मग दुकानदारच सावरून बोलायला लागला, " घाबरू नका. सांगेन तसा करा! ' म्हणाला. तो त्या ठिकाणी बरीच वर्षे मुरलेला होता. आदिवासी जीवन हे त्याचे एक अंग झाले होते. कोटापल्लीच्या पाटलाविषयी त्यांनी जे ऐकले होते ते त्याने गुरुजींना सांगितले व तेथे गेल्यानंतर कसे वागायचे तेहि सांगितले. सारे सुरळीत होईल, असा दिलासाहि दिला.

रात्री कोमटी दुकानदाराकडे मुक्काम करून दुसरे दिवशी गुरुजी कोटापल्लीस गेले. गाव लहानगे इतर आदिवासी गावांसारखे ३०–३५ घरांचे. घराला कुणी कुलूप पाहिले नाही. जिथे अंगावरील वस्त्राला फाटा तिथे घरांना सजविणार कोण ? तेवढ्या सर्व घरात पांढुरकी पक्की शाळा नवखेपणा मिरवीत उभी. पाटलाचे घर शोधावे लागलेच नाही. पाटील पक्का माडिया होता; पण तो आदिवासी असला, तरी रीतिरिवाजाशी जानपहचान होती. गुरुजींची त्याने वास्त पुस्त केली. हातपाय धुवायला पाणी दिले. खास पाहुणा म्हणून चहाहि कपातून मिळाला.

सुरुवातीचे हे स्वागत गुरुजींचे सैरभर मन थाऱ्यावर आणू शकले नाही. ते पाटलाशी अजून व्यवस्थित बोलूच शकले नाहीत. आदिवासी गावात मराठी बोलणारा माणूस विरळाच होता. पाटील शहरातून जात-येत असल्याने, मराठीचा तसा जाणता होता, हे भाग्यच. शेवटी गुरुजींनी मनातली सल तशीच दाबून पाटलांना रात्री शाळे संबंधी मीटिंग बोलवायला सांगितली. पाटलांनी त्वरीत नोकरांशी गुरुजींना न समजणाऱ्या भाषेत बोलणे करून त्यास पिटाळले.

थोडी विश्रांती घेऊन पाटलाच्या घरून गुरुजी शाळा निरीक्षणासाठी बाहेर पडले. शाळेच्या विहिरीवरील डोळे गुरुजींना विस्फारून पाहात होते. दूर जंगलात चाललेली ठकठक नेमकी त्यांना अस्वस्थ करून जात होती. शाळेत पाहाण्यासारखे तसे काय होते ? एरवीसारखी शाळा ही सुद्धा. शाळेच्या बाजूला कुंपण वगैरे काही नव्हते. हे त्या वातावरणाशी साजेसे. मोठ्या गावासारखा कल्लोळ नाही मोठमोठ्याने बोलणे नाही. कसे शांत–शांत वाटते. कशासाठी शांतता आहे ही ? ही शांतता गुरुजींना अधिकच अशांत करून गेली.

रात्री पाटलांकडे सारी जमली. ती सारी मिळून ९–१० जण. एका खाटेवर गुरुजी पाटलांसह बसले. इतर मंडळी खालीच बसलेली. बहुतेकांना मराठीचं अगदी कामापुरतंच ज्ञान. आणि राऊत गुरुजींना तरी कुठे आदिवासींची गोंडी येत होती ? पाटील हाच आता दुभाषा. गुरुजी म्हणाले, 'पाटील, हे बघा, तुमचा पाहुणचार घेऊन मला बरे वाटत आहे, पण स्पष्ट बोलावेसे वाटते की मी तुमच्याविषयी 'बरेच' ऐकले आहे. मी तुमच्या गावाला शिक्षक म्हणून रुजू होतो आहे, पण माझ्या जीवाला थोडाहि धक्का लागला तर ते काही योग्य होणार नाही.'

एका दमात राऊत गुरुजींनी कुठलाही आडपडदा न ठेवता बोलून घेतले. घशाला जणू कोरड पडू लागली. अंधार अजून गडद होऊ लागला. चौफेर बसलेले माडिया आता अधिकच काळेकभिन्न वाटू लागले. बोलतांनाचा जोम आता बोलणे संपल्यावर कुठे एका अनामिक भीतीने गडप झाला होता ! तेवढ्यात पाटलांच्या शब्दाने ते भानावर आले.

'गुरुजी, हा गोंडाचा शब्द आहे. तुमच्या जिवाला आम्ही आमच्या जीवापेक्षा हिफाजतीने ठेवू. तुमच्या येथील वास्तव्यात थोडा जरी ताप आला तरी माझे नाव घ्या!' मात्र एवढे ध्यानात ठेवा की आपले काम सोडून आमच्या गोष्टीत जराहि दखल घेऊ नका! तुमची जबाबदारी आमच्याकडे !'

पाटलांचे शब्द तीक्ष्ण पात्यासारखे गुरुजींची कर्णरंध्रे चिरत गेले. पाटलांचा रूबाब, ओज आणि करारीपणा या वेळी चांगलाच जाणवला. दोघांनी एकमेकास वचन दिले तेव्हा कोठे गुरुजीस हायसे वाटले. पाटलांनी इतर मंडळीस गोंडी भाषेत, गुरुजींशी झालेले संभाषण सांगितले. ऐकतांना साऱ्यांचे चेहरे गंभीर झाले होते. पण शेवटी जाताना मोकळेपणाने गुरुजींना रामराम करून ते गेले. तेव्हा बदललेल्या वातावरणाची जाणीव गुरुजींना होऊ लागली.

गुरुजींना एक खोली देण्यात आली. आता काही दिवस थांबून गुरुजी आपले सामान घेऊन आले. घरी दुसरे कुणी नसल्यामुळे आदिवासी हेच त्यांचा विरंगुळा बनले. त्यांचे बोलणे, वागणे, रितीरिवाज, खाणे, पिणे देवपूजा याविषयी आपुलकी दाखवू लागले. गोंडी आता येऊ लागली. शाळा सुरू झाली पण गुरुजींचे जणु शिकविण्यापेक्षा शिकणे हेच सुरू झाले. आदिवासी मुलांना जंगलातील गोंद, टोळी व मध गोळा करण्यापेक्षा शिकण्याचे महत्व ते काय ? गुरुजी हळूहळू रुळले आदिवासीत.जणु त्यांच्यातीलच एक बनले. त्यांच्या मेजवानीत, शिकारीत, नाचात गुरुजींशिवाय रंग भरेनासा झाला. ह्या काही महिन्यात साधा तापदेखील गुरुजींना आला नाही. तरी पण एका अज्ञात भीतीची जाणीव गुरुजींच्या मनात कायम ठाण मांडून होती.

तो दिवस जवळ येऊ लागला; माडियाला भूमातेला खूष करावयाचा ! तिला खूष केले नाही तर पिकणार कसे ? आणि तिला तर हवे लाल रक्त !

लहलहत्या जिव्हेचे !! दोन पायांचे !!! देवाच्या पूजेच्या मिषाने घरोघरी ओसंडून वाहणारी खुषी पाहून गुरुजींना काही कौतुक वाटेना. ते अबोल बनू लागले. गुरुजींना नेहमीप्रमाणे आपल्या निरागस, खेळकर बोलण्याने आता कुमारिका आदिवासी कन्या खुलवू शकत नव्हत्या. पाटलाची माडियांशी चाललेली कुजबूज गुरुजींना आपल्यालाच उद्देशुन चालली असे वाटायचे. एखाद्या रात्री उठून अंधाराचा आश्रय घेऊन निघून जावे असेहि गुरुजींना वाटे. आताची शांतता, जणु जीवघेणी वाटत होती. त्यांना एवढ्यात जेवण गोड लागेनासे झाले; पण मग पाटलाचे पहिल्या भेटीतले शब्द आठवत-पाटलाचा शब्द तेवढाच खरा असतो. हेहि आता एवढ्या दिवसांत त्यांना कळून चुकले होते.

शेवटी तो दिवस येऊन ठेपला. मध्यंतरी दोन–तीन दिवस पाटील आपल्या काही सहकाऱ्यांसह कोटापल्लीत नव्हते. ते पहाटेसच आले होते. गुरुजींनी आजवर जे ऐकले होते त्याचा आता प्रत्यक्ष प्रत्यय यायला कितीसा वेळ लागणार होता. 'हजारो वर्षाच्या प्रथेचे ते आता जणु चिरकाल साक्षीदार ठरणार होते' त्यांचा चेहरा पांढराफटक पडला होता. आपल्या गावात पोळ्याच्या दिवशी माराईला भाव देणाऱ्या बकऱ्यासारखा आरशातील आपला चेहरा आज त्यांना वाटला.

तिन्ही सांजेला माडिया अतिशय खुशीत होते. 'मोटा' देवहि जणु आता आपल्या भक्तांवर प्रसन्न होता. जिकडे तिकडे जल्लोष होता. उंच कंठरवाने लहान मुले गात होती. ढोलाचा आजचा निनाद त्यात भरच टाकणार. ढोलावरची दणदणा वाजणारी थाप गुरुजींचा थरकाप करून सोडीत होती आज माडियांच्या उत्साहास उधाण आले होते. कारण धरणीमातेला ते आता उष्ण रक्ताने भिजवून टाकणार होते. दोन पायांचे आवडते खाद्य ते तिला देऊन तिची भूक शांत करणार होते.

तण-तणा-तण, दण-दणा-दण, रेले-रेले-रेला। म्हणत शस्त्रास्त्रे परजत, शेंदूर-गुलालने माखून तारवटल्या डोळ्यांनी सर्वशक्तीनिशी ढोल वाजवत, ही सारी मंडळी गुरुजींच्या घराकडेच आता वळली. गुरुजींच्या मनातील अंधःकार गडद–अधिक गडद झाला. काही सुचावे अशी वेळच उरली नव्हती. आता खेळच खलास ! माराईसमोर दीनवाणे, ओरडूहि न शकणाऱ्या बोकडात आणि त्यांच्यात आता कोणता फरक राहिला आहे ?

आणि सारे त्या झोपडीत शिरले. गुलालाने गुरुजींना माखून त्यांना आपल्याबरोबर देवाकडे जाऊन प्रसाद घेण्याचा आग्रह करू लागले. जणू दोघातिघांनी त्यांना उचललेच. डोळ्यापुढे अंधारी. मनात बलिदानाची भावना, निराशा व अगतिकता यांनी कापून, गुरुजी देवाजवळील पाटलापुढे उभे राहून, हात जोडून गयावया करू लागले. ढोलताशाच्या त्या भणभणाटात पाटलांची करारी मुद्रा गुरुजींना क्रुद्ध वाटू लागली. आता पायाशी लोटांगण घालणार. तेवढ्यात पाटलांनी त्यांना मिठी मारली व उभे राहून प्रसादाचा पेला पुढे केला व पिण्याची विनंती केली. मुकाट्याने ते पिण्याशिवाय उपाय नव्हता आणि नंतर एक लाल उष्ण रक्ताने माखलेला खिळा त्यांनी गुरुजींना दिला व तो सांभाळून ठेवायला सांगितले. गुरुजींना आता सूर्य हजार डोळ्यांनी आपल्यावर कृपालोभ ठेवून आहे, असे त्या अंधारातहि वाटले. शेकोटीभोवती, मंद प्रकाशात धुंद होऊन, ढोलाच्या आवाजावर नृत्य करणाऱ्या माडिया तरुण-तरुणींची त्यांना जाणीव झाली. एका अत्यानंदाने, बेभान होऊन ते पाटलासोबत मग धुंद होऊन कधी नव्हे तेवढ्या बेहोषीत नाचत राहिले.

कळसूत्री बाहुल्या, जनसंपर्क आणि जाणीवजागृती

हेमंत कानिटकर

लेखाचे शीर्षक वाचकांना थोडे विचित्र वाटण्याचा संभव आहे. कारण कळसूत्री बाहुल्यांची कला ही तशी अजूनही अनोखी कला आहे. कोणत्याही निर्जीव वस्तूला रंगमंचावर आणून तिची हालचाल करवली असता ती वस्तू कळसूत्री बाहुली बनते असं म्हणता येईल. ही भारतीय पारंपरिक कला आहे, मानवी नाट्य रंगमंच सुरू होण्यापूर्वी, बाहुल्या नाचत आणि आपले पूर्वज ते पहात असत. ही कला भारतातून इतरत्र पसरली—पण आज झेकोस्लाबाकीयात प्रकाश-कीरणांच्या, कॉम्प्युटरच्या सहाय्याने बाहुल्या नाचवल्या जातात आणि आपण ही कला जवळजवळ विसरलो आहोत.

सामाजिक क्षेत्रात वेगवेगळ्या पातळीवर, पण ढोबळ मानाने एकाच ध्येयाने प्रेरित होऊन अनेक मार्गांनी काम चालू आहे. जनसंपर्क, जाणीवजागृती ह्या समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेतल्या महत्त्वाच्या पायऱ्या आहेत. लोकांपर्यंत पोहोचण्याच्या कामात, कलापथके, नाटके, कविता इत्यादी कलाप्रकार वापरले जात आहेत. कलाप्रकारांना एका मर्यादेत ठेवण्याच्या मनोरंजन, आत्माविष्कार ही मूल्ये बदलून, कलाप्रकारांचा वापर औपचारिक अनौपचारिक, शिक्षण आणि समाजाचा एकत्रित आविष्कार (collective expression) करण्यासाठी केला जात आहे. ह्या कलेच्या अनोख्या वाटचालीत, समाजाचा एक घटक म्हणून समाजासाठी काम करण्याची वाट कलाकाराला मोकळी झाली आहे.

कळसूत्री बाहुल्या हा एक वेगळ्या प्रकाराचा नाट्य-प्रकार आहे.जगातल्या प्रत्येक छोट्या—मोठ्या देशात त्या त्या संस्कृतीचा वारसा सांगणाऱ्या बाहुल्या सापडतात. सात ललितकलांचा संगम असणारी ही कला मानल्यास अवघड आणि ठरविल्यास एकदम सोपीही बनविता येते.

या बाहुल्या मुख्यतः चार प्रकारच्या असतात. ते प्रकार पुढीलप्रमाणे आहेत —

१) **धाग्यांच्या साहाय्याने नाचवली जाणारी बाहुली** (String Puppet) : ही बाहुली शंभर धागे बांधून पण नाचवता येते, तसेच साध्या एकदोन धाग्यांच्या साह्याने पण नाचवली जाते. आपल्याकडे राजस्थानच्या 'कठपुतळ्या' प्रसिद्ध आहेत. परदेशात फ्रांस हा देश ह्या बाहुल्यांसाठी प्रसिद्ध आहे.

२) **हातबाहुली** (Glove Puppet) : ह्या बाहुलीला स्वतःचे शरीर असे नसते. सूत्रधाराचे शरीर हेच तिचे शरीर बनते. ही बाहुली नाचवण्यासाठी सगळ्यात सोपी आहे.आपल्याकडे अशा प्रकारच्या बाहुल्या पूर्वी होत्या की नाही याचा काहीच पुरावा नाही. परदेशात इंग्लंडच्या पंच आणि ज्युडी ह्या हातबाहुल्या जगप्रसिद्ध आहेत.

३) **काठी बाहुली** (Rod Puppet) ; ह्या बाहुलीचे वैशिष्ट्य म्हणजे ही काठ्या वा तारांच्या साह्याने नाचवली जाते, आणि कितीहि मोठी बनविता येते. आपल्याकडे कलकत्ता यासाठी प्रसिद्ध आहे, तर परदेशात रशिया-

मॉस्को पपेट थिएटर ह्यासाठी प्रसिद्ध आहे.

४) **छाया बाहुली** (Shadow Puppet) : पांढऱ्या पडद्यावर कट–आउटसच्या सावल्या पाडून या सावल्यांमार्फत कार्यक्रम–नाटय सादर केले जाते. आंध्र प्रदेशची लेदर शॅडो पपेटस् प्रसिद्धच आहेत. चीन, जपान, कंपुचिया या देशातही ही कला आघाडीवर आहे.

अशा या कळसूत्री बाहुल्या. जाणीव, जागृती, आणि जनसंपर्क या कार्यात त्यांचा संबंध काय ? हा प्रश्न वाचकांना साहजिकच पडेल; सामाजिक क्षेत्रातल्या माझ्या मर्यादित अनुभवानुसार याचे उत्तर पुढीलप्रमाणे

' आम्ही पुस्तक वाचत नाही, आम्हाला लिहिणं येत नाही. मग आम्ही जास्त काय बोलणार ?' ही असाक्षरता, पिळवणूक आणि आर्थिक अनवस्था ह्यातून उदभवलेली न्यूनगंडाची भावना समाजाच्या दुर्बल घटकामध्ये सापडते. पण, बारकाईने शोधले तर दुसरीकडे कोठे तरी हे लोक 'मोकळे' असत'त. डॉ. राडमंड, होम्स या मानसशास्त्रज्ञाच्या मते माणसामध्ये ' शिकण्यासाठी' लागणाऱ्या सहा सहजप्रवृत्या आहेत.

१) संपर्क साधण्याची प्रवृत्ती : बोलणे आणि दुसऱ्याचे बोलणे ऐकणे (communicative instinct)

२) नाटयपूर्ण प्रवृत्ती : अभिनय नक्कल करण्याची प्रवृत्ती (the dramatic instinct)

३) चित्र शिल्प कलाप्रवृत्ती : चित्र काढणे, रंगविणे, आणि शिल्प बनविण्याची इच्छा (the Artistic instinct)

४) संगीत नाच कलाप्रवृत्ती : नाचण्या-गाण्याची आसक्ती (The musical instinct)

५) जिज्ञासूवृत्ती : एखादी गोष्ट का आणि कशासाठी ही जाणण्याची इच्छा. (the inquisitive instinct)

६) रचनात्मकप्रवृत्ती–वेगवेगळया गोष्टी बनवण्याची आवड (The constrcutive instinct)

शिकण्यासाठी लागणाऱ्या (शिक्षण स्वैरअर्थाने) या प्रवृत्ती प्रत्येक माणसात थोडयाफार प्रमाणात असतात. कळसूत्री बाहुल्यांची कला ह्या प्रत्येक प्रवृत्तीला वाव देते. आमच्याकडचे ठाकूर,कातकरी-गाण्यात नाचण्यात तरबेज, पण तेवढया धिटाईने बोलतीलच असे सांगता येत नाही.

मग आपण त्यांच्याच माध्यमातून, त्यांच्यापर्यंत पोहचू शकत नाही काय ? एखाद्या आदिवासी स्त्रीला तिचे नाव, अथवा तिच्या नवऱ्याचे नाव सांगताना लाज वाटते. पण नाचतांना, गातांना तिला संकोच वाटत नाही. तर मग, नाचगाण्याच्या माध्यमातूनच ती आपलं मनोगत, व्यथा जास्ती प्रभावीपणे समाजापुढे मांडू शकते किंवा याच माध्यमातून आपले विचार तिच्यापुढे जास्त योग्य रीतीने पोहोचू शकतात.

माझा आदिवासी लोकांना ही कला शिकवण्यातला एक अनुभव येथे कथन करीत आहे. सह्याद्रीच्या खोऱ्यात जामरुखजवळ ' हिऱ्याची वाडी' म्हणून एक ठाकूरवाडी आहे. साधारण दहा–पंधरा घरे असलेल्या या वाडीतील लोकांकडून एक छायाबाहुली नाटच बसवून घेण्यासाठी मी तिथे महिनाभर राहिलो.कार्यक्रमाचा विषय होता ' कर्जत तालुक्यातील आदिवासी.' गोष्ट मी मुद्दामच तयार केली नव्हती; पण कार्यक्रमाचे मुद्दे-लग्न, सावकार, आजारपण, शेती, मजुरी हे होते. वाडीच्या मध्यभागी कार्यक्रमाचा पडदा टांगून ठेवला होता. तीन चार दिवसात–गावातील मंडळी बाहुल्या बऱ्यापैकी हलवू लागली. मग एकेका मुद्द्यावर नाटच पडद्यामागे माणसात, तर पडद्यावर छाया बाहुल्यात रंगू लागले. संवाद, भाषा, गाणी सर्व काही त्यांचेच आणि जिवंत अनुभव तळमळीने बाहेर पडू लागले. प्रेक्षकांना पटले नाही तर प्रेक्षक ओरडून सूचना देत किंवा पडद्यामागे जाउन स्वतः संवाद बोलत.

पंधरा दिवसात दीड तासाचा कलात्मक कार्यक्रम तयार झाला. पण कार्यक्रमाचे परीक्षण काही विदारक सत्य सांगत होते, आणि ते स्वतः मला फार धक्कादायक वाटले. ' आम्ही म्हणजे कोणी नाही, जनावरासारखे काम करावे, कोणीही यावे लुटावे, मारावे, आमच्या संस्कृतीत काही अर्थ नाही. आम्ही दारू पितो नंतर शिवीगाळ करतो' हे आणि अशासारखे न्युनगंड वाढविणारे संदेश माझ्यापर्यंत त्यांनी 'त्यांच्या कार्यक्रमातून पोहोचविले.

आता माझ्यापुढे एक काम आहे. हाच कार्यक्रम परत वेगळया पद्धतीने सादर करावयाचा आणि ह्या जंगलच्या राजांना त्यांच्या राजपणाची, वैदिक जगताशी संबंध असणाऱ्या त्यांच्या महान संस्कृतीची त्यांना जाणीव करून द्यायची. त्यांना सार्थ अभिमान वाटेल असा कार्यक्रम सादर करावयाचा.

कदाचित्, माझी स्वतःची अभ्यासपूर्ण, गोष्ट घेऊन मी हिऱ्याच्या वाडीत गेलो असतो तर चित्र वेगळं



झालं असतं, पण, ह्या बाहुल्याद्वारे लोकहि मला सांगू शकतात| बऱ्याच गोष्टी, हा शोध मला लागलाहि नसता आणि माझा कार्यक्रम लोकांपासून दूर राहिला असता. ' एकतर्फी जनसंपर्क ' मी साधू शकलो असतो.

समाजाच्या खालच्या स्तरावर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना हे माध्यम आवडेल अशी आशा आहे. कारणे-मी शोधलेली–अनुभवलेली पुढे देत आहे.

१) कमी खर्चाचे, स्वस्त माध्यम.

२) खऱ्या अर्थाने लोकांचे माध्यम– (भारतीय असे).

३) सोपे आणि कोणत्याहि प्रकारच्या लोकांना आकर्षित करू शकणारे एक माध्यम.

४) अतिशयोक्ती, कल्पित प्रसंग, बाहुल्यामार्फत योग्य रीतीने दाखवता येतात. उदा. सूर्य स्वत: लोकांशी बोलू शकतो.

अशा प्रकारच्या कार्यक्रमातून योग्य तो परिणाम साधणे हे खरे अवघड आहे पण तेहि अनुभवाने जमू शकते. तसेच अशा कार्यक्रमानंतर पुढची पायरी अत्यावश्यक आहे.

शेवटी ह्या बाहुल्या सर्वच ठिकाणी वापरून चालणार नाही कारण त्यातहि काही कमजोरी आहे. (उदा. वेळचे बंधन–दीड ते दोन तास, इष्ट परिणाम कोणता असावा हे लक्षात घेऊन माध्यम कोणते वापरायचे ते ठरवावे.) पण तोटयापेक्षा यात फायदे जास्त दाखविते येवढे सांगून हा लेख इथे संपवितो. ■

(जास्त माहितीसाठीं ॲकेडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स–पो. कशेळे, ता. कर्जत, जि. कुलाबा, ह्या पत्त्यावर लिहावे.)

माडियांची हस्तकला

श. गो. देवगावकर



अरण्यात, डोंगराच्या सान्निध्यात किंवा दऱ्याखोऱ्यात वास्तव्य करणारे आदिवासी हे आधुनिक सुधारलेल्या कलांशी परिचित नसले तरी त्यांच्या परंपरागत चालत आलेल्या कला आपले चित्त वेधून घेणाऱ्या आहेत. अनेकदा तर आधुनिक संस्कृतीतील लोक आदिवासी कलेकडे इतके आकृष्ट होतात की, मुंबई-सारख्या शहरातील हौशी श्रीमंत लोक किंवा परकीय प्रवासी वारेमाप किंमत देऊन या कलात्मक वस्तू विकत घेतात. त्या वस्तू तयार करणाऱ्या आदिवासींना मात्र आपल्या ह्या अप्रतिम हस्तकलेची जाणीव नसते, आणि किंमतीच्या किंवा पैशाच्या स्वरूपात तर राहोच; पण कौतुक किंवा पुरस्काराच्या स्वरूपातहि त्याचा मोबदला त्यांना क्वचितच मिळतो. निसर्गाच्या सान्निध्यात वावरणाऱ्या आदिवासींच्या या कलेवर नैसर्गिक प्रतिकांची आणि प्रतिमांची छाप आढळते. निसर्गातील वृक्ष, वेली, दगड, लाकडी ओंडके, पक्ष्यांची पिसे, मणी इतकेच नव्हे तर जंगलात सापडणाऱ्या इतर अनेक बारीक–सारीक गोष्टींचे अत्यंत कल्पकतेने सुबक आकार देऊन त्यात कलाकुसर वा हस्तकौशल्य ओतलेले आढळते. चंद्रपूर जिल्ह्यातील माडियांच्याही हस्तकलेचे थोडक्यात दर्शन घडविणे हा प्रस्तुत लेखाचा उद्देश होय.

या अरण्यात सागवान आणि इतर तसेच उच्च प्रतीचे लाकूड भरपूर प्रमाणात उपलब्ध आहे. अशा लाकडाला अगदी सामान्य प्रतीच्या अवजारांनी उत्कृष्ट आकार देणे वा कोरीव काम करणे ते सहज गतीने करतात. त्यात फण्या, सुपारी किंवा तंबाकू ठेवण्याच्या गोलाकार किंवा कुयरीच्या आकाराच्या डब्या, तसेच शेतीच्या कामासाठी लागणारी लहानमोठी अवजारे, धनुष्यबाण, इत्यादि गोष्टींचा अंतर्भाव होतो. त्यांच्या प्रिय मृत व्यक्तिच्या आठवणीसाठी म्हणून प्रथम श्राद्धदिनी खेड्यातील विशिष्ट जागी उभे दगड रोवण्याची त्यांची पद्धती आहे. याला 'कलबंडा किंवा उरस्कल' असे म्हणतात. अशा दगडांवर त्या मृत व्यक्तीला आवडणाऱ्या वस्तूंचे कोरीव लाकडी प्रतिक करून ठेवलेले आढळते. यात अनेकदा मोर, बंदूक, बायझनसारख्या प्राण्यांची तोंडे कोरलेली आढळून येतात. तसेच देवांच्या प्रतिकांच्या स्वरूपात कोरीव काम केलेले झाडांचे बुंधे किंवा लाकडी फाटे पहावयास मिळतात. लग्नसमारंभाच्या वेळी मांडवात लांबलचक लाकडी बुंध्यातून कोरीव काम करून तयार केलेला खांब पहावयास मिळतो. अशा खांबात कड्या, साखळीपद्धतीने बसवलेली व हालणारी लोलके किंवा घंटीसारखे आकार दिलेले आढळतात. मात्र हे सर्व कुठेही जोड न देता केवळ कोरीव काम करून तयार केलेले असते.

बांबूचा कलात्मक वापर

बांबूचा वापर करूनहि विविध कलात्मक वस्तू ते बनवू शकतात. तट्टे, चटया, टोपल्या, झाकण असलेल्या चौकोनी टोपल्या (व्हिग्या), इत्यादि वस्तू ते उत्तमरीतीने तयार करतात. विविध प्रकारचे आकार ते सहजरीत्या देतात. मासे पकडण्यासाठी आवश्यक ती बांबूची साधने करतात. बांबूच्या बारीक फाकांपासून तयार केलेले नक्षीकाम फारच सफाईदार असते. लांब दांडीच्या गवतापासून किंवा लव्हाळ्यांपासून बारीक रस्सी किंवा दोरी तयार करतात, आणि त्याने खाट विणतात. ही वीण अत्यंत मजबूत असून न टोचणारी म्हणजे नरम असते व नारळाच्या दोरीपेक्षाही मजबूत असते. पाणी ठेवण्याची मातीची भांडी, भोपाळ्याचे तयार केलेले कमंडलू इत्यादि वस्तू उचलण्यासाठी वा इकडून तिकडे नेण्यासाठी अशा दोरीची आवरणे कलात्मक रीतीने

विणलेली असतात. शिकारीसाठी जे धनुष्य तयार करतात. त्यांची दोरी अनेकदा याच तंतूंची असते. या दोरीने बाणाप्रमाणेच दगडहि नेम धरून मारता येतो. बांबूंच्या किंवा गवताच्या पातळ तंतूपासून माळ तयार करून ती मोर किंवा तत्सम प्राणी पकडण्यासाठी वापरतात.

फळे वाळवून त्यापासूनहि उपयुक्त वस्तू माडिया लोक तयार करतात. विविध आकारांचे कडूभोपळे आतून कोरून आणि वाळवून पाणी काढण्याचा चमचा वा डाव, पाणी नेण्यासाठी कमंडलू, ताडी ठेवण्यासाठी भांडी तयार करतात, ही अत्यंत हलकी, कडक आणि टणक व बरीच टिकावू असतात.

हिरव्या रुंद बांबूपासून बांबूचा डोळा किंवा गाठ ज्या ठिकाणी असेल त्याच्या बरोबर खाली कापून, त्या गाठीच्यावरील गाठीच्या खाली कापून, ताडी गोळा करण्यासाठी वा ठेवण्यासाठी अगर आंबील अथवा पाणी ठेवण्यासाठी, नैसर्गिक 'बाटली' तयार करतात. बांबूंना उभे कापून दोन भाग करून त्याचा पन्हाळी-सारखाहि उपयोग करण्यात येतो. उंच ताडांवर चढण्यासाठी तयार केलेली बांबूची शिडी, विहिरीतून पाणी काढण्यासाठी केलेला बांबूचा पिकोटा हेही कलात्मक दिसतात.

मातीची भांडी तयार करणे व ती भाजून वापरणे ही कलाहि माडियांना अवगत आहे. मातीने कुडाच्या भिंती लिंपणे, नंतर त्याचे सारवण करणे ही कामे अत्यंत सफाईने व सुबकपणे माडिया करतात. अरण्यात असलेल्या विविध रंगांच्या मातींनी त्यावर नक्षीकामहि केलेले आढळते. 'घोटुल'मधील मयालीवर आणि खांबांवर कलाकुसर आढळते. त्यातहि विविध चित्रे व प्रतीकांचा वापर सढळपणे झालेला दिसतो.

जनावरांची कातडी कमावणे व त्यापासून ढोलकी, किनरी यासारखी वाद्ये तयार करणेही त्यांना अवगत आहे. जंगलातील चित्रविचित्र फुलांच्या व पानांच्या माळा तयार करून सणावाराला झोपड्या, खेड्याच्या कुंपणाचे प्रवेशद्वार शृंगारणे, लग्नाचा मंडप सजविणे, किंवा नवागताच्या स्वागतासाठी रस्ता अडवून फुलांच्या माळा देणे व प्रसंगी बक्षीस मागणे या गोष्टी अगदी नित्यपरिचित आहेत. या माळा व सजावटीत त्यांची कलात्मकता प्रगट होते. लतापल्लवांनी व मोरपिसांनी सजविलेला मांडव दसरा, दिवाळी किंवा त्यांच्या इतर धार्मिक प्रसंगीहि पहायला मिळतो. माडिया स्त्रिया केसात फुले खोवतात. इतकेच नव्हे तर रिबनांच्या घड्या घालून तयार केलेली लालभडक किंवा पिवळ्या रंगाची मोठी फुले मोठ्या हौशीने चापून बसविलेल्या केसांमध्ये खोवतात. पांढऱ्या लुगड्याच्या व सावळ्या रंगाच्या पार्श्वभूमीवर ही फुले खुलून दिसतात.

चांदीची आभूषणे

चांदीचे दागिने या स्त्रियांना फार आवडतात. विशेषतः चांदीचा कंबरपट्टा फार आवडता असून लग्नाच्या वेळी तरुण मुलींपासून म्हाताऱ्या स्त्रियांपर्यंत सर्व स्त्रिया कंबरपट्टे लावतात. चांदीची कर्णफुले, कुड्या, नथन्या, मनगट्या, बांगड्या गोठ, वांकीसारखे दागिने, पायातील पैंजण, जोडवे, गळ्यात पुतळ्यांच्या व रुपयांच्या माळा व चांदीची लॉकेटस् असलेल्या माळा, अंगठ्या फार मोठ्या प्रमाणावर वापरण्यात येतात. हे रुपये जुने, कलदार असून इ. स. १८६० मधील रुपयेहि अशा दागिन्यांसाठी वापरण्यात आल्याचे पाहण्यात आले आहे. या रुपयांच्या काठावर लहान कड्या करून त्यातून गोफ ओवून ही माळ करण्यात येते. हे दागिने उत्तम कलाकुसर केलेले असून फिरते व्यापारी माडियांना विकत देतात; पण क्वचित त्या भागात स्थायिक झालेले कारागीरहि ते तयार करतात. फक्त हेमलकशाजवळ कोईनगुडा म्हणून एक खेडे आहे तिथे माडियांपैकी सोनार काम करणारे लोक आढळतात. कर्णफुले, आंगठ्या यासाठी ॲल्युमिनियमचाही वापर करण्यात येतो.

लोहारकाम करणारे माडिया मात्र पुष्कळ असून खाती ही एक जातच त्यांच्यात आढळते. बस्तरच्या बाजारातून लोखंडी वस्तू विकत आणीत असले तरी कोयता, कुऱ्हाड, विळा, कुदळ, धनुष्य–बाण, भाला इत्यादि तयार करणारे माडिया लोहार अनेक खेड्यांत आहेत.

या आणि अशा अनेक कलाकुसरीच्या आणि उपयुक्त हस्तकला त्यांना येत असून गरज भागविण्याहून जास्त निर्माण करणे व विकणे हे त्यांना मान्य नाही. त्यासाठी त्यांना जागृत, संघटित करून आणि अतिरिक्त उत्पादन आणि त्याचा विक्रय याचे त्यांच्या जीवनाच्या दृष्टीने काय महत्त्व आहे ते समजावून देऊन या कलांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. त्यांच्या मनात जास्त समृद्ध जीवनाची इच्छा निर्माण करणे हे प्रथम आवश्यक आहे. तसेच त्यांना थोडे मार्गदर्शन केल्यास व सुबक अवजारे, रंग, उपलब्ध करून दिल्यास त्यात आणखी सौंदर्य ओतता येईल आणि जगाला या कुशल पण निरागस कलाकारांच्या अभिजात हस्तकलेचा लाभही मिळेल. 'योजकः तत्रदुर्लभः' हे मात्र खरे !

■

हरे कुमरा

सुखदेव बाबू उईके

गोंड जमातीत चार सगे आहेत. 'चार देवे', 'पाच देवे', 'सहा देवे' आणि 'सात देवे' कुमरा पाळीचे लोक पूर्वी 'पाच देवे' च होते. पण पुढे 'पाच देवे' कुमरा व 'सहा देवे' कुमरा असे दोन प्रकारचे कुमरा अस्तित्वात आले. 'सहा देवे' कुमरा कसा निर्माण झाला ती कथा लोककथेच्या आधारे येथे देण्यात येत आहे.

कोंबडे आरवायला लागले होते. कावळ्यांची काव ऽ काव ऽ सुरू झाली होती. पक्षी किलबिल करीत घरट्यांतून बाहेर पडत होते. पूर्वेने आकाशात लाल रंग सर्वदूर पसरला होता. आकाशातील स्थिर भासणारे ढग रंगीबेरंगी झाले होते. पूर्वदिशा आता उजाळली होती. घर-घरच्या बाया-बापड्या सडा-संमार्जन करू लागल्या होत्या.

ग्रामप्रमुख अजून अंथरुणातच होता. तो शासनाचा तत्कालीन प्रमुख अधिकारी होता. गावातील प्रजेवर राजातर्फे त्याचाच अंमल होता. गावाचे रक्षण, गुन्ह्याचा तपास, गुन्हेगाराला पकडून राजदरबारात हजर करणे, त्याला प्रचलित नियमानुसार शिक्षा देणे आदि कामे त्याला करावी लागत असत. त्याच्या मदतीला काही निवडक धिप्पाड रक्षक मदतनीस होते. त्या काळात टोळ्या-टोळ्यांत संघर्ष होत. लहान-लहान राज्ये होती. गावांवर आक्रमण झाल्यास गावकऱ्यांच्या मदतीने आक्रमकांना पिटाळण्यासाठी रात्री रक्षक मदतनीस गस्त घालीत असत.

गावाशेजारी किर्र जंगल होते. अधूनमधून रानटी पशूंचासुद्धा गुराढोरांना पळवून नेण्यासाठी गावावर हल्ला होई. भूत, पिशाच्च, देव, प्रकोप आदि गोष्टींवर लोकांचा भारी विश्वास. ग्रामप्रमुखाला लोक नाईक म्हणत. नाईक म्हणून नेमण्यासाठी शासन निर्दयी, कर्तव्य कठोर. शासकनिष्ठ इसमाचीच निवड करीत असे.

ग्रामप्रमुख अजून जागा झाला नव्हता. इतक्यात एक रक्षक मदतनीस धावत, धावत नाईकाकडे आला. त्याची छाती लोहाराच्या भात्याप्रमाणे खाली-वर होत होती. तो काहीतरी बातमी घेऊन आला होता. नाईकाला बातमी केंव्हा देतो असे त्याला झाले होते; पण नाईक अजून जागे व्हायचे होते. तो रक्षक नाईकाच्या घरासमोर इकडून तिकडे फेऱ्या मारू लागला. हातात त्याच्याच उंचीची वेळूची जाडजूड काठी असलेला तीक्ष्ण भाला होता. राहून, राहून भाला उजव्या हातातून डाव्या हातात तर डाव्या हातातून उजव्या हातात बदलण्याचा चाळा तो करीत होता.

एवढ्यात नाईक जागे झाले. रक्षक मदतनीसाला पाहून ते बाहेर आले. काही बातमी असली की, मदतनीस असेच येत असत. काही तरी प्रसंग गुदरला असावा असे त्यांनी मनात ताडले होते. रानात जसे कुठे घुमट—घुटरान वास आला की जवळपास जनावर असल्याची जाणीव व्हावी, तसे रक्षक मदतनीस समोर आला की काही तरी विपरीत घडल्याची नाईकाला आपोआपच अनुभवाने जाणीव होत होती, रक्षक मदतनीसाने अदबीने 'सेवा, नाईक, जयसेवा,' म्हणून प्रणाम केला. उघड्या अंगाच्या, भरदार छातीच्या नाईकाने हात उंचावून प्रतिसाद दिला. तो बलदंड देहाचा, वाघासारख्या जबड्याचा, गुच्छेदार मिशांचा काळाभोर नाईक रेड्यावर बसून निघाला की, प्रत्यक्ष यमदेवालाच भगवान महादेवाने पाठविल्याचा लोकांना भास होई. 'हू ऽ ऽ कसली गडबड ?' नाईकाने रक्षक मदतनीसाला बातमी सांगण्याची आज्ञा केली. 'महाराज, बिरजू कुमराने एका लहान बालकाचा कालीमातेला बळी दिला. ही बातमी कळताच रक्षक मदतनीस बिरजू कुमराच्या घराभोवती गराडा घालून उभे आहेत. सर्वजण आपली वाट पहात आहेत. ग्रामवासी मंडळी सगळी तेथे जमा होऊन गर्दी होते आहे.' रक्षक मदतनीसाने

बातमी दिली.

अगदी बेफिकीरपणे नाईकाने हूं ऽऽ म्हणून परत घरात प्रवेश केला. अगदी क्षणातच तयार होऊन तो बाहेर आला. हातात भला मोठा भाला घेतला. मोरपिसांनी तयार केलेला टोप डोक्यात घातला. गळ्यात रंगीबेरंगी मोठ्या मणक्यांच्या माळा, कमरेभोवती गुडघ्यापर्यंत आखूड पंचा व खांद्यावर एक पंचा घेतलेला नाईक वाघाच्या चपळतेने मदतनीसासोबत निघाला. नाईक आणि रक्षक मदतनीस बिरजू कुमराच्या घरापाशी येईपर्यंत सर्व ग्रामवासी तेथे गोळा झाले होते. नाईक तेथे पोहचले. तोच सर्वांनी, 'सेवा नाईक, जयसेवा,' असा एकच आवाज केला. नाईकानेहि हात उंच करून सर्वांना प्रतिसाद दिला. 'सगाजी शांत व्हा. फिर्यादीला पुढे आणा.' नाईक बोलला तोच एक महिला ओक्सा-बोक्सी रडत, छाती बडवीत नाईकापुढे आली. तिच्या मागे तिचा पती होता. तोही रडत होता.

'नाईक, न्याय द्या. माझा पाच वर्षांचा कोवळा बाळ बिरजू कुमराने देवी मायला अर्पण केला. त्याचा बळी दिला नाईक, न्याय द्या. नाईक ऽऽ' महिलेने हंबरडा फोडला. नाईकाने रक्षक मदतनीसाला बिरजू कुमराला पुढे आणण्यास सांगितले. बिरजू कुमराला नाईकासमोर आणण्यात आले. बिरजू कुमरा आणि त्याचे कुटुंबीय भगवान पेरसापेनची आराधना करण्यात गुंग होती. बिरजू कुमरा पुढे येताच नाईकाने हातातील भाला उंच नेऊन जमिनीत जोराने रुतवला. ही जणू बिरजू कुमराला मरणाची सूचनाच होती. बिरजू कुमरा निर्विकार मुद्रेने चूपचाप उभा होता. नाईकाने बिरजूला दरडावून विचारले, 'बिरजू, बोल, का दिलास नरबळी ? कोठे ठेवलेस मुलाचे शव ?'

बिरजूला आता काहीच सुचत नव्हते. काय बोलावे याचाच जणू आता तो विचार करीत होता. जमा झालेले लोक मुलाच्या आईचा आक्रांत पाहून तळतळत होते. आता आपलेहि मरण आले म्हणून बिरजूसह सर्व कुटुंबीय महादेवाचा धावा करीत होते. वारंवार दोन्ही हात जोडून, हात वर नेऊन तोंडाने काही तरी स्मरण केल्यागत अस्पष्टपणे पुटपुटत होते.

नाईकाने पुन्हा बिरजूला दरडावले, 'भगवान पेरसापेन साक्षी आहे, त्याच्यावरच आमचा भरवसा आहे.' एवढेच बिरजू बोलला. पण यावरून गुन्हा कबूल केल्याचेहि स्पष्ट होत नव्हते. आणि नाकबूल केल्याचाहि भास होत नव्हता नाईकाने काही तरी विचार करून रक्षक मदतनीसांना बिरजू कुमराच्या घराची कसून झडती घेण्यास सांगितले. हुकूम होताच आठ-दहा रक्षक मदतनीस, रानकुत्रे सावजावर जंगलात तुटून पडावे तसे बिरजूच्या घराची झडती घेण्यास सरसावले. सर्व तपास घेतला. कुठेच काही मिळाले नाही. शेवटी कोपऱ्यात उपडे ठेवलेल्या मोठ्या टोपल्याकडे रक्षकांचे लक्ष गेले. सर्वजण टोपल्याकडे सरसावले. तिथे त्यांना रक्तहि सांडलेले दिसले. सर्वांना पुरावा सापडल्याचा आनंद झाला. सर्वांचे चेहरे आनंदाने फुललेले दिसत होते. एका रक्षकाने टोपले उचलण्यासाठी हात सरसावला तोच दुसऱ्याने त्याला अडवित म्हटले, 'सगाजी, नाईकांनाच घऊन या इथे. त्यांच्यासमोरच उघडू हे टोपले आपण !

'आपण आधी खात्री करून घ्यायला काय हरकत आहे ?' तिसरा बोलला.

'हेहि खरंच आहे उघडा टोपले !' चवथा म्हणाला. लगेच एकाने टोपले उघडले. ते दृश्य पाहून कोणाचेहि हृदय हेलावून गेलेच असते. कोवळ्या पांच वर्षाच्या मुलाचे शिर कापून धडावेगळे केले होते. धडाची घडी केल्यागत ठेवले होते. ते दृश्य पाहून रक्षक मदतनीस दुःखी झाले. सर्वजण टोपले पुन्हा मुलाच्या शवावर झाकून तेथेच उभे राहिले. बिरजू कुमराचा प्राण धोक्यात आल्याची त्यांची बालंबाल खात्री झाली होती. त्यांच्यापैकी एकजण नाईकांना बोलावण्यासाठी गेला. लगेच नाईक मदतनीसासोबत मुलाचे प्रेत असलेल्या ठिकाणी आले. जवळपास रक्त सांडलेले पाहून नाईकांची खात्री पटली. लगेच नाईकांनी इतरांना टोपले उघडण्यास न सांगताच उतावीळपणे स्वतःच टोपले उघडले. पाहतात तो तेथे बकरीचे जिवंत करडू झाकलेले दिसले. हा चमत्कार पाहून रक्षक मदतनीस तर रक्त गोठल्यागत थंडगार पडले होते. नाईक मदतनीसावरच उखडले. 'न पाहताच मला बोलावले. आधी टोपले उघडून पाहायचे तर असते !' पाहिलेला चमत्कारसुद्धा सांगण्याची आता काही सोय नव्हती. रक्षक मदतनीस एकमेकांकडे आश्चर्याने पहातच राहिले. क्षणापूर्वी जेथे मुलाचे प्रेत होते, तेथे बकरीचे जिवंत करडू ! बरे, डोळ्यांनी पाहिलेला चमत्कार कोणाला सांगावा तर विश्वास कोण ठेवणार ?

इकडे एक उघडे-नागडे मूल रडत रडत आईचा शोध घेत गर्दीत घुसले. आईने मूल पाहताच त्याला आधाशीपणाने उचलून पोटाशी धरले व पटापट मुके घेती झाली. आतुरलेले लोकहि निश्चिंत झाले होते. नाईकांनी झाला प्रकार पाहून सर्व उपस्थितांची क्षमा मागितली. बिरजूचीसुद्धा क्षमा मागून सर्वांना घरोघरी जाण्यास सांगून नाईक व मदतनीस तिथून शिकार न गवसलेल्या शिकाऱ्याप्रमाणे निराशेने चालते झाले.

बिरजू कुमरा व त्याचे कुटुंबीय सारखा भगवान महादेव, पेरसापेनचा धावा करीत होते. देवाने त्यांची हाक ऐकलीहि होती. संकटातून त्यांना मुक्त केले होते. टोपल्यात मुलाच्या प्रेताऐवजी बकरीचे करडू ! हा चमत्कार बिरजूलासुद्धा धक्कादायक होता. पण सुखद होता. त्याला जीवदान मिळाले होते. त्यांचा नवा जन्म

झाला होता. सर्व कुटुंबीय घरी गोळा झाली. पेरसापेन भगवान प्रसन्न झाल्याने सर्वांचे चेहरे आनंदाने खुलून निघाले होते. सर्वांनी मिळून सायंकाळी पेरसापेनचे पूजन करायचे ठरवले. सर्व ग्रामवासियांना आमंत्रण देण्यात आले. स्वयंपाकाची तयारी झाली. काही इसम दारुसाठी इकडे-तिकडे पाठविले गेले. गावपुजारी आले. देवपूजा मांडली. बिरजू कुमरा पाच देववाला होता. म्हणून पुजाऱ्याने पाच मुठी धान्य पाच ठिकाणी मांडले. कुंकू, गुलाल, शेंदूर त्यावर सोडण्यात आले. धूपाचा घमघमाट सुरू झाला. इकडे सर्व सगे दारु पिण्यात व ढोल वाजवून नाचण्यात दंग झाले होते. बिरजू देवपूजेला आला, सारे कुटुंबीय सोबत आले. बिरजूने पाच देवांची स्थापना पाहून पुजाऱ्याला सांगितले, 'आज भगवान पेरस.पेनांनी प्रत्यक्ष बकऱ्याच्या रूपात येऊन माझे आणि माझ्या कुटुंबीयांचे प्राण वाचवले. तेव्हा त्यांचे स्मरण म्हणून हा एक देव मी मांडतो आहे. आजपासून मी सहा देववाला कुमरा होत आहे. 'हर्रे कुमरा' म्हणून माझे वंशज ओळखले जातील.' पुजाऱ्याने धान्यांच्या पाच मुठी मांडल्या होत्या त्यांच्या बाजूनेच बिरजूने धान्याची एक मूठ मांडली. गुलाल, शेंदूर सोडून भक्तीभावाने बेलपाने व गोंगळाची फुले यांचा बिरजूने सहाहि देवांवर अभिषेक केला. तेव्हापासून पाच देववाला बिरजू कुमरा सहा देववाला कुमरा झाला. त्याचे वंशज सहा देवे कुमरे अजूनहि स्वतःला 'हर्रे कुमरा' संबोधतात. बकऱ्याचे मांस ते मुळीच खात नाहीत. ■

उत्तरखंडात अभ्यास–मोहीम

जंगलतोडीमुळे उत्तरखंडात झालेले नुकसान, त्यामुळे बिघडलेले निसर्ग-संतुलन सावरण्यासाठी स्थानिक पहाडी-आदिवासी लोकांनी योजलेले उपाय व त्यातून निर्माण होत असलेली पर्यावरणाची व्यापक जाणीव यांचा प्रत्यक्ष अभ्यास करण्यासाठी उत्तराखंडात एक अभ्यास-मोहीम आयोजित करण्याचा महाराष्ट्र मानव-विज्ञान परिषदेचा प्रयत्न आहे.

आदिवासींच्या व निसर्ग-संतुलनाच्या प्रश्नात आस्था असलेल्या पन्नास जणांचा गट या अभ्यास-मोहिमेत सहभागी होईल. मोहिमेची सुरुवात डेहराडूनच्या 'राष्ट्रीय वन-संशोधन संस्थेस' भेट व तेथील वन-अधिकाऱ्यांशी चर्चा यापासून होईल. नंतर पथकाची पाच गटांत विभागणी होऊन टॉनस्, यमुना, भागीरथी, अलकनंदा, रामगंगा या उत्तरखंडातील पाच प्रमुख नद्यांच्या उगमाकडील पाणलोटक्षेत्राकडे एकेक गट रवाना होईल.* तेथील पंधरा दिवसांच्या वास्तव्यात व पदयात्रेत प्रत्येक गट विविध गावांना भेटी देईल आणि प्रश्न-पत्रिका व चर्चेद्वारे पर्यावरणविषयक समस्यांची, तसेच गावकरी योजत असलेल्या उपायांची प्रत्यक्ष माहिती घेईल. नंदादेवी, कामेत, नीलकंठ यासारख्या उत्तुंग गिरिशिखरांचा हा प्रदेश निसर्गरम्य तसाच साहसाला आव्हान देणारा आहे.

पर्यावरणविषयक व्यापक जाणीव व साहसी वृत्ती जागविणाऱ्या या मोहिमेत सहभागी होण्याची इच्छा असणाऱ्यांनी नाव, पत्ता, वय, शिक्षण, पूर्वानुभव इत्यादि तपशिलासह पुढील पत्त्यावर ताबडतोब संपर्क साधावा.

सचिव, 'महाराष्ट्र मानव–विज्ञान परिषद' द्वारा मानव–शाखा विभाग,
पुणे विद्यापीठ, पुणे ४११ ००७.

* ('हाकारा'–जुलै अंकामधील 'चिपको' लेखातील नकाशा बघावा.)

लोकगीतांची मोहनमाळ



शब्दांकन - प्रफुल्ल देव

सातपुड्याच्या पर्वतातील, मेळघाटातील नयनमनोहर दऱ्याखोऱ्या ! त्यातील साग, ऐन, धावडा आदि वृक्षांनी व्यापलेला सुरम्य परिसर !! आणि अशा वनश्री, नगश्रींनी नटलेल्या परिसरात निसर्गाच्या उत्फुल्ल सहवासात बेधुंदपणे जगणारी आदीवासी जमात– 'कोरकु' !!!

हे कोरकु कबाडकष्ट करून कसे तरी उदरनिर्वाह करतात. दिवसभर कष्ट, कष्ट आणि कष्ट ! आणि मग रात्री 'शिडु' (दारू) च्या कैफाचा धुंद आस्वाद ! सगळं आयुष्य याच दोन रुळांवरून धावत असतं ! आणि मध्येच कधी तरी, एखाद्या चांदण्या रात्री कुठं तरी ढोल-पावा वाजू लागतो. लोकगीताचे सूर वातावरणात पसरू लागतात आणि मग गितामागून गीत त्या आदिवासींच्या कंठातून स्त्रवू लागतात.

कधी कुणाच्या मनात प्रेम उत्पन्न होतं, कधी कुणी विफलतेनं रडत असतो, कधी कुणी आपल्या भावी जीवनाचे रम्य स्वप्न पहात असतो, तर कधी कुणी आपल्या आराध्य दैवतांना साकडं घालीत असतो– कोणत्याहि पापाची, कोणत्याहि संकटाची छाया पडू नये म्हणून ! आणि हे सारं लोकगीताच्या रूपानं फुलत असतं ! त्याच्या सुगंधानं सारा मेळघाट धुंद होऊन जातो. एकेक गीत अंतःकरणाला छेदून जातं, हृदय हेलावून जातं ! अशा गाण्याच्या संगतीत मग तो आदिवासी 'कोरकू' आपले कष्ट, यातना क्षणभर का होईना, विसरून जातो ! खरं तर कष्टांमध्येच त्यांचा इतका वेळ जातो की, त्यांना, त्यांच्यातील नवथर तरुण–तरुणींना परस्परांबद्दल विचार करायलाच वेळ नसतो. सगळं जीवनच मुळी कष्टमय, रुक्ष, वाळवंटी ! पण तरीहि अवखळ, उन्मादक तारुण्याचा स्पर्श होताच कुणी तरी मोहरून जातो. त्याचं मन फुलारून जातं. कुणा नवयौवनेशी त्याची दृष्टीभेट होते. दोघाचं परस्परावर मन बसतं ! निरागस, निष्पाप प्रेम फुलारून येतं. मुग्ध प्रेमाचा खेळ किती तरी दिवस चालतो. तिच्या संगतीची, तिच्या सहवासाची त्याला ओढ लागते आणि अशाच एखाद्या दिवशी तिला पाहून तो म्हणतो, गाऊ लागतो–

चना खेती फूल बोदा डुबुआ
तारे आया टिका लविछ डुबुआ
चना खेती फूल बोदा डुबुआ
तारे आया छुछुरा पाया डुबुआ
चना खेती फूल बोदा डुबुआ
तारे आया लचंगा पाया डुबुआ
चना खेती फूल बोदा डुबुआ
तारे आया चोली बाया डुबुआ

(फुलांनी बहरलेल्या हरभऱ्याच्या शेतात तू मला दिसतेस, तू हळूच मला खुणावताना दिसतेस....तुझ्या पायातील पैंजण मला दिसतात....तू घातलेला सुंदर लेंगा मला दिसतो. अंगात घातलेली मनमोहक चोळी माझं लक्ष वेधते....अशी तू फुलांनी बहरलेल्या हरभऱ्याच्या शेतात मला दिसतेस !)

अशा शब्दांनी तो आपलं प्रेम व्यक्त करीत असला तरी तो धनवान नाही आणि म्हणून तो तिच्याशी लग्न करू शकत नाही आणि तीहि त्याच्याबरोबर पळून जाऊ शकत नाही. पळून जाऊन विवाह करणे त्यांच्या समाजात निशिद्ध नाही; परंतु पुत्रहीन बापाची नंतर काय स्थिती होईल ? त्याची शेती पडीत राहील. त्याचे जीवन अधिकच कष्टमय होईल. त्याच्याकडे म्हातारपणी लक्ष देण्यास कोणी नाही आणि म्हणून ती मनात असूनहि त्याच्याबरोबर पळून जाऊ शकत नाही ! मग यावर उपाय ? यावर उपाय एकच ! 'लमजाना !' तिच्या बापाकडे त्यानं 'लमजाना' राहणं ! लमजाना म्हणजे घरजावई ! लग्नापूर्वीच जावई म्हणून रहायचे ! सासऱ्याकडची सगळी कामं करायची, काबाडकष्ट करायचे ! त्याच्या मर्जीस उतरेपर्यंत ! त्या कल्पनेनेच तो काहीसा व्यथित होतो. उसासे भरू लागतो आणि तरीहि मनाचा निर्धार करून फक्त तिच्याकरिता, तो ते दिव्य करण्यास प्रवृत्त होतो. 'लमजाना' राहण्यास जाण्याकरिता निघतो. तोच

त्याचा भाऊ त्याला म्हणतो—

हरे हरे पिऊ रे, तुनी मा सोटान पिऊ रे ।
निकलेरे पिऊ झुरे
अडा दारे दादा झुरे
अडा दारेन पिऊ झुरे, पिऊ मारे ।
हरे हरे पिऊरे ।
जसा तलवार, जसा बुंडाकी
रांडी—रंडवा मसि लेवूरे, पिऊ झुरे ।
हरे हरे पिऊ रे ।

(अरे रानपाखरा, तू कोणत्या देशाला चाललास ? का असा झुरणीला लागलास ? का असा व्यथित झालास ? छे: असा दु:खी होऊ नकोस ! अरे, तुला जायचे आहे तर जा ! तुझी तलवार, बंदूक आदी सोबत ने, दुष्टांचा नायनाट कर आणि तुझ्या ह्या प्रेम-मोहिमेवर पराक्रमाने विजय मिळव जा !)

आणि अशा निर्धाराने तो आपल्या भावी श्वशुरगृही 'लमजाना' म्हणून जातो— आपल्या प्रियतमेच्या संगतीत राहता येईल म्हणून ! पण...लमजाना राहणं म्हणजे काही पूर्ण जावई होणे नाही ! तो असतो नावा-पुरता जावई आणि मुख्य म्हणजे कामा करता घरगडी ! अगदी मोफत मिळालेला — हरकाम्या ! सासऱ्याच्या घरी काम करता दिवस निघून जाई ! हाडांचा चुरा चुरा झालेला देह रात्री जमिनीवर पडताच झोपेच्या स्वाधीन होई ! खाणे—पिणे—राहणे—झोपणे सगळे सगळे अगदी घरगड्यासारखे ! जावयासारखे नव्हे ! आणि पुन्हा जिच्याकरिता हा सारा खटाटोप केला तीच—त्याच्या नजरेची शीतलता—त्याच्या मनाची मोहिनी त्याच्या हृदयाची स्वामिनी—त्याच्या प्राणाची प्रियतमा तीतर त्याच्या नजरेसहि पडत नाही ! किती किती दिवस तिचं दर्शन होत नाही. दिसलीच तर बोलण्याची चोरी ! मन आतल्या आत तडफडतं ! आणि ह्या तडफडणाऱ्या वेदनांवर ताण म्हणून की काय, त्याचा सासरा त्याची अधिकच हेटाळणी करतो,

उसरीन, उसरीन गनेरे बिजू ।
पुरी बिका बैरी ना बिजू पुरी बिका बैरी मारे
झुंगरू कमरा उंगरे जा बिजू
उसरीन, उसरीन गनेरे बिजू ।
खंडी खंडी रुकुकु जा बिजू
मानो मानो रुकुकु जा बिजू
उसरीन उसरीन गनेरे बिजू ।
कुटका सोकडा टोचना जा बिजू
डोयाने जागा ओले नारे ।
उसरीन उसरीन गनेरे बिजू ।

(हे घरजावया, तू घराच्या ओसरीत जा. तीच तुझी जागा आहे ! तू अत्यंत गरीब आहेस...तू फाटलेली कांबळ अंगावर घे तुझं अंग किती घाण झालेलं आहे...त्यावर मण मण, खंडी खंडी घाण आहे.... मिळणारा थोडसा भाकर—तुकडा तू खा...त्यावर ओंजळभर पाणी पी...अरे घरजावया, तू घराच्या ओसरीत जा !)

केवळ तिच्या—आपल्या प्रेयसीच्या स्नेहार्द्र नजरेच्या कटाक्षामुळे हेटाळणीचे असले कडू शब्द तो पचवून घेतो. दु:खाचे पर्वतचे पर्वत उल्लंघून जायचं सामर्थ्य तिच्या त्या प्रेमळ नजरेनं त्याच्या अंगी येतं !

दिवसांमागून दिवस, महिन्यामागून महिने आणि वर्षांमागून वर्षे पळत गेली ! एक प्रदीर्घ कालावधी उलटला, आणि त्याची तपश्चर्या फळाला आली. दोघांच्या लग्नाची तयारी सुरू झाली. नवदांपत्याचे वैवाहिक जीवन सुखी व्हावे, त्यांच्यावर कुठलीहि संकटे येऊ नये म्हणून त्यांचे आप्तेष्ट पुरोहिताला विनवू लागले—

घेटो भारे, घेटो भारे, घेटो भारे ।
घेटो भारे इथे परियार जा घेटो भारे
घेटो भारे, घेटो भारे ......
भुलजी परियार जा घेटो भारे
घेटो भारे, घेटो भारे .....
भुलजी परियार जा कुटरी भारे
घेटो भारे, घेटो भारे ......
भुलजी परियार जा निंबू भारे
घेटो भारे घेटो भारे ......
भुलजी परियार जा नारळ भारे ।
घेटो भारे, घेटो भारे......
भुलजी परियार जा मुरगी भारे......

हे भगता, (मांत्रिका) आमच्या पित्तरांना संतुष्ट करण्यासाठी, सर्व संकटे नष्ट होण्यासाठी तू पवित्र असे मंत्रोच्चार कर, त्या मंत्रोच्चारानं ह्या लग्न-कलश भारून टाक...ही कट्यार भारून टाक...हे लिंबू भारून टाक... हा नारळ भारून टाक...ही कोंबडी भारून टाक...)

आणि मांत्रिकाने सर्व देवदेवता व पितरांना संतुष्ट केले, कुमारिका सुवाशिणींनी त्या दोघांवर नद्यांचे पवित्र पाणी कुंभाकुंभाने आणून टाकले, दोघांचे लग्न लागले. त्याने तिच्या गळ्यात 'मोरमाळ' घातली— तिचं सौभाग्यचिन्ह म्हणून जितकी पवित्र तितकीच त्याच्या प्रेमाचं प्रतीक म्हणून अमोल अशी मोरमाळ !

त्याचं वैवाहिक जीवन सुरू झालं त्यांच्या जीवनात जणू स्वर्ग अवतरला, मेळघाटातील रान— छे: ! अलका नगरीतील नंदनवन झालं ते ! त्या नंदनवनातील तो गंधर्व आणि ती अप्सरा ! तो मदन आणि ती रती ! मूर्तीमंत श्रृंगार तिथं बहरू लागला, तो श्रृंगार पहात नक्षत्रामागून नक्षत्रे, ऋतूमागून ऋतू आले—गेले ! आणि एक दिवस—

ती शेतातून घरी आली ती अगदी मलूल होऊन ! त्यानं तिला प्रेमानं उराशी कवटाळलं, परंतु नेहमी प्रमाणे तिने प्रतिसाद दिला नाही, त्याच्या स्पर्शाने, त्याच्या कवटाळण्याने ती मोहरली नाही, तिची हनुवटी उचलून तो तिच्या ओठांवर ओठ ठेवणार तोच–तोच तिच्या अर्धअनावृत्त वक्षावर त्याचं लक्ष गेलं– आणि तोही एकदम अंतर्मुख झाला. तिच्या या मौनतेचं, उदासीचं कारण त्याला समजलं ! सदैव तिच्या वक्षावर दिमाखात रुळणारी, तिच्या सर्व सखी-मैत्रिणीत कौतुकाचा विषय झालेली, तिचं सौभाग्यचिन्हं असलेली, आणि मुख्य म्हणजे त्याने अत्यंत प्रेमाने तिच्या सुकमार गळयात घातलेली ती सुंदर मोरमाळ आज तिच्या गळयात नव्हती ! त्या मोरमाळेशिवाय तिचा नाजूक गळा कसातरीच दिसत होता– विधवेच्या कपाळासारखा ! मोरमाळेच्या स्पर्शाला वंचीत होऊन तिचे पुष्ट उन्नत उरोज कोमेजल्यागत झाले होते ! तिचं नेहमी प्रसन्न असणारं मुखकमल आज म्लानं झालं होतं ! केवळ मोरमाळ नव्हती म्हणून ! कुठे गेली ही मोरमाळ ? कुठे हरवली ? त्याच्या मनाला विचाराच्या इंगळया डसू लागल्या. त्यानं त्याबद्दल तिला विचारलं आणि तिनं उत्तर दिलं–

ये रानी, ये रानी, आमा कुवरिन मोरमाला
बाण डुगु ।
ये राजा ये राजा, इया कुवरिन मोरमाला
नदीनाला बाटीयेन ।
इसिडा धिमारु केन बुलारीये
ये धिमारु, ये धिमारु इया मोरमाला जालियोरे
मोरमाला इया आ धिमार
काकुरेन वि आमा मारे
काकुकेनती चोपरे रानी
आमानी मोर माला रे ।

(हे राणी, तुझ्या गळयातील आपल्या प्रीतिचं प्रतिक असलेली मोरमाळ दिसत नाही. कुठं ?

हे राजा माझ्या गळयातील मोरमाळ नदीत पडून वाहून गेली, तेव्हा तू कोळयाला ती काढायला सांग हे कोळया, तू जाळे टाक, मोरमाळ काढून दे. मोरमाळ काढताना जाळयात येणाऱ्या सर्व मासोळया तूच ठेवून घे. मात्र मोरमाळ माझ्या राणीला दे. त्यावर कोळी म्हणतो मी मोरमाळच पाहातो, मासळीला मी काय करू ?)

आणि तो मोरमाळ काढून देतो, दोघेहि आनंदाने विभोर होऊन जातात. पुन्हा तोच उन्माद तोच प्रणय तोच श्रृंगार आणि तीच आनंदाची, सुखाची अमृत-मधूर बरसात ! अगदी स्वतःचीच दृष्ट लागावी, असा तो अप्रतीम, अनुपम काळ ! आणि खरंच एके दिवशी त्यांच्या ह्या सोन्यासारख्या संसाराला दृष्ट लागते– त्यांचीच स्वतःची दृष्ट !

कष्टानं थकलेला तो क्षणीक सुखासाठी, श्रमपरिहारासाठी 'शिडू' चा (दारूचा) घोट घेतो. घोटामागून घोट घेतो. मोहफूलाची दारू ! त्या मोहकन्येचा हळूहळू त्याच्यावर कैफ चढतो, त्याच बेधुंद कैफात तो 'पटेल' (गावचा मुख्य राजा) कडे जातो. तिथं जुगार सुरू असतो हाहि त्यात रंगतो ! रंगतो आणि सारासार विवेक हरवून बसतो. त्याला घरादाराचे विस्मरण होते ! फुलासारख्या सुंदर, प्राणापेक्षा प्रिय पत्नीचे विस्मरण होते ! आणि त्याची ती पत्नी, ती त्याच्या वियोगानं तळमळत राहते ! त्याच्या दुरव्याने तडफडत राहते ! शेवटी ती एका शिपायाला त्याच्या-संबंधी विचारते– म्हणते–

आमा येयन जा शिपाईन इया राजा इया राजा
आमा राजा डो रानी राजाका चावलीन सुबान देन
राजाकु चावलीन डोरानी जुआ हुजुगेन
हारा टियेयेन हारा टियेयेन मकान
हारा टियेयेन येन इया
असली दोकी शिपाई डो
इमा राजा केन इरागेज ।

(हे शिपाया, माझा राजा कुठे आहे ? माझ्या राजाला तू घेऊन ये ! शिपाई म्हणतो, हे राणी तुझा राजा गावच्या राजाच्या चावडीत जुगार खेळत बसला आहे. त्या जुगारात तो हरला आहे ! त्याच्या उत्तरानं राणी अधिकच व्यथित होते, आणि म्हणते, शिपाया, माझा राजा हरला हरु तर दे ! माझा हा असली दागिना (मोरमाळ) तुझ्या त्या राजाला देऊन दे आणि माझ्या राजाला सोडवून आण !)

आणि राणी आपली प्राणप्रिय, त्यांच्या प्रेमाचं प्रतिक असलेली, स्वतःच्या सौभाग्याचा श्रृंगार असलेली, सौंदर्याचं आभूषण असलेली ती मोरमाळ शिपायाच्या हातात देते ! काहीशा दुःखाने काहीशा तृप्तीने ! कारण–

कारण त्या मोरमाळेच्या मोबदल्यात तिला मिळणार असतो– तिचा खरा दागिना ! निर्जीव आभूषणाच्या बदल्यात मिळणार असते. एक सजीव, प्राणप्रिय आभूषण ! सौभाग्य चिन्हाच्या बदल्यात मिळणार असतं– प्रत्यक्ष सौभाग्यच !

आणि ह्या विचारासरशी तिच्या मुखावर अधिकच तृप्ती विलसते ! मोरमाळेविणाहि आता तिचे उरोज पतीच्या आलिंगनाच्या कल्पनेने उस्फुल्ल होऊन धपापू लागतात ! न कळत तिच्या गालावर लज्जेची पळसफुले लालिमा पसरवतात ! डोळयात मोहफुलांची मादकता चढते ! ! आणि पतीच्या प्रतिक्षेत ती गुंगून जाते, दंगून जाते ! ! ! ■



ग्रामीण चित्रणात जिवती

धनंजय नाकाडे

आदिवासी विभागातील झाडीपट्टी भागात ' कोहळी ' या नावाने ओळखली जाणारी जमात आहे. त्यांच्या जिवती या सत्राचे चित्र म्हणजे एक अलौकिक चित्रण-प्रकार असेच त्याचे रूप न्याहळताना वाटते.

' जिवती ' श्रावण मासाचा पहिला दिवस आणि पोळयाचा सण म्हणजे शेवटचा दिवस. जिवती हा सणाचा दिवस, उत्साहाचा दिवस, चित्रणाचाहि दिवस. या चित्रणात अनेकविध विषय आणि आशय दाखविले आहेत. काळ व निसर्ग यांना मोलाचे स्थान दिले आहे. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या भारतीयांच्या चार जिवनागांचा अर्थ यात सामावला आहे. पाऊस पडत आहे. आंबराई दाखवली आहे. झाडांना फळे लागली आहेत. आकाशी सूर्य तळपत आहे. चंद्रही चांदण्याची सोबत करीत आहे. पक्षी आकाशी पावसात क्रीडा करीत आहेत. मुले पाण्यात नाचत आहेत. समोरच गरिबांच्या झोपडया दिसत आहेत. श्रावणबाळ आपल्या आई-वडिलांना मोठया भक्तिभावाने कावडीत बसवून यात्रेला घेऊन निघाला आहे. गाय खुंटाला बांधली आहे, तर कुत्रा अंगणात भुंकतो आहे.

त्यांचे मोरही माणसाळलेले आहेत.

पहाटेच्या लगबगीनं उठून गृहीणी दूधदुभत्याची कामे करीत असते. मोठयांच्या पाऊलवाटेने दुसऱ्यांनी जावे म्हणून पायांचे ठसे उमटलेले दिसतात. त्यांच्या व्यक्तिगत जीवनात सापांनाही महत्त्वाचे स्थान दिले गेले आहे. कारण पुढे नागपंचमीचा सण येणार आहे, त्याचे महत्व लक्षात घेतले आहे.

स्वस्तिकचिन्हामुळे मांगल्य आणि पावित्र्य यांच्या प्रतीकातून धार्मिकता दाखविली आहे.

पाऊस पडला, रोवणी सुरू झाली. नांगरणी, चिखलणी केली, फणीने रोवण्यास जागा यथायोग्य बनविली. ग्राम्य विभागाचे समयोचित चित्रण यात आहे. आदिवासी नृत्यही दाखविले आहे. पोळा येणार आहे, रोवणे संपणार आहे.

' कोहळी ' यांच्या जगण्यातले विश्व यात सामावलेले आहे आणि आपल्या कलात्मक कौशल्याने हे सर्व प्रसंग उभे करून अभिव्यक्त करण्याचा प्रामाणिक प्रयत्न साधला आहे. स्वर्ग, मृत्यु यांचा संयोग साधला— तर कर्मयोग आणि दैव यांचीहि सांगड घातली. जीवनाच्या अनेकविध अंगाचा सांगोपांग ऊहापोह या ग्राम्य चित्रणातून साधला आहे.

■

शिक्षक मात्र पोटासाठी–

' आजचा शिक्षकच नादान ',
सर्व ओरडताहेत ।
म्हणे, शिक्षकच जबाबदार,
ही मुले बिघडताहेत ।
हे तोडा, ते फोडा, बेलगाम
अश्व उधळताहेत ।
जणू खवळलेल्या सागरी,
लाटांशी खेळताहेत ।
बालमनावर घडवावे संस्कार,
मी ठरवतो आहे ।
शालेय चक्रावरती मृत्तिकापिंड,
मी घडवतो आहे ।
यत्नचक्र माझे अखंड,
रिंगण घेते आहे ।
पहावे ते ' विनायका ' ऐवजी,
' मर्कटच ' घडते आहे ।
कारण यास्तव काय असावे,
शोध घेत आहे ।
समाजचक्रावर अंती मी,
नजर रोखतो आहे ।
शालेय चक्राहून समाजचक्र,
विशाल गतिशील आहे ।
अंतिम आकार बालमनास,
आज तेच देत आहे ।
असूया, अनीती विषमतेचे,
धुळीत ते लोळताहे ।
मटका-जुगार, मोसंबी-नारंगीचा,
आस्वाद ते घेताहे ।
समाजचक्रावर बालमन,
जो जो आकार घेत आहे ।
राक्षसच अंती त्याच्या,
हृदयात संचरतो आहे ।
' डोक्यास दुःख, पायास पट्टी,
असेच इथे चालले आहे,
शिक्षक मात्र पोटासाठी,
पाण्यावर रेघा ओढतो आहे ।

–सुखदेव बाबू उईके



इस्कूलता वायरा पेकुर–

इस्कूलता वायरा पेकुर इस्कूलता वायरा
इस्कूलता घंटी निम्मे मुन्ने केंजारा ॥ ध्रु० ॥
निवा यायल इंता तेलेंनेके दाकोम
बाबालू इंतोर वेटानेके दाकोम
इद्रमता कबाडू केमा निमारा ॥ १ ॥
निवा बाबो कागदी वाघी किया पुन्नोर
सहि किम इतेके आंगटा दोसांतोर
इदसाठी पेडू निम्मे प्याके प्याके मन्मारा ॥ २ ॥
अडानीता फायदा सावकार येतीतोर
नीवा मालमत्तातून बुडचाम कितोर
इद पोलो निम्मे चित्ताते तासारा ॥ ३ ॥
आदिवासीसाठी सरकार इस्कूल खुला कितोर
मीकू सुदरेंम कियाला माकू इगा लोहतोर
रोज रोज इस्कूल वासी मराठी कार्थारा ॥ ४ ॥

–चांदेकर गुरुजी

(–शाळेत ये रे. मुला शाळेत ये रे शाळेची घंटा प्रथम ऐक.

१. तुझी आई म्हणते (मासे धरण्यासाठी ओढयात लावलेल्या) सापळ्याकडे जाऊ. तुझे बाबा म्हणतात शिकारीला जाऊ. असले काम तू करू नकोस.

२. तुझे बाबा कागद–वाचन जाणत नाहीत. सही कर (म्हटले) तर अंगठा देतात, यासाठी मुला, तू मागे मागे राहू नकोस.

३. (तुमच्या) अडाणीपणाचा फायदा सावकार उचलतो. तुमची संपत्ती तो हडप करतो. हे म्हणणे तू तुझ्या मनात ठेव.

४. आदिवासींसाठी सरकारने शाळा उघडल्या आहेत. तुम्हाला सुधारण्यासाठी आम्हाला (गुरुजींनी) इकडे (आदिवासी भागात) पाठविले आहे. (तेव्हा) रोज रोज शाळेत येऊन मराठी शिका.) ■



गर्जा आदिवासी गर्जना

आदिवासींनो ! या हो या, गर्जा ! आदिवासी गर्जना ।
सारेची एक होऊनी, गर्जा, आदिवासी गर्जना ।। ध्रु० ।।
पुरातन आहे गड्या रे, आपुली थोर संस्कृती ।
वनाचे तुम्ही निवासी, वनराजाचेहि साथी ।
दाखवा जंगली बाणा, गर्जा, आदिवासी गर्जना ।। १ ।।
सिंहाचे सिंह तुम्ही रे, खरे रूप दाखवा आता ।
फोडा डरकाळी भयाण, ठेचा नाठाळाचा माथा ।
घाबरू द्या हो दुष्टांना, गर्जा,आदिवासी गर्जना ।। २ ।।
सुखदेव सांगतसे तुम्हा, जरी का कोणी फसवती ।
लागा त्याच्याच पाठीशी, अशांची जिरवा मस्ती ।
करुनी दृढ संघटना, गर्जा आदिवासी गर्जना ।। ३ ।।

—सुखदेव बापू किलनाके

आदिवासींनो झुंजा !

आदिवासींनो झुंजा । धरोनी एकीचा झेंडा ।
सरकाराच्या पुढे मांडा । अपुले मांडा,
आपुले प्रश्न मांडा ।। ध्रु० ।।
काही विशिष्ट भागाशी । गणती क्षेत्र आदिवासी ।
त्यातील जे कुणि रहिवासी । त्यांना म्हणती आदिवासी ।
बाकी काय दगडधोंडा ? ।। अपुले ।। १ ।।
बाप जर अशाभागी राही । म्हणुनिका आदिवासी होई ?
पुत्र जर दुसरीकडे जाई । म्हणुनिका आदिवासी नाही ?
उचला न्यायाचा बडगा ।। अपुले ।। २ ।।
आदिवासी कोण आहे । शासन इकडे ना पाहे
जाती बदलुनि जो जो ये । आदिवासी तो होताहे ।
असे का व्हावें मला सांगा ! ।। अपुले ।। ३ ।।
आदिवासींच्या लोका । नोकरी किती जना देता ? ।
अमुचे प्रमाण किती भरता । किंवा दुसरेची घेता ? ।
याची असे मला शंका ? ।। अपुले ।। ४ ।।
शासनापासून समित्यात । हक्क हे अमुचे असतात ।
परंतु अमुच्या जीवनात । आम्हाला मुळी न मिळतात ।
सुखदेव म्हणे चला भांडा ।। अपुले ।। ५ ।।

—सुखदेव बापू किलनाके

पाषाण

पुसता कशास आता हा दर्प पाउलांचा ।
पडलो युगायुगांचा पाषाण पायरीचा ।।
प्रासंगता फुलांची करता कशास वृष्टी ।
जोडे किती खिळ्यांचे रुतलेत भाग पृष्ठी ।
कळला उपाय तुमचा अधांत तारणाचा ।। १ ।।
जडभार पातकांचे साहून त्रासलो मी ।
फलभार वंशजांचे अशात घातले मी ।
कोणी मध्ये म्हणावा " तू रे इथे कधीचा " ।। २ ।।
पिढ्या पिढ्यात खचतो रुततो धरेत अर्धा ।
माझ्यावरी उड्डाणे...! परस्परात स्पर्धा ।
' तू अग्रणी यशाचा ' म्हणतात शल्य वाचा ।। ३ ।।
ती मंदिरे घरळली मजल्यात सात मजली ।
पायात दाबलो मी छातीत भिंत बसली ।
अवशेष का उरावा अपमानिता जिवाचा ।। ४ ।।

—ल. सु. राजगडकर

गरिबी आणि सामाजिक विषमतेविरुद्ध लढा नव्या महाराष्ट्र सरकारचे धोरण

● अल्पभूधारकांची ४९ कोटी रुपयांची कर्जमुक्ती.

● ५८,००० कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी सहकारी बँकेला ८·१५ कोटी रुपयांची भरपाई.

● २ लाख ५०हजार शेतकऱ्यांना लाभदायक अशी २३ कोटी रुपयांच्या कर्जांची पुनर्आखणी.

● लहान शेतकऱ्यांना खताच्या वाढलेल्या किंमतीवर अर्थ सहाय्य.

● ग्रामीण भूमिहीनांच्या घरकुलासाठी १५०० रु. ऐवजी आता २००० रु.

● पूर्वी १५० रु. पर्यन्त किंमतीची घरे मिळालेले भूमिहिनही या योजनेस पात्र.

● घरकुल योजना १५,००० पर्यन्त लोकवस्तीच्या 'क' वर्गीय नगरपालिकांनाही लागू.

● तारण देऊ न शकणाऱ्यांना प्राप्तीदायक रोजगार मिळावा म्हणून कर्ज पुरवठा.

● सुशिक्षित बेरोजगारासाठी असलेल्या बीज भांडवल सहाय्य योजनेत बदललेल्या परिस्थितीनुरुप फेरबदल.

● विशिष्ट भागातील औद्योगिक घटकांना लागू असलेली भांडवल सवलतीची योजना अविकसित भागातील सर्व औद्योगिक घटकांना लागू.

● तालुका-पंचायत समिती क्षेत्रात जाणाऱ्या औद्योगिक प्रकल्पांना अधिक सवलती.

● येत्या पांच वर्षात ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याचा निर्धार.

● योजनेअन्तर्गत चालू वर्षात ४५७९ खेड्यांना पाणी-पुरवठा.

● झोपडपट्टी रहिवाशांचे जीवन सुधारण्यावर भर.

हे साध्य होण्यासाठी २० कलमी कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी.

K. CHANDU

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ द्वारा प्रकाशित

आदिवासींची वास्तुशास्त्र कला

का. रा. रडे

चंद्रपूर जिल्ह्यातील निसर्गाच्या सान्निध्यात स्वछंदी मनाने जीवन जगत असणाऱ्या आदिवासींनीसुद्धा साहित्य, कला, शिल्प यांत आगळेपणा निर्माण केलेला पाहून कुतूहल वाटल्याशिवाय राहात नाही. निसर्गाच्या संपूर्ण अंगाशी लाडीगोडी करून अनंत कष्टाचे दुःख विसरून निसर्गाशी हसणारा, संपूर्ण जीवनच निर्सगमय बनविणारा असा हा मानव खरोखरच धन्य आहे.

आदिवासी साहित्याचा वाचकांना आजपर्यंत स्पर्श झाला नाही. याचे कारण एक तर त्यांचे साहित्य परंपरागत तोंडी असे. अक्षररूपाने लिहून ठेवण्याची त्यांना गरज वाटली नाही. किंवा साधनांच्या अभावी शक्य झाले नाही. आज जे काही उपलब्ध आहे ते त्यांच्याकडून ऐकून तयार करण्यात आले आहे. नृत्य, विवाह, धार्मिक उत्सवप्रसंगीच त्यांच्या साहित्याचा आविष्कार होता. नादलुब्ध वातावरणात, तालाचा झंकार, यौवनाने उफाळलेल्या सुगंधाचा, निसर्गाच्या वातावरणाचा आल्हाद रंगीबेरंगी कपडे, पिसे यांची सरमिसळ, दारुचा कैफ अशा वातावरणातूनच कलेचा आविष्कार घडत असतो. साहित्य रसपूर्णरित्या वाहत राहाते.

वास्तुकलाशास्त्रातही आदिवासी मागे राहिलेले नाहीत. स्वतःचा निसर्गाशी जुळणारा असा नवीन आगळेपणासुद्धा त्यांनी निर्माण केलेला आहे.

शौर्याचे प्रतिक

चंद्रपूरचा क्रमाने नववा गोंडराजा सूरज याने हत्तीवर आरूढ असलेला सिंह हे शौर्याचे प्रतिक आपले राजचिन्ह केले. गोंड लोकांच्या प्रत्येक किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर (उदा. चंद्रपूरचा जटपुरागेट बल्लाळपूर, वैरागड, टिपागड, भामरागड येथील प्रवेशद्वार, राजवाडा) हे राजचिन्ह आढळते. एक सिंह हत्तीच्या पाठीवर चाल करून एका पंजाने त्याची सोंड धरून ओढीत त्याच्या पाठीवर उभा आहे. हे प्रतीक दगडावर कोरलेले आहे. अशा प्रकारचे राजचिन्ह निसर्गाच्या सान्निध्याशी एकरूप असलेल्या आदिवासीयांचा आगळेपणा दाखविते. इतर राजघराण्यांपेक्षा हा प्रकार वेगळाच आहे.

प्रत्येक किल्ल्याचे बांधकाम चुना आणि दगडाचे आढळते. पश्चिम महाराष्ट्रात विशेषतः खान्देशात भिल्लांनी, विशेषतः पावरे यांनी आपले भुईकिल्ले (लहान आकाराचे) बांधले आहेत ते सर्व दगड आणि पांढऱ्या मातीचे. तोरणमाळचा किल्ला आणि चांदवड जवळील किल्ला याची साक्ष देतात. त्यांचे राजचिन्हहि वेगळे आहे. धनुष्यबाण हाती घेऊन सिंहाची शिकार करणाऱ्या निर्भीडवृत्तीच्या मानवाचे चित्र त्यांनी कोरलेले आहे. मात्र किल्ल्यातूनच चोरवाटा, भुयारे इतकी आहे की कठीण समयी शत्रूस फसवून सहीसलामत पळून जाता येत असे !

मध्यप्रदेशातील जगदलपूर, छत्तीसगड, मांडवगढ, जबलपूर या भागातील आदिवासीयांचे किल्ले आणखी वेगळाच नमुना दर्शवितात. त्यांचे राजचिन्ह, बांधकाम कलासुद्धा इतरांपेक्षा निराळी जाणवते. यांच्यात एक मात्र साधर्म्य म्हणजे किल्ल्यातून बाहेर व आत येण्यासाठी भुयारे, तळघरे आहेत. त्यामुळेच बरीच वर्षेपर्यंत हे टिकाव धरून होते. विशेषतः मांडवगढच्या राणी दुर्गावतीचा किल्ला इतका भक्कम होता की, अकबराच्या सुरुवातीच्या फौजेचे तेथे काहीच चालले नाही. नंतर आसफखानाने अकबराच्या सल्ल्यावरून फितुरी माजवून किल्ला हस्तगत केला. त्यावरून किल्ल्याचे बांधकाम किती मजबूत होते याची कल्पना येते. किल्ल्याच्या चारहि बाजूने खोल खंदक, चारहि बाजूने तटाच्या आडोशाने उभे राहून विषारी बाणांचा वर्षाव करता येण्याची सोय, इत्यादी पाहून त्यांची कल्पकता जाणवते.

इस्लामी संस्कृतीची छाप

मध्यप्रदेश आणि चंद्रपूरचे आदिवासी राजे यांच्यावर इस्लामी संस्कृतीची छाप पडलेली जाणवते. किल्ल्याच्या प्रवेशद्वाराजवळील उंच मनोरे, काही ठिकाणी लाल दगडाचा वापर स्वतःला शाहा ही पदवी, ठिकठिकाणी चौक्या पहारेकऱ्याची जागा इत्यादी नमुने इस्लामी संस्कृतीची छाप दाखवितात.

आदिवासींच्या वास्तुशिल्पशास्त्रात इस्लामी छटा असण्याचे कारण हेहि असू शकेल की, त्या काळात सर्वत्र इस्लामी राज्य होते. महान भारतीय संस्कृतीची, राष्ट्राची एकात्मता असण्याचा किंवा इस्लामी राजेलोकांशी राजकीय आपलेपणा दर्शवून स्वतःची सुरक्षितता राखण्याचा हा प्रयत्न असावा. असे अनेक विचार मनात येतात; परंतु ऐतिहासिक दृष्टया विचार केला तर निश्चित सांगता येते की काही इस्लामी कारागिर व काही आदिवासी कारागिर यांच्या संमिश्र विचारांनी ही बांधकामे झालेली असावी.

किल्ल्यांचे बांजकाम करीत असताना आणखी एक दृष्टीकोन त्यांनी समोर ठेवलेला दिसतो तो म्हणजे सर्व किल्ले घनदाट जंगलांनी व्यापलेल्या प्रदेशातच बांधले

आहेत. प्रत्येक किल्ल्याच्या आत बालेकिल्ला, महाल, राजकुटुंबीयांसाठी स्नानाची व्यवस्था, पुजेसाठी मंदिरे, घोड्यांच्या, हत्तींच्या पागा, सैन्यांची राहण्याची व्यवस्था व इतर व्यवस्था दिसते.

चंद्रपूर जिल्ह्यात टिपागडच्या किल्ल्याच्या बांधकामात गोंड राजेलोकांनी आपले कसब ओतलेले दिसते. जवळजवळ दीड-दोन मैल उंच पर्वत टेकडीवर हा किल्ला बांधला आहे. त्या किल्ल्याच्या टेकडीच्या चारही बाजूने खोल खोल दऱ्या, उंच पर्वत, अती निबिड अरण्य की पाच फुटावरसुद्धा काय आहे हे समजत नाही. इतक्या निबिड अरण्याच्या प्रदेशात केवळ मोठमोठ्या दगडांनी बांधलेला किल्ला आहे. त्या उंच किल्ल्यावर अतिशय खोल (आजपर्यंत त्याची खोली जाणून घेणे अशक्य झाले आहे.) असा मोठा तलाव. याच तलावातून उगम पावणारी टीपागडी नदी, काश्मिरी निसर्गसौंदर्य, सर्वच काही आश्चर्यकारक आहे. राणीचा महाल तर अतिशय मोठ्या शिलाखंडांनी रचलेला असा आहे. असा महाल भारतात तरी कोणत्या राजाने बांधलेला ऐकिवात नाही. प्रत्यक्ष जाऊन पाहिले म्हणजे या राजेलोकांच्या बांधकामाची कल्पना येते. टिपागड अतिशय मजबूत असल्याकारणाने शेवटपर्यंत अजिंक्य राहिला व जगाच्या माहितीच्या दृष्टीने दूर राहिला. कारण सहजासहजी तेथे जाणे कठीण आहे. शिवाजीमहाराजांनी सह्याद्रीच्या कुशीत किल्ले बांधताना जी योजकता, दूरदर्शीपणा दाखविला तो या किल्ल्याच्या बाबतीत जाणवतो. राणी दुर्गावतीचा किल्लासुद्धा याच नमुन्याचा वाटतो. यावरून आदिवासींना जंगलात राहणारे, अती मागासलेले म्हणण्यातील खोटेपणा सिद्ध होतो.

चंद्रपूरचे महाकालीचे, अचलेश्वर महादेवाचे मंदिर, बुरखेडा पंचायत समितीतील (चंद्रपूर जिल्हा) चोप कोरेगावचे मंदिर, चंद्रपूरपासून दोन मैल अंतरावरील जंगलात असलेला मूर्तिशिल्पपट पाहिला म्हणजे आदिवासी; धार्मिक विचार, मूर्ती, वास्तूरूपाने साकार करण्यात तरबेज होते हे सिद्ध होते. महाकाली, अचलेश्वर महादेवाचे मंदिर शिल्पकलेच्या दृष्टिकोनातून विविधता दर्शविते. गुप्त, वाकाटक, सातवाहन राजेलोकांनी निर्मिलेल्या शिल्पकलेइतकी प्रगत, सुसंबद्ध कालनिपुणता नसली तरी त्यांच्या मानाने बरीच चांगली कला निर्माण केली असे म्हणावे लागते. अचलेश्वराच्या मंदिरातील भिंतीवर अनेक प्रासंगिक शिल्पपट कोरलेले आहेत. वेरूळच्या कैलासलेण्यात रामायण-महाभारतातील घटना दर्शविणारा शिल्पपट आहे त्याच धर्तीवर येथेही शिल्पपट आहे. यात मात्र विष्णूचे सर्व अवतार, नृत्यप्रकार इत्यादी कलानमुने अप्रतिम वाटतात. महाकालीमंदिराची भव्यता, गांभीर्यपूर्ण वातावरण पाहिल्यानंतर मन तृप्त होते. त्यांच्या काळापासून आजतागायत दरवर्षी मोठी यात्रा भरते. पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, संपूर्ण विदर्भ, मध्यप्रदेश, आंध्र प्रदेशातून भाविकगण दरवर्षी दर्शनासाठी येतात. साक्षात्कार, दैविक भावनाबरोबर बांधकामाची, त्यातील रंगीतकलानमुन्याची सतत आठवण राहते.

कलानैपुण्याची साक्ष

गोंडराजा धुंड्या रामशहाच्या कारकीर्दीत चंद्रपुरातील रायप्पा नावाच्या एका धार्मिक वृत्तीच्या व्यक्तीने जंगलात निर्माण करून ठेवलेल्या कलाकृती आश्चर्याने तोंडात बोट घालावयास लावणाऱ्या आहेत. रायप्पाने महादेवाचे एक मोठे मंदिर बांधण्याची परवानगी राजाकडे मागितली. मंदिर बांधकामापूर्वी मूर्ती तयार करण्याचे काम हाती घेतले. कारण मध्ये शंकराची पिंड स्थापन करावयाची व आजूबाजूला बाकीच्या मूर्ती ठेवावयाच्या अशी त्याची योजना होती; परंतु काम संपत आले असतानाच मृत्यू आल्याने मंदिर पूर्ण झाले नाही; परंतु मूर्तीशिल्पपट आजही तयार आहे. प्रत्येक कोरीव मूर्ती कलानैपुल्याची साक्ष देते. सर्व मूर्ती विशालकाय आहेत. २६ फूट लांब, १८ फूट रुंद, ३ फूट जाड या आकाराची, डाव्या हातात शिरकमळ, अंगावर दागिने, उरोभाग उन्नत अशा कलेची दशमुखी दुर्गेची मूर्ती विलक्षण प्रेक्षणीय आहे. या मूर्तीच्या खालोखाल १५ फूट उंचीची एक महिषासुरमर्दिनीची मूर्ती आहे. डाव्या हातात भाला आहे. भाल्याचे टोक महिषासुराच्या कमरेत घुसले आहे. उजवा पाय रेड्याच्या पाठीवर व डावा पाय डोक्यावर आहे. मत्स्यावतार व कूर्मावतार यांचे प्रतीक म्हणून मासा व कासव यांच्याहि मूर्ती आहेत. जवळच प्रचंड अशी शंकराची पिंड व समोर नंदी नंदीच्या बाजूला दगडातून कोरलेला व त्याच दगडाला चिकटून दिसणारा एक हत्ती आहे. हनुमान, गणपती यांच्याहि मूर्ती आहेत. गजाननाच्या हातात परशू असून डोक्यावर पंचमुखी नागाची फणा आहे. शेषशायी भगवानाची मूर्ती–शेषाला एकच फणा असून आजूबाजूला लहान लहान दोन नाग आहेत. या मूर्तिसमूहात शंकराची एक प्रचंड चतुर्भुज मूर्ती असून तिच्या डाव्या हातात त्रिशूळ, रुंड व उजव्या हातात परशू व डमरू आहेत. या मूर्तीजवळच एक कालभैरवाची मूर्ती आहे. या मूर्तीच्या उजव्या हातात गदा व डाव्या हातात नरोटी आहे. दक्षिणेकडे एक द्वारपाल, डोक्यावर भले मोठे पागोटे व डाव्या हातात दंड घेऊन उभा आहे. या मूर्तिसमूहात ५ फुटांपासून २६ फुटांपर्यंत लहानमोठ्या १५ शिल्पाकृती आहेत.

शिल्पाकृतीचे असे अनेक नमुने आदिवासी गोंड राजेलोकांच्या प्रोत्साहननाने निर्माण झालेले आहेत. ■

भारतीय आदिवासी कला



रंजन रॉय – अनुवाद : **वि. आ. आपटे**

आदिवासी कला प्रदीर्घकालापासून पूर्वग्रह आणि अज्ञान यांनी झाकोळली आहे. पुढारलेल्या लोकांचा असा समज आहे की, आदिवासी हा रानटी आणि मागासलेला असल्यामुळे सांस्कृतिक बारकाव्याचे त्याला आकलन होऊच शकत नाही. निसर्ग आणि पंचमहाभूतांशी त्याचे जीवन निगडित असल्याने तो अजून रानटी अवस्थेतच आहे.

वस्तुस्थिती मात्र वरील विचाराशी मुळीच जुळणारी नाही. प्रत्यक्षात साधेपणा, सौंदर्य, सुसंवाद आणि निर्मळपणा ही आदिवासी कलेची वैशिष्टचे आहेत. आदिवासी कला साधी असते. कारण आदिवासींचा जीवनविषयक दृष्टिकोन अगदी सरळ असतो. त्यांची दृष्टी निष्पाप व प्रांजळ असते आणि त्यांच्या सततच्या निसर्गसान्निध्यामुळे सुसंवादी आणि सुंदर आकार व आकृति त्याला प्रेरणा देऊ शकतात. आदिवासी कलेत एक प्रकारचा मनमोकळेपणा जाणवतो आणि तिची (कलेची) निरागसता खरी आणि स्वाभाविक वाटते. कोणत्याहि प्रकारचा विपर्यास किंवा हातसफाई यांच्या मदतीशिवाय ही कला सदभिरुचिसंपन्न भावात्मक प्रेरणा प्रभावीपणे देऊ शकते. आदिवासी कलावंत सर्वव्यापी निसर्गशक्तीची जाणीव जनसामान्यापर्यंत पोहोचवणारा केवळ वाहक असतो.

कला ही आदिवासींच्या जीवनाचे केवळ एक दालन नसून ती त्यांच्या जीवनाचा अविभाज्य घटक असते. आदिवासी कलाकृतींचे बाह्यस्वरूप विलोभनीय, लक्षणीय असले तरी त्यांच्या कलागुणांचे साकल्याने रसग्रहण करण्याकरता आदिवासींच्या रुढी, धार्मिक श्रद्धा, संगीत, नृत्य आणि काव्य इत्यादी गोष्टींच्या संदर्भाचे भान ठेवणे अगत्याचे आहे. खानदेशाचे बंजारा लोक गोंदणे आणि कशिदा यांच्याकरता ज्या आकृत्या वापरतात त्यांचा उद्देश केवळ दृष्टिसुख हा नसतो तर त्या आकृत्यांद्वारा ते पंचमहाभूतांचे जीवनातील महत्त्वाचे स्थान मान्य करून त्यांना मानाचा मुजरा करीत असतात. तिच गोष्ट दक्षिण राजस्थान आणि गुजरातचे भिल्ल घोडेस्वरांच्या पितळेच्या ज्या आकृत्या बनवतात त्यांना लागू आहे. भिल्लांच्या दृष्टीने ते केवळ घोडेस्वारांचे पुतळे नसतात, तर त्यांच्या माध्यमातून ते आपल्या जीवनावर देखरेख ठवणारी, अहोरात्र त्याच्याभोवती हिंडून त्यांची पिके, गुरेढोरे ह्यांचे रक्षण करणारी आणि भक्तांच्या कल्याणाची चिंता वाहणारी देवता पहात असतात. तामीळनाडूतील अय्यनारपंथाचे लोक देवयद्रांमध्ये चिनीमातीच्या घोडेस्वाराचे अजस्र पुतळे उभारतात त्याच्यामागील हेतूहि हाच असतो.

श्रद्धा, रुढी यांचे प्रतिबिंब

आदिवासी कलेच्या कक्षा काटेकोरपणे आखता येत नाहीत. पुष्कळदा लोककलेशी काही बाबतीत मिळतीजुळती पण लोककलेहून भिन्न असते. एखादी वांशिकदृष्टचा स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असणारी आदिवासी जमात जेव्हा बिगरआदिवासी जमातीच्या सान्निध्यात दीर्घकाळ राहते तेव्हा त्यांची मूल्ये, श्रद्धा आणि रुढी ह्यांची साहजिकच परस्पर देवाणघेवाण होऊन त्याचे प्रतिबिंब आदिवसींच्या कलांमध्ये दिसते. आदिवासी आणि बिगरआदिवासी शतकानुशतके समजूतदारपणे एकमेकांजवळ राहात आले आहेत आणि त्यांच्यामध्ये सतत सामाजिक देवाण-घेवाण चालू असते. परिणामतः त्यांच्या जीवनाच्या काही क्षेत्रात उभयतांच्या जीवनपद्धतींचं अभिसरण होणे नैसर्गिक आहे. आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण अमेरिकेत मात्र असे अभिसरण झालेले दिसत नाही. कारण प्रत्येक टोळी इतर टोळ्यांशी फटकून वागते. इतकेच नव्हे तर असे दळणवळण वाढून आपल्या टोळीच्या व्यक्तिमत्वात भेसळ होऊ नये म्हणून नाना-

प्रकारच्या गुंतागुंतीच्या नियमांचे जाळेच प्रत्येक टोळी आपल्याभोवती निर्माण करते.

प्रत्येक आदिवासी जमात त्यांना लागणाऱ्या सर्व वस्तू स्वतःच तयार करते असे नाही. आपल्या गरजेच्या काही वस्तू ते पुष्कळदा हिंदू समाजात शूद्र समजल्या जाणाऱ्या कारागिरांकडून बनवून घेतात. उदाहरणार्थ बस्तरमधील 'मुरीया' आणि 'माडिया गोंड' घरगुती वापरासाठी आणि धार्मिक विधीसाठी लागणारी पितळेची भांडी 'घडवा' लोकांकडून करवून घेतात. 'घडवा' लोक कित्येक शतके गोंडांच्या सान्निध्यात राहिल्यामुळे त्यांना गोंडांच्या आवडीनिवडींची चांगलीच जाण असते आणि त्याचे प्रतिबिंब त्यांनी गोंडांकरता बनवलेल्या, तांदळाची मापे, कंगवे, हत्ती आणि देवांच्या मूर्ती इत्यादि सर्व वस्तूमध्ये दृष्टोत्पत्तीस येते. गुजरातमधील छोटे उदेपूरच्या अवतीभोवती राहाणारे भिल्ल पांढऱ्या कापडावर लाल, हिरवे, पिवळे आडवे पट्टे असलेल्या कापडाच्या लुंग्या वापरतात. अजूनसुद्धा हे लुंग्यांचे कापड वंशपरंपरेने विणकर असलेले बिगरआदिवासी लोकच तयार करून भिल्लांना विकतात. भिल्लांच्या स्त्रिया जी ओढणी वापरतात त्यावर साच्याने छपाई केलेली असते. अशा ओढण्या गुजरात-मध्यप्रदेशाच्या सीमेवर राहणारे मुसलमान खत्रीच अजून बनवतात.

परंतु अशीहि उदाहरणे आहेत की जिथे आदिवासी जमाती आपल्या सौंदर्यदृष्टीला मूर्त स्वरूप देण्याच्या बाबतीत इतरांवर विसंबत नाहीत. ओरिसाचे 'साओर' आपले कल्पनाविश्व आपल्या स्वतःच्या हातांनीच आपल्या घरांच्या भिंतींवर चित्रित करतात. ठाणे जिल्ह्यातील 'वारली' आदिवासी विवाहप्रसंगी काढावयाचे 'पालघाटचौक' स्वतःच्या हातांनीच काढतात. निलगिरीचे 'टोडा' 'पुथकुली' नावाचे जे वस्त्र परिधान करतात त्यावरील गुंतागुंतीच्या कशीद्याच्या आकृति काळचा आणि लाल रंगात स्वतःच काढतात. नागालँड मधील 'कोन्याक' आणि 'वांचो' टोळचा आपल्या मंडळांच्या इमारतींच्या खांबांवरील खोदकाम आणि मृतांचे लाकडी पुतळे टोळीच्या सभासदांकडूनच करवून घेतात.

सहज सुंदर मिलाफ

भारतामध्ये पुरातन आदिवासीकला आणि श्रेष्ठ दर्जाची आधुनिक कला यांचा सुंदर मिलाफ पहावयास मिळतो. येथे मोठी आणि छोटी परंपरा बेमालूमपणे एकजीव झालेल्या दिसतात. कित्येक सर्वमान्य हिंदू देवदेवतांचे मूळ आदिवासी संस्कृतीत सापडते. श्रीकृष्ण उत्तर भारतातल्या अहीरटोळीचा होता तर पुरीच्या जगन्नाथाचे बिहार आणि ओरिसाच्या आदिवासी देवदेवतांशी पुष्कळच साम्य आहे. मग जगन्नाथाच्या मूर्तीबद्दल त्याचे उपासक कितीहि पौराणिक दाखले देवोत. बस्तरचे गोंड 'झारी' नावाचे तोटी असलेले जे भांडे वापरतात त्याचे मोगल कालीन 'अफ्तवा'शी खूपच साम्य आहे. (ही झारी पूर्वभारतातील गडूसारखी असते.) केवळ कलाकृतीचे आकार आणि शैली ह्यामधील साम्यावरून सांस्कृतिक देवाण-घेवाणीबद्दल निष्कर्ष काढणे जरासे अतिरंजित वाटेल तरी पण आपल्याला हे लक्षात ठेवले पाहिजे की भारतामध्ये आदिवासी टोळचा नेहमी बाह्य प्रभावापासून मुक्त असे स्वयंपूर्ण घटक असतच असे नाही.

आजच्या गुंतागुंतीच्या रटाळ औद्योगिक जगात आदिवासी कलेचा ताजेपणा आणि जिवंतपणा अत्यंत आकर्षक वाटतो. हा कलाविष्कार कलावस्तूच्या आंतरिक गुणांचे अनावश्यक तपशील गाळून सखोल दर्शन घडवतो. ह्या कलाकृतीत जीवनाबद्दल श्रद्धा; निसर्गाच्या रहाटगाडग्याचे दर्शन, अज्ञाताकडे झेप घेण्याचा आणि अदृश्याशी संपर्काचा प्रयत्न ह्या गोष्टींचा प्रत्यय येतो.

आता बदलाचे वारे कधी नव्हेत इतक्या वेगाने आणि बेछूटपणे वाहात आहेत. ह्या शतकाच्या सुरुवातीपासून तर आदिवासी लोकांचा कोणत्या ना कोणत्या कारणाने बाह्य जगाशी संपर्क आणला जात आहे. ह्या संपर्काचा आदिवासी कलेवरील परिणाम मात्र आदिवासी कलेच्या गाभ्याला हितावह ठरला नाही, दळणवळणाच्या साधनांच्या विकासाने दूरदूरची खेडी आणि आदिवासी वसाहतीमध्ये आता यंत्रानी तयार केलेली भांडी, खेळणी, कपडालत्ता, चित्रे आदि वस्तूंचा पूर आला आहे. परिणामी ह्या लोकांची आर्थिक धूप व कलात्मक घसरण होत आहे. साहजिकच स्थानिक लोहार, कुंभार, सुतार, विणकर यांची आपापल्या वस्तूंची अदलाबदल करण्याची पूर्वापार पद्धत पूर्णपणे मोडकळीस आली आहे आणि त्यांच्या कलात्मक उर्मींच्या प्रकटीकरणाला वावच राहिलेला नाही. आदिवासी कारागिरापुढे आता दोनच पर्याय आहेत, एक, आपला वंशपरंपरागत उद्योग सोडून कारखान्यात निम्न श्रेणीचा मजूर किंवा कारकून म्हणून काम करणे किंवा दुसरा, ग्रामीण कलांच्या विकासा करता झटणाऱ्या संस्थाकडून मिळणारी आपुलकीरहित मदत स्वीकारून निर्वाह करणे. ज्या भूमीवर तो आपली उपजीविका करीत होता तेथून त्याला हुसकून लावण्यात आले आहे.

आज भारतामध्ये आदिवासी कला नामशेष होण्यासारखी परिस्थिति आहे. या शतकाच्या शेवटी ती कला फक्त वस्तुसंग्रहालयांच्या स्मशानसदृशवातावरणात किंवा कलादालनात आणि बाजारी कलावस्तु भांडारातच पहावयास मिळेल ! ! ■

आदिवासी साहित्य व कला

लक्ष्मण कर्वे



पृथ्वीच्या पाठीवर भारत हा देश असा आहे की, तो एका सूत्रात, एका संस्कृतीत गुंफला गेला आहे.

भारतात भिन्न प्रान्त, भिन्न भाषा, भिन्न आचार, भिन्न पोषाख जरी असेल तरी संस्कृतिक ठेवा हा एकच आहे. या देशाचे अस्तित्व, या देशाची संस्कृती, या देशाचे अखंडत्व खिळखिळत करण्यासाठी हजारो वर्षापासून परक्यांचे प्रयत्न चालूच आहेत.

दुर्दैवाने आमच्या धुरीणांनी त्यांचीच री ओढली आणि इंग्रजी आचार–विचार आणि शिष्टाचार हे प्रगतीचे व पुरोगामित्वाचे लक्षण मानून आम्ही आमचे स्वत्व विसरलो.

अनेकतेमध्ये एकता पाहणारे आमचे तत्वज्ञान विसरून जाऊन प्रत्येक गोष्टीत हेतुपुरस्सर द्विधा भाव आमच्या कृतीतून बोलण्यातून, निदर्शनास येतो.

सकृतदर्शनी खोलात जाऊन संशोधन केले तर, आपल्या निदर्शनास येईल की येथील साहित्य, येथील कला ही एकच आहे. येथील जाती-जमातीं गुणानुक्रमाने वेगवेगळया असतील. पण जीवनगंगा ही एकच आहे.

समतेच्या नावाखाली समाजजीवनात तुम्ही आदिवासी म्हणून तुमचे साहित्य, तुमच्या कला भिन्न आहेत, तुम्ही दलित म्हणून तुमचे साहित्य, तुमच्या कला भिन्न आहेत; तुम्ही अमुक म्हणून तुम्ही तमुक, ही राष्ट्र व समाजघातकी परिणामी-समाजाची व राष्ट्राची प्रतिमा विकृत करण्याचे प्रयत्न आहेत.

मि. मिल्टन नॉन्स, यानी वारली या विषयावर प्रबंध लिहून पीएच. डी. मिळवली त्यात त्यांनी लिहिलं आहे, वारल्यांचा म्हणजेच आदिवासींचा कोणत्याहि धर्माशी, कोणत्याही संस्कृतीशी संबंध नाही. ते प्राणी-पूजक आहेत, या देशात हिंदुधर्मीयांशी संबंध येऊन ते हिन्दू धर्माकडे वळले. अशा प्रकारचे संशोधन व लिखाण हे येथील राष्ट्रीय जीवन विकृत करणारे आहे. त्याच-प्रमाणे डॉ. गोविंद घारे, ('महादेव कोळयाचा इतिहास) तसेच श्री. वसंतराव नारगोळकर (जंगलचे राजे) त्यांच्या लिखाणात आदिवासींची संस्कृती वेगळी आहे, त्यांचे साहित्य वेगळे आहे, ते प्राणीपूजक आहेत असे जाणवते. उलट आदिवासी त्यांच्या 'मंगलकार्यात, म्हणत असलेली गीते नजरेखालून घातल्यास आपणास जाणवेल त्यांच्या निष्ठा. देव त्यांचे एकच आहेत उदाहरणार्थ हे गीत पाहा.

हारिचंद्रा हारिचंद्रा
नमन आल हाँ ऽ हाँ
येरनमन अन्या कोनसे देवाल हाँ ऽ हाँ
येरनमन दादा नम हिरव देवाल हाँ ऽ हाँ
येरनमन दादा चालतूच जाय हाँ ऽ हाँ
येरनमन दादा नमुनच जाय हाँ ऽ हाँ
येरनमन दादा गेल बरमपुरील हाँ ऽ हाँ
येरनमन दादा कोनच देवाला हाँ ऽ हाँ
येरनमन नम ब्रह्मो देवाल हाँ ऽ हा
येरनमन नम सरला देवील हाँ ऽ हाँ
येरनमन दादा चालतूच जाय हाँ ऽ हाँ
येरनमन दादा दादा नमनच जाय हाँ ऽ हाँ
येरनमन गेल विषनू पुरील हाँ ऽ हाँ
येरनमन दादा कोणच देवाल हाँ ऽ हाँ
येरनमन नम नारायन देवाल हाँ ऽ हाँ
येरनमन नम लखमी देवील हाँ ऽ हाँ
येरनमन दादा नमुनच जाय हाँ ऽ हाँ
येरनमन गेला केलापुरील हाँ ऽ हाँ
येरनमन नम महादेवाल हाँ ऽ हाँ
नरनमन नम गंगा गवरील हाँ ऽ हाँ

वरील गीतात हिरव देव म्हणजे 'गणपती, तसेच सरलादेवी म्हणजे सरस्वतीदेवी, व लखमी देवी म्हणजे लक्ष्मीदेवी, तसेच केलापुरी म्हणजे कैलासपुरी हा अर्थ निघतो.

तात्पर्य सरस्वती ही विद्या देणारी देवी लक्ष्मी ही धनदौलत देणारी देवी व बुद्धीदाता गणपती यांना कुठल्याहि मंगलकार्यात नमन करण्याची पद्धत भारतातील लोकांच्यात आहे. त्याचप्रमाणे आदिवासीमध्ये देखील आहे. या गाण्यांवरून सहज कल्पना येते आदिवासी व त्यांचे साहित्य हे वेगळे नसून एकच आहे. दुसऱ्या गीतात आदिवासींच्या लोकगीतात गणपतीची जन्मकथा गायली गेली आहे. ती खालीलप्रमाणे

महादेव तथ डोंगरावर बसुनी तयां करर।
महादेवाची भारजा त धरा बसून ढोंगा करर।
गंगेचा पानी पडर निर्मल पानी पडर
महादेवाची रानीत पानी पड तथ अंगलर।
मल काढुनी ठेवर मल काढुनी ठेवर
मलाचा इन्ह बनवला हिरवा बाल बनवला।
बालाला जीव इन्ह घातला र।
फुकून जीव इन्ठ घातला र।
हिरवा देव खेळाया लागला र।
हिरवा बाल उठून बसला र।

तसेच लग्नप्रसंगी लग्न लावताना लग्न लावणारी सवाशीण बाई तिला धवलरी म्हणतात ती खालील गीत म्हणत असते. ते गीत खालीलप्रमाणे-

ये र ये र नल देवा दारिच आना जंबोदरी।
ये र ये र रावन देवा दारिच आना मंदोदरी।
येर येर महादेवा दारिच आना गंगांगवरी।
ये र येर रामदेवा दारिच आना सीता देवी।

वरील गीतावरून स्पष्ट होते. लग्न लावताना म्हणण्यात येणाऱ्या मंगलाष्टकेप्रमाणेच वरील गीत आहे. त्याचप्रमाणे धरणीला अतिशय पवित्र मानली जाते नाचण्यापूर्वी देखील धरणीमातेला वंदन व तीची क्षमा मागण्याची प्रथा आहे. ती खालील गीतावरून आपल्यालक्षात येईल. ते गीत खालीलप्रमाणे-

अथ नाचू काय तथ नाच् काय।
पायघडचा कसाल लावू र।
धरतरी त माझी मायूर।
पायघडचा कसाल लावू र।

वरील गीताचा अर्थ काढल्यास निश्चितपणे जाणवते, आदिवासींचे साहित्य हे देशातल्या प्रचलित व पुरातन साहित्यातलेच आहे. ते वेगळे असू शकत नाही. ■

गोंडी गाणे

रेला रेला रेला रेरेला रेला ॥ ध्रु० ॥
कोरमुलातेकें ओमू रो ए दादा दादा
कोरेंग कोरेंग किमू रो ए दादा दादा ॥ १ ॥

मरका मरातगा ओमू रो ए दादा दादा
मरकांग मरकांग किमू रो ए दादा दादा ॥ २ ॥

इवूर पेकूर उंदी पेगीटून ओंतूर रो ए दादा दादा
डोडांग डोडांग ओमू रो ए दादा दादा
डोडांग डोडांग किमू रो ए दादा दादा ॥ ३ ॥

—देवू बैय्या महूंदा

हे मजेशीर गाणे लग्नाच्या नाचात मुली म्हणतात. आदिवासी जीवनातील लैंगिक स्वातंत्र्याविषयी आणि लग्नानंतर साधल्या जाणाऱ्या शारीरिक ऐक्याचे स्वरूप दाखविणारे हे गाणे आहे. या गाण्यातील 'दादा' हे संबोधन 'भाऊ' या अर्थी नसून 'मित्र' या अर्थी आहे. मुली म्हणतात– कोंबडयाच्या कोपऱ्यात (ज्या कोपऱ्यात कोंबडया कोंडतात तिकडे-आडबाजूला) (तिला) घेऊन जा रे मित्रा. कोंबडा-कोंबडीप्रमाणे कर रे मित्रा.

आंब्याच्या झाडाखाली घेऊन जा रे मित्रा...... आणि......

दोन मुलांनी एका मुलीला ओढयाकाठी नेले रे मित्रा. ओढयाकाठी......

ठाकरांची गाणी

(१)

वांगे रिंगनाला चुन चुन काटा
भाताच्या कणग्याला केलीय खूण
हाच मामाजी तुमचा गुण
हेच गुणाला केलीय सून
रिंगणे वांगेला चुनचुन काटा— ॥ १ ॥

पिठाच्या कणग्याला केलिय खूण
हेच काय फुयीजी तुमच गुण
हेच गुणाला केलिय सून
रिंगने वांगेला चुन चुन काटा ॥ २ ॥

(२)

नवरा म्हणे बायको माझी लाडाची हाय ना ॥ ध्रु० ॥

मी हाय काळी मला बाजारी न्याल का ?
काळ्या तोंडाला तुम्ही पावडर घ्याल का ?
मी दमले मला तुम्ही उचलून घ्याल का ?
नवरा म्हणे...... ॥ १ ॥

मी हाय पांगली मला बाजारी न्याल का ?
पांगुले पायाला तुम्ही पैंजण घ्याल का ?
मी दमले मला तुम्ही उचलून घ्याल का ?
नवरा म्हणे...... ॥ २ ॥

मी हाय नकटी मला बाजारी न्याल कां ?
नकट्या नाकाला नथन घ्याल कां ?
मीं दमले मला तुम्हीं उचलून घ्याल का ?
नवरा म्हणे...... ॥ ३ ॥

संग्राहक—प्रदीप गायकवाड

डोंगरगावी क्येल दिली

एकदा दिली ना ।
मला दोनदा दिली ना ।
मला डोंगरगावी क्येल दिली ना, ।
मला डोंगरगावी क्येल दिली ना ।
डोंगरगावी क्येल दिली ना ।
मला आडवित खाडी पडली ना ।
आडवित खाडी पडली ना ।
मी त तरीला हाक मारली ना ।
तरीला हाक मारली ना ।
मीं त तरी तू बसयेला ना ।
तरी तू बसयेली ना ।
मी त तरी तू बसयेली ना ।
मी त दरी गेली होती ना ।
त्ये दरी गेली होती ना ।
मी त दोन दीडक्या सोडून दिल्या ना ।
दोन दिडक्या सोडून दिल्या ना ।
मी त घराला गेली व्हती ना ।
घराला गेली व्हती ना ।
मी त माल्येला लिसनी लावली ना ।
माल्येला लिसनी लावली ना ।
मी त पटणीचे भात पाडली ना ।
पटणीचे भात पाडली ना ।
मी त पटणीच द्याण घेतल ना ।
पटणीच द्याण घेतल ना ।
मी त दाबा दुबी कांडाय लागली ना ।
एकदा दिली दा दोनदा दिली ना ।
मला डोंगरगावी क्येला दिली ना ।

(मुलगी आपल्या वडिलांना म्हणते, "मला एकदा सोडून दोनदा तू आडवळणी गावाला दिली आहेस. आपल्यामध्ये खाडी आहे. तुझ्याकडे यायला माझ्याजवळ पैसा नाही. मी तुला होडीत बसलेला पाहिला, किती हाका मारल्या ? मला येथे दळण, कांडण किती किती काम करावे लागते ? अशा आडरानात तू मला का रे दिलेस ?")

आदिवासी लोकगीते

सोन्याच्या पावला

सोन्याच्या पावला मोतीनी वाला
आमची नवरी लहान ।। ध्रु ।।
दूरचे वाडे धाडू नको
तिचे बापाचे लाड
सोन्याच्या पावला मोतीनी वाला
आमची नवरी लहान ।। १ ।।
दूरचे डोंगरा धाडू नको
तिचे आईचे लाड
सोन्याच्या पावला मोतीनी वाला
आमची नवरी लहान ।। २ ।।
दूरचे विहिरी धाडू नको
तिचे बहिणीचे लाड
सोन्याच्या पावला मोतीनी वाला
आमची नवरी लहान ।। ३ ।।
दूरचे नदी धाडू नको
तिचे भावाचे लाड
सोन्याच्या पावला मोतीनी वाला
आमची नवरी लहान ।। ४ ।।

(नवरी सासरी निघाली आहे. आई, बाप, बहीण, भाऊ सांगत आहेत की, 'आमची मुलगी लहान आहे. अजून तिचे पाय सोनेरी म्हणजे कोवळे आहेत, तरी तिला कष्टाची कामे सांगू नका.' सासू, सासरा, दीर आणि नणंद मात्र म्हणते, 'हे सगळे तुमचे लाड आहेत. आमच्याकडे चालायचे नाहीत.)

भुरका भेंडी

अशी भुरकाभेंडी पावरी वाजते ऽऽऽ ग
अशी शंकर तुझी नवरी नाचते ग
अशी डुब्यावर हात ठेवून दुहेरी नाचते
अशी .... तुझी नवरी नाचते ग
अशी भुरका भेंडी पावरी नाचते ग
अशी .... तुझी नवरी नाचते ग
अशी कंबरेवर हात देऊनी दुहेरी नाचते ग
अशी रामा तुझी नवरी नाचते ग

(लग्न झाल्यानंतर नवरामुलगा नवऱ्यामुलीला कमरेवर घेऊन नाचतो. त्याच्याबरोबर इतर वऱ्हाडीहि नाचतात. पूर्वी मुली लग्नात लहान असत. म्हणून हे नाचणे जमत होते. आता नुसते शास्त्र करतात.)

(पृष्ठ क्रमांक ३९, ४० व ४१ वरील आदिवासी लोकगीते श्रीमती सिंधुताई अंबिके यांच्या संग्रहातून)

गौर पाणी मागते

गौर ग खाली पडेल रागा भरेली
जान पडली वाडवळनी दारी
वाडवळनी वाडवळनी बाई ग, मला पाणी ग पाज
तू बाई कोणाची कोण ग, तुला मी नाही पाजत पाणी

गौर ग खाली पडेल रागा भरेली
जान पडली भंडारणी दारी
भंडारणी भंडारणी बाई ग, मला पाणी पाज
तू बाई कोणाची कोण ग, तुला मी नाही पाजत पाणी
गौर ग खाली पडेली रागा भरेली ॥ २ ॥

जान पडली सुतारणी दारी
सुतारणी सुतारणी बाई ग, मला पाणी ग पाज
तू बाई कोणाची कोण ग, तुला मी नाही पाजत पाणी
गौर ग खाली पडेली रागा भरेली ॥ ३ ॥

जान पडली मांगेलीण दारी
मांगेलीण मांगेलीण बाई ग, मला पाणी पाज
तू बाई कोणाची कोण ग, तुला मी नाही पाजत पाणी
गौर ग खाली पडेली रागा भरेली
जान पडली वार्लीणी दारी ॥ ४ ॥

वार्लीणी वार्लीणी बाई ग, मला पाणी ग पाज
पाणी ग पाजलं गौर ग, आनंदी झाली
आनंदी झाली ग तथच राहिली ॥ ५ ॥

(गौर निरनिराळचा जातींच्या बायकांकडे पाणी मागायला गेली. गौरीचा वेश अगदी साधा होता. त्यामुळे त्या सर्व बायकांनी तिची जातपात विचारली. तिला धुडकावून लावले; मग गौर वारली बायकांकडे गेली. त्यांनी मात्र पाणी पाजले. म्हणून गौरीला आनंद झाला व ती त्यांच्यातच राहिली.)



तन मन तुळशी

तन मन तुळशी । तन मन तुळशी पान कुवारी रेऽऽ
बापा रे सरखा बाप रे सरऽऽखा
सासरा रे होय ता । सासरा रे होय ता
तन मन तुळशी । तन मन तुळशी पान कुवारी रेऽऽ
सासू रे होय त । सासू रे होय त
आई रे सरखी । आई रे सरखी
तन मन तुळशी । तन मन तुळशी पान कुवारी रेऽऽ

(मुलगी सासरी निघाली आहे. तिला माहेरची माणसे समजावीत आहेत. सासू-सासरे आई-वडिलां-सारखे आहेत.)

पुस्तक परीक्षण

अनुताईंच्या आठवणी

अनिल काळे

या वर्षी कोसबाड येथील ग्राम बालशिक्षाकेंद्राच्या संचालिका श्रीमती अनुताई वाघ यांना राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार प्राप्त झाला. त्याआधीपासून किती तरी दिवस हे केंद्र पाहून यायचे मनात आहे. तो योग अद्याप आलेला नाही; परंतु परवा अचानक 'कोसबाडच्या टेकडीवरून' हे अनुताईंचे आत्मचरित्रपर पुस्तक हाती आले आणि या ग्राम बालशिक्षाकेंद्राचे एक प्रकारे लांबून का होईना दर्शन घडले असे म्हणावयास हवे. अर्थात त्यामुळे केंद्र पाहण्यास जाण्याची आणि अनुताईंना भेटण्याची उत्सुकता अधिकच वाढली आहे.

आदिवासींच्या मुलांच्या शिक्षणाचे अतिशय अवघड गणित कै. ताराबाई मोडक आणि श्रीमती अनुताई वाघ यांनी ज्या सुलभतेने सोडविले आहे त्याची केवळ झलक आपल्याला या पुस्तकातून वाचावयास मिळते. उदाहरणार्थ कुरणशाळेचा जन्म कसा झाला याविषयी अनुताई लिहितात, 'गुरे चारणे म्हणजे वाईट काम नाही. ती घरची एक गरज आहे. तर ते काम करायलाच हवे; पण हे काम करतानाच काही शिकता आले तर तशी सोय का करू नये ? हा विचार एके रात्री माझ्या मनात चमकला; आणि त्याचे रूपांतर कुरणशाळेत झाले ! कुरणशाळा म्हणजे कुरणात गुरे चारावयाला जाणाऱ्या मुलांची कुरणातच शाळा चालविणे...'

रिमझिम पाऊस पडत असतो. गुरे इकडे तिकडे चरत असतात. जवळजवळ २५ ते ३० मुले-मुली या गुरांच्या राखणीसाठी तेथे असतात. काम थोडे, मंडळी जास्त. मग नुसतेच इकडे तिकडे हिंडणे, झाडावर चढणे, खेळणे वगैरे चालत असे. या मुलांना एकत्र करून गाणी, गोष्टी, कवायत, मैदानी खेळ, गोष्टींची नाटके, स्वच्छता, नागरिकशास्त्र, भूगोल, गणित, भाषा, सृष्टीविज्ञान इत्यादी अनेक विषय शिकविता आले. अधूनमधून ओढ्यावर जाऊन सार्वजनिक आंघोळी होत असत. नखे काढणे, कपडे धुणे वगैरे कार्यक्रम तर होत असतच. एकदा ताईंनी सांगितले, "मुलांनी एकमेकांच्या हजामती-करायला शिकावे." त्याप्रमाणे आम्ही साधने आणली. हजामतीचा उपक्रम सुरू केला !

प्रस्थापित औपचारिक शिक्षणाच्या सर्व संकल्पांना अनुताईंनी किती सहजपणे धक्का देऊन एक क्रांतिकारक प्रयोग करून दाखविला आहे. (खरे म्हणजे समस्त पंतोजींच्या 'हजामतीचा उपक्रम' कसा एका फटक्यात उरकला आहे !) अर्थात् हे एखाद्या खोलीत बसून सहजी घडलेले नाही. कै. ताराबाई मोडक यांचे गुरू कै. गिजूभाई बधेका यांनी १९२० साली भावनगरला सुरू केलेल्या पहिल्या बाल शाळेपासून बालशिक्षणाच्या क्षेत्रामध्ये सुरू झालेल्या प्रयोगांची एक परंपरा त्या पाठीमागे आहे. गिजूभाईंचे भावनगरचे 'बालमंदिर', ताराबाईंचा मुंबईचा 'शिशुविहार' ते ताराबाई–अनुताईंचा कोसाबाडचे ग्राम बालशिक्षाकेंद्र असा सारा इतिहास अनुताई आपल्याला या पुस्तकात सांगतात.

अर्थात तो तुकड्यातुकड्यांनी, आठवणींच्या स्वरूपात येतो. त्यात कुठेहि पंडिती विवेचन नाही. अनुताईंच्या शब्दात सांगायचे तर– 'ग्राम बालशिक्षाकेंद्र जसे घडले तसे' अनुताईंनी प्रथम लिहिले. नंतर सुहृदांच्या आग्रहावरून त्यांनी त्यांच्या व्यक्तिगत शैक्षणिक प्रवासातील आठवणीहि लिहून काढल्या. ही दोन्ही हस्तलिखिते श्री. अशोक चिटणीस यांनी एकत्रित केली, संपादित केली आणि त्यातून हे पुस्तक जन्माला आले. अनुताईंचे मामेबंधू श्री. रमेश पानसे यांनी ऋचा प्रका-

शनातर्फे ते प्रकाशित केले आहे. संपादक श्री. अशोक चिटणीस यांनी पुस्तकाची जन्मकथा प्रारंभी थोडक्यात कथन केली आहे. प्रा. डॉ. स. ह. देशपांडे यांनी प्रस्तावना लिहिली आहे.

प्रस्तावनेत प्रा. देशपांडे यांनी अनुताईंबद्दल जो भक्तिभाव व्यक्त केला गेला आहे तो सार्थच आहे असे म्हणावयास हवे. कारण ग्रामीण आणि आदिवासी बालकांविषयीचे संताला शोभेल असे ममत्व आणि आपल्या ध्येयासाठी केलेली ऋषीची तपस्या अनुताईंच्या ठायी आहे. आदिवासी मुले येती करायची, शिकती करायची हा ताराताईंचा-अनुताईंचा— ध्यास, ही आंतरिक तळमळ यामुळेच मार्गातील अनेक अडचणींना दूर सारून कोसबाडच्या ग्राम बालशिक्षाकेंद्राने आजचा टप्पा गाठला आहे. समोर आलेल्या प्रश्नावर उत्तर शोधतांना कोण काय म्हणेल, आपले हसे होईल की काय अशी कसलीहि दडपणे न ठेवता अनुताईंनी नवे नवे प्रयोग केले म्हणूनच रात्रशाळा, कुरणशाळा अशी धाडसे त्या करू शकल्या. आज एक्काहत्तराव्या वर्षी अकरा बालवाड्या, चार पाळणाघरं, एक प्राथमिक शाळा, प्राथमिक व पूर्व प्राथमिक प्रशिक्षणविद्यालये बालसेविकावर्ग, वसतिगृहे, किसानशाळा, रात्रशाळा, प्रौढ शिक्षणाची केंद्रे एवढा कोसबाड ग्राम बालशिक्षा केंद्राचा व्याप अनुताई आनंदाने संभाळीत आहेत. त्याची अहोरात्र काळजी वाहात आहेत. आज केंद्रात चालू असलेल्या प्रत्येक उपक्रमाची जन्मकथा या पुस्तकात आली आहे. तसेच पूर्वार्धात अनुताईंचे वाघकुटुंब, बहीण-भावंडे यांच्या हकिगती आणि वयाच्या छत्तिसाव्या वर्षी पूर्णपणे सामाजिक कार्याच्या क्षेत्रात आल्यापर्यंतच्या काळात आपले व्यक्तिमत्त्व कसे घडत गेले, ही सर्व हकिगतहि यात आली आहे. पुस्तकात आपल्या व्यक्तिगत आयुष्यातील व संस्थात्मक कार्यातील सर्व साहाय्यकर्त्यांचे उल्लेख अनुताईंनी आवर्जून केले आहेत. त्यापैकी काहींचे दर्शन आपल्याला पुस्तकातील आर्टप्लेटस्मधील छायाचित्रांवरून होते.

अनुताईंचं हे आत्मचरित्रपर पुस्तक, सामाजिक आणि शैक्षणिक कार्यावर, ध्येयवादावर, नीतिमूल्यांवर, माणसातील चांगुलपणावर आणि कर्तृत्वावर प्रेम करणाऱ्या सर्वांना प्रेरक ठरावं अशी इच्छा पुस्तकाच्या संपादकांनी व्यक्त केली आहे ती अतिशय सार्थ आहे. हे सर्व अधिक विस्ताराने झाले असते तर अधिक बरे झाले असते असे वाटत राहते. लहानांसाठी लिहिताना मात्र अनुताईंनी मुक्तपणे लिहिले आहे. बडबडगीते, मुलांसाठी गोष्टी अशा साहित्यांची त्यांची काही पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत, बक्षीसपात्र ठरली आहेत. 'बालवाडी कशी चालवावी?' या मार्गदर्शन पुस्तकासह त्यांची एकूण बारा पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यात या आणखी एका वाचनीय पुस्तकाची भर पडली आहे. काही अवघड पुस्तके समजण्यासाठी दोनदा वाचावी लागतात. तर काही सोपी पुस्तकेहि त्यातील अर्थ समजण्यासाठी पुन्हा वाचावी लागतात. अनुताईंचे हे पुस्तक या दुसऱ्या प्रकारातील आहे. ■

'कोसबाडच्या टेकडीवरून'
ले. अनुताई वाघ
ऋचा प्रकाशन
मूल्य तीस रुपये
पृष्ठे १७४

ठाणे जिल्हयातील डहाणू तालुक्यात कोसबाडला ग्राम बालशिक्षाकेन्द्र आहे. कै. ताराबाई मोडकांच्याबरोबर श्रीमती अनुताईंनी या केन्द्राची स्थापना केली. या घटनेला सुमारे तेवीस वर्षे लोटली. अनुताईंनीहि एकाहत्तरावा वाढदिवस नुकताच साजरा केला. पण दिवस, महिने वर्षाची नस्ती उठाठेव तुम्हा आम्हाला! आजही अनुताई पहिल्यागत झपाटल्या सारख्या काम करीत आहेत.

'हाकारा'च्या सल्लागार या औपचारिक बिरुदापेक्षा आदिवासी मुलांच्या या मातेला दीर्घारोग्य लाभो ही प्रार्थना!

—संपादक

भूमिसेना ठाणे

भूमिसेना ही ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागात आदिवासी, दलित शोषित श्रमिकांमध्ये काम करणारी एक लोकसंघटना आहे. या भागतील आदिवासी, दलित श्रमिकांच्या सर्व बाजूंनी होत आलेल्या शोषणाविरुद्ध लढण्याचे लोकांचे एक हत्यार आहे. या संघटनेचे नेतृत्व श्रीयुत काळूराम दोधाडे यांच्याकडे आहे.

कार्यक्षेत्र

ठाणे जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २२.८१ लाख आहे. त्यापैकी ५.७९ लाख लोकवस्ती आदिवासींची आहे. हे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या २५.४० टक्केएवढे आहे. आदिवासींची वस्ती प्रामुख्याने पालघर, मोरवाडा, जव्हार, डहाणू, तलासरी व वाडा इत्यादी तालुक्यांतून आहे. या भागात दलित, शेतमजूर व छोटे शेतकरी यांचे प्रमाणहि मोठे आहे. जिल्ह्यातील अल्पसा भाग बगळून मान्सूनच्या पावसावर भाताचे एकच पीक घेतले जाते. काही तालुक्यात नागली, वरी सारखी पिके घेतली जातात. ३ हेक्टरपेक्षा कमी जमीन धारण करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण एकूण शेतकऱ्यांत ६५ टक्के इतके आहे. जमीन अत्यंत सामान्य प्रतीची आहे. अधूनमधून कोरडा व ओला दुष्काळ या भागात पडतो. शेती व जंगल याव्यतिरिक्त रोजगारीची अन्य साधने फारशी नाहीत. त्यामुळे या भागात सावकारांचे प्राबल्य मोठ्या प्रमाणात आहे. शेतमजुरांना शेतीत जेमतेम ९० दिवस रोजगार मिळतो. छोट्या शेतकऱ्याजवळ फक्त जमीन व श्रम असतात. जमिनीतून पीक काढण्यासाठी लागणारी साधने उदा. नांगर, बैल, बियाणे, खावटी ही सर्व त्याला सावकाराकडून भाड्याने व कर्जाने घ्यावी लागतात. त्या मोबदल्यात शेतातून येणारे सर्व पीक त्याला सावकाराला द्यावे लागते. आणखी कर्ज डोक्यावर घेऊन शेतीचा हंगाम संपताच तो मुंबईच्या आसपास किंवा ठाणे जिल्ह्यातील किनारपट्टीवर जगण्यासाठी उरलेले पाच–सहा महिने जातो. जी स्थिती शेतकऱ्यांची तीच येथील शेतमजुरांची आहे. शेतीच्या हंगामात जेमतेम रुपया दीडरुपया मजुरी त्याला मिळते. हंगाम संपताच तोहि घरदार घेऊन जगायला जातो. तेथेहि त्याचे शोषण होत असते. पालेमोड व खावटी–कर्जे यांच्या चरकात येथील शेतकरी शेतमजूर वर्षानुवर्षे पिळून काढला जात आहे. लग्न, आजारपण, मयताची दिवसकार्ये यासाठी ताकदीपेक्षा जास्त खर्च करण्याची रूढी चालू असल्याने व ही रुढी तोडण्याची त्याची मानसिक शक्ती नष्ट केल्याने तो सावकाराकडे कर्ज काढतो व त्या कर्जाच्या मोबदल्यात आपले, आपल्या बायकोचे, आपल्या मुलांचे, सुनांचे वेठबिगारीचे जिणे पत्करतो. पूर्वी ह्या भागात पारशी, इराणी, मारवाडी, मुसलमान, ब्राह्मण मोठे सावकार होते. आर्थिक पिळवणुकीबरोबर, मारझोड, स्त्रियांची अब्रू घेणे, जिवंत जाळणे, असे अत्याचारही ते सावकार आदिवासींवर करीत. कॉ. गोदावरीबाई परुळेकर यांच्या लढ्यामुळे त्यांचा शारीरिक छळ थांबला. त्यांची भीती कमी झाली. जुने सावकार गेले; पण त्या ठिकाणी नवे स्थानिक सावकार आले. ते मोठे वा मध्यम शेतकरी असून त्यांनी पालेमोड व खावटीकर्जे वाटण्यास सुरुवात केली. व्यापारही सुरू केला. पालेमोड पद्धतीच्या व्याजाचे दर ८०० ते १२०० टक्के आहेत. त्यामुळे कर्जाच्या मगरमिठीतून शेतकरी, शेतमजूर कधी सुटलाच नाही.

शोषणाविरुद्ध लढा

कूळकायद्याने आदिवसींच्या नावावर कागदोपत्री जमिनी आल्या, परंतु प्रत्यक्षात बऱ्याचशा जमिनींचा ताबा सावकाराकडेच राहिला. कर्जापोटी बऱ्याच मोठ्या प्रमाणात जमिनी सावकाराकडे गेल्या. स्थानिक पातळीवरील शासकीय अधिकाऱ्यांच्या सहकार्याने, सावकारांनी कायदेशीर व गैरकायदेशीर मार्गाने आदिवासींच्या जमिनी बळकावल्या. शासनाने

आदिवासी जमीनहस्तांतरणाचा कायदा करूनही त्याचा प्रत्यक्ष फायदा आदिवासी शेतकऱ्यांना मिळत नाही. न्यायालयात जाणे त्यांना परवडत नाही. सावकार सुप्रीम कोर्टापर्यंत जाण्यास तयार असतो. पिढ्यान्-पिढ्या करीत असलेले फॉरेस्ट प्लॉट सरकारच्या धोरणामुळे त्याच्या नावावर होत नाहीत. अशा तऱ्हेने तो सर्व अंगांनी नागवला जात आहे. या सर्व अन्यायविरुद्ध लढण्यासाठी भूमिसेनेने केलेल्या भूमिमुक्ती आंदोलनात पालघर, वाडा, जव्हार या तालुक्यातील ५००० एकराहून अधिक जमिनी आदिवासींना परत मिळाल्या. तिने पोलिसी अत्याचार, नोकरशाही व सावकारशाही शोषणाविरुद्ध लढण्यासाठी श्रमिकांना संघटित केले. या विभागातील परंपरागत शोषण व्यवस्था तोडण्यासाठी किमान वेतनाची अंमलबजावणी करणारे आंदोलन सुरू केले. शेकडो लग्नगडी घरगडी वेठबिगारीतून मुक्त केले आहेत. रोजगार हमी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी सतत आंदोलने करून जास्तीत जास्त रोजगार उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे. खावटीसारख्या शोषणातून लहान शेतकऱ्याची मुक्तता करण्यासाठी, शेतकरी व शेतमजूर ह्यांच्या सहकार्याने गावात खावटी व बियाणे फंड जमा करण्याचे आंदोलन सुरू आहे. लग्नासारख्या सामाजिक बाबीत अतिशय कमी खर्चात एकमेकांच्या सहकार्याने, कर्ज न काढता लग्ने लावण्याची नवी 'भूमिसेना लग्नपद्धती' रुढ केली आहे. त्या पद्धतीचा प्रसार हळूहळू होत आहे. वनरक्षण व संवर्धनाबाबत भूमिसेना विशेष प्रयत्न करणार आहे.

अन्याय व शोषणाविरुद्ध झगडत असताना व्यापक शोषण व्यवस्थेची जाणीव श्रमिकांना करून दिली जात आहे. आपल्या अनुभवाचा व दु:खाचा अर्थ समजावून घेऊन ते दु:ख व अन्याय मिटविण्यासाठी श्रमिकांची शक्ती संघटित केली जात आहे. यासाठी गावपातळीपासून सर्वत्र श्रमिकांचेच नेतृत्व उभे केलेले आहे. प्रत्येक गावात तरुण मंडळे संघटित करण्याचा प्रयत्न जारीने सुरू आहे. **कोणी बाहेरचा माणूस येऊन आपले भले करणार नाही, तर आपणच एकत्र येऊन व विचार करून आपला मार्ग शोधला पाहिजे या गोष्टीवर या मंडळांतून जोर दिला जातो.**

समाज बांधणीचे साधन

भूमिसेना शोषित लोकांच्या आर्थिक लढ्याचे केवळ हत्यार न राहता नव्या समाजबांधणीचेही ते साधन आहे. लोकांचे प्रश्न लोकांनी सोडविण्याची कुवत त्यांच्यात निर्माण करून शोषणमुक्त समाज निर्माण करणे हे तिचे अंतिम उद्दिष्ट आहे, अंतिमत: येणारी सत्ता नुसती लोकप्रिय सत्ता नसून ती लोकसत्ता असेल, हे स्वप्न वास्तवात आणण्याचे काम भूमिसेना इतरांच्या सहकार्याने व आपल्या प्रयत्नाने करील.

तरुण मंडळे आपल्या खर्चाबाबत पूर्णपणे स्वावलंबी आहेत. तथापि ही लोकआंदोलने व लोकसंघटना संघटित करणाऱ्या भूमिसेनेस मात्र बाहेरच्या मदतीची आज तरी गरज भासत आहे. भूमिसेनेच्या खर्चासाठी तरुण मंडळे गावातून भातरूपाने मदत करतात, पण ती मदत भूमिसेनेच्या शिबिरांच्या खर्चासाठी व कार्यकर्त्यांच्या सभांसाठीहि पुरत नाही. मुंबई, पुणे ह्यासारख्या शहरातून काही लोक देणगीरूपाने मदत करतात. साधारणत: तीन ते पाच वर्षांच्या काळात भूमिसेना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होईल असा आमचा अंदाज आहे. तेव्हा भूमिसेना करीत असलेल्या लोकजाणीवा संघटित करण्याच्या, लोकआंदोलने प्रभावी व व्यापक करण्याच्या व लोकसत्ता प्रस्थापित करण्याच्या या प्रयत्नास अनेक मित्रांच्या पाठिंब्यांची व आर्थिक साहाय्याची गरज आहे.

(भूमिसेना, तालुका–पालघर, जिल्हा–ठाणे)

(या अंकातील 'लोकगीतांची मोहनमाळ' या लेखाचे निवेदन व संकलन अनुक्रमे रूमय मनाजी सेमाडोह व भगवान जाधव यांनी केले आहे.)

संवाद

'वन विकास महामंडळाचे मुख्य आधारस्तंभ असलेल्या आदिवासी बांधवांच्या उन्नतीसाठी जे प्रयत्न आपली 'परिषद' व 'हाकारा' करीत आहेत, त्याला मदत करणे हे आमचे एक कर्तव्यच ठरते... सोबत महाराष्ट्र राज्य वन–विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांची सूची पाठवीत आहे. आपण त्यांना 'हाकाराचे' वर्गणीदार होण्यासाठी लिहावे. मी पण त्यांना अलगरित्या तशी सूचना करीत आहे.

मा. य. सोवनी,

कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ मर्यादित, नागपूर.

'हाकारा' चा तिसरा अंक (जुलै-सप्टें. १९८०) मिळाला. त्यामधील १ ते ४ प्रकरणे आम्ही वाचलीत. ती फार उत्तम आहेत. अभिनंदन.

शा. गो. जोशी,

विभागीय वनअधिकारी पूर्वभाग, नाशिक.

'हाकारा' चा अंक मिळाला. आपण एका चांगल्या कार्यास आरंभ केला आहे, त्याबद्दल अभिनंदन. आम्ही परिषद व हाकाराचे सभासद होऊ इच्छितो.

द. वि. घाणेकर,

विभागीय वनअधिकारी डहाणू, जि. ठाणे.

'हाकारा' चा वन संवर्धन विशेषांक वाचला. आमच्या शेतकरी, गुराखी मित्रांनीहि वाचला. लेख आवडले, पण भाषा शहरी वाटली. आदिवासी व वन संवर्धन या संबंधात कार्यकर्त्यांनी खूप विचार, प्रयोग करण्याची वेळ आली आहे.

नयना कुलकर्णी,

कामशेत.

महाविद्यालयाच्या नावावर पाठविलेल्या 'हाकारा' चे वाचन झाले. आदिवासी भागात वेगवेगळे गट संघर्षात्मक व रचनात्मक कार्य करीत आहेत. यात बिगर आदिवासी युवकांचा सुद्धा मोठा भरणा आहे. या सर्वांना परस्परांच्या कार्याची जाणीव व अनुभूति असावी हा दृष्टिकोन समोर ठेवून त्रैमासिक काढण्याचा उपक्रम सुरू केला त्याबद्दल अभिनंदन.

प्रा. एम्. बी. पिसे,

रा. तु. कॉलेज, चिमूर.

'हाकारा' चा दुसरा अंक वाचला आवडला नाही. कारण त्यात खोटरडेपणा व उगाचच भलावण हा प्रकार अतोनात आहे. आपले म. मा. वि. प. थोराथोरांची आहे असे नावावरून वाटते. आपण आणखी नवीन अंक काढलात का ? म्हणजे तेवढीच करमणूक. तुमची, आमची, खोटारडे काम करणाऱ्या ढोंगी कार्यकर्त्यांची वगैरे...

(पत्र-लेखकाने स्वताचे नाव लिहून मग खोडले आहे. पत्र-लेखकांनी स्वतःचे नाव पत्ता लिहिण्याचे धैर्य व प्रामाणिकपणा दाखवावा, तसे निंदा, टीका साधार करावी ही विनंती–संपादक)

आदिवासी विकासाचे व त्यांच्या जीवनाशी निगडीत अशा प्रश्नावर त्रैमासिक काढले, त्याबद्दल आमच्या संघटनेच्यावतीने शुभेच्छा. आमची संस्था सेवाभावी पद्धतीने काम करीत आहे. आमच्या संस्थेस विकासाच्या दृष्टीने त्रैमासिकाचा खूप उपयोग होईल.

बद्रीनाथ कतारे,

सरचिटणीस, आदिम जाती सेवा मंडळ, कुमरखेंडा,

हाकाराच्या वन संवर्धन विशेषांकाच्या संदर्भात आमच्या कार्याची माहिती देऊ इच्छितो. विद्यामंदिर प्रशालेने सांगली जिल्ह्यातील सागरेश्वर अभयारण्यामध्ये वृक्षारोपण व संवर्धन करण्याचे कार्य सामाजिक जबाबदारीच्या भूमिकेतून स्वीकारले आहे. या कामी प्रशालेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक, सेवक व गावातील मान्यवर लोक सहभाग देत आहेत.

या वर्षी सागरोबा डोंगरावर संपन्न झालेल्या 'समाज सेवा शिबिरा' मध्ये सुमारे २०० झाडे लावली. गतवर्षी तेथे शंभर झाडे लावली आहेत. वर्षभर झाडांना खत, माती, पाणी घालण्याचे काम विद्यार्थ्यांनीच केले. संस्थेला 'दत्तक' दिलेल्या चार हेक्टर जागेत येत्या दोन–तीन वर्षात लागवड करण्यात येणार आहे व हे कार्य आम्ही सातत्याने चालू ठेवणार आहोत.

म. वि. साठये,

मुख्याध्यापक, विद्या मंदीर प्रशाला, मिरज.

 सबके दिलमे अंबर है।

छोटूचा खून हा साऱ्या आदिवासी समाजाचा अपमान आहे.

सूलवाडे–सुलतानपूर (जि. धुळे) येथील छोटू **बाबू भील या २७ वर्षाच्या आदिवासीं तरुणाचा भीषण खून करून मालदारवर्गांने हिंसाचाराचा कळस गाठला आहे.**

मजुरांना फसवून, कमी मजुरी देऊन, शोषण करून मालकवर्गांने समाजात नेहमीच छुपी हिंसा चालविली असते. परंतु दशहत निर्माण करण्यासाठी आज पैशांचा, सत्तेचा गर्व झाल्याने आदिवासी, हरिजन व शेतमजूरांवर हल्ले करण्यात मालदारवर्ग राजरोस पुढे सरसावला आहे. पठाणी वॉचमन्सचे हल्ले, बायकांवर अत्याचार, आदिवासींच्या झोपड्या जाळणे, अशा प्रकारातून हा सधन व उच्चवर्णिय शेतमालकवर्ग हिंसा–रक्तपात करत आहे.

या खुनाची जबाबदारी कुणावर आहे ? अशी हिंसा घडत राहीली तर सामाजिक रचना व जीवन शाबूत राहील काय ? भारतीय समाजाविषयी आस्था असणाऱ्या समाजहितैषी व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत व सुबुद्ध नागरिक यांना आम्ही आवाहन करतो की कष्टकरी व मागासवर्गावर लादलेल्या या भीषण हिंसेबाबत त्यानी सक्रीय निषेध करावा आणि या समस्येचा मुकाबला करण्यासाठी गरीबांना मदत करावी.

(ग्राम स्वराज्य समिति, शहादे, यांच्या पत्रकावरून)

"... चळवळीन काम करतांना मनांत वाटते कदाचित उद्या स्वातंत्र्य अन् समतेवर अधिष्ठित समाज निर्माण झाला तर त्यात आपल्या चळवळीचाहि हातभार असेल; निदान त्याच दिशेने समाजाला ढकलण्यात आपली चळवळ कार्यरत आहे. परंतु आता शहादे भागात हिंसाचाराचा डोंब उसळला आहे. पाखरं टिपावी अशा निर्दयतेने खून पाडले जात आहेत. अत्याचाराचे बळी ठरलेल्यांचा आक्रोश बेचैन करतो. कुठले स्वातंत्र्य? कुठली समतेची दिशा ? आम्ही अजूनहि बलप्रयोगाना रोखू शकलो नाही. म्हणजे सारी चळचळ पहिल्याच पायरीवर आहे.

वडाळी (ता. शहादे) येथे प्रातर्विधिला शेतात गेलेल्या आदिवासी स्त्रीला विवस्त्र करून बाहेर ओढण्यात आले. अंगावर काठ्यांचे वळ उठेस्तोवर तिला तशाच अवस्थेत मारहाण करण्यात आली. पोलिसस्टेशनला नोंद होण्यास दहा दिवस लागले.

सुलतानपूरला मराठा–पाटील समाजातील ५ व्यक्तिनी एकुलत्या एक छोटूचा अवघ्या २७ व्या वर्षी भीषण खून करून प्रेत विहिरीत फेकून दिले. आरोपी म्हणून पोलिसांनी पकडले ते एका आदिवासीला, जो कुष्ठरोगी आहे, त्याच्या पंजाला बोटेसुद्धा नाहीत. एका कुरुप आणि हिडीस समाजाचे आपण सदस्य आहोत या भावनेनं ओंजळीत तोंड लपवून रडावेसे वाटते ! सुलतानपूरला छोटूच्या झोपडीत गेलो तेव्हा त्याच्या आईने फोडलेला हंबरडा अजून कानात भरून आहे ..."

–उल्हास राजज्ञ, धुळे

(पान २ वरून)

'हाकारा' त्रैमासिक हिंदी, इंग्रजीतूनहि निघावे, तसेच महाराष्ट्र मानव–विज्ञान परिषदेने नोकरी–धंदे, ज्ञान–विज्ञान आदि बाबतींची माहिती नियमितपणे पुरवावी अशा अनेक मागण्या महाराष्ट्रातील, महाराष्ट्राच्या बाहेरील कार्यकर्त्यांनी आमच्याकडे वैयक्तिक भेटीत केल्या आहेत; परंतु 'हाकारा' कडून नेमके काय अपेक्षित आहे, त्यात कार्यकर्त्यांचा सहभाग काय राहील याबाबत मात्र योग्य तो प्रतिसाद कार्यकर्त्यांकडून अजूनहि पुरेशा प्रमाणात मिळत नाही. हाकाराचे अर्थकारण सांभाळण्याकरता कार्यकर्त्यांनी जास्तीत जास्त वर्गणीदार वाढवावे हे महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर आणखी महत्वाची गोष्ट म्हणजे 'हाकारा' अधिकाधिक कार्यकर्ते, शिक्षक, विद्यार्थी, प्रशासक यांच्या हाती जाणे ही होय. लोकजागृतीचे ध्येय, कार्यकर्त्यांमधील सुसंवाद, ज्ञान–विज्ञानाची जाण व निष्ठा आदि ध्येय–धोरणांची पूर्ति त्याशिवाय होणार नाही.

'हाकारा' त्रैमासिकाचा पहिला अंक जानेवारीत समारंभपूर्वक प्रकाशित झाला. चौथा अंक उशीराने डिसेंबरात प्रकाशित होत आहे. तथापि दलित-आदिवासींच्या प्रश्नास वाहिलेले त्रैमासिक वर्षभर चालेल की नाही, याबाबत बरेच लोक साशंक होते. परंतु वाचक- कार्यकर्त्यांच्या सहकार्याने आम्ही पहिले वर्ष पार केले आहे.

एक वर्षाच्या अनुभवावरून 'हाकारा' सारख्या त्रैमासिकाची आवश्यकता जास्त प्रकर्षाने जाणवते असे आम्हास वाटते. देशातील डावे उजवे पक्ष व आघाड्या निवडणुकीच्या रिंगणाच्या बाहेर येण्यास तयार नाहीत. निवडणुकीच्या राजकारणामुळे राजकीय पक्षांना सर्वसामान्य जनतेच्या साध्या समस्यांकडे लक्ष देण्यास वेळ होत नाही असे दिसते. शासनाने दबावामुळे केलेल्या काही प्रगतिशील कायद्यांच्या अंमलबजावणीचे कार्यक्रम देखील राजकीय पक्ष राबवत नाहीत. त्यामुळे हे पक्ष लोकांपासून दुरावले जात आहेत. परंतु त्याची जाणहि त्यांना नाही असे वाटते. या पार्श्वभूमीवर काही सुशिक्षित झपाटलेले तरूण, आदिवासी भागात जाऊन त्यांच्या रोजच्या समस्यांशी एकरूप होत आहेत. त्यांच्याकरिता शिक्षणाचे, आर्थिक विकासाचे कार्यक्रम राबवत आहेत आणि त्या कार्यक्रमांच्या आड येणाऱ्या हितसंबंधियांविरूद्ध प्रस्थापितांविरूद्ध संघर्षहि करीत आहेत. या कार्यकर्त्यांना आता एकत्र यावयाचे आहे. एकमेकांची आपुलकी, बांधिलकी साधावयाची आहे. 'हाकारा'ला ही आपुलकी बांधावयास आवडेल हे वेगळे सांगावयाची गरज नाही. ■

या अंकाबरोबरच हाकाराची १९८० वर्षासाठीची वार्षिक वर्गणी संपली आहे. १९८१ ची वार्षिक वर्गणी रुपये १५ किंवा हाकारा व मानव विज्ञान परिषदेची संयुक्त वार्षिक वर्गणी रुपये २० मात्र त्वरित पाठवावी.

' हाकारा ' पहिला, जानेवारी १९८० : ' जबरन–जोत जमीन खास विभाग '

१) महाराष्ट्र व मध्य प्रदेश शासनाचे जबरन–जोत (अतिक्रमित) जमीन नियमानुकूल करण्याचे खास आदेश
२) सरकारी आदेशातील त्रुटी – शरद कुलकर्णी
३) जंगल-जमिनीचा प्रश्न – वसुधा धागमवार
४) भारतातील आदिवासी – अनिल गोरे
५) आदिवासी व दलित-मुक्तीची चळवळ – – रावसाहेब कसबे
६) अमळथे आंदोलन – गोविंदराव शिंदे

शिवाय पुस्तक परीक्षण, संस्था परिचय आदि माहितीपूर्ण मजकूर.

' हाकारा ' दुसरा, एप्रिल १९८० : ' आदिवासी व शिक्षण ' खास विभाग

१) आदिवासी आता शिकू लागला – गोविंद गारे
२) विकासवाडीचे विकसते कमळ – अनुताई वाघ
३) आदिवासी मुलांचे शिक्षण व भाषा – गो. म. बोंवले
४) शैक्षणिक मानवशास्त्र – रा. के. मुटाटकर
५) दलित साहित्य – गं. बा. सरदार
६) महाराष्ट्रातील आदिवासी – अनिल गोरे
७) लोक विज्ञान – माधव गाडगीळ
८) विदर्भ आदिवासी साहित्य परिषद – शं. गो. देवगावकर
९) गोदड – वाहरू सोनवणे
१०) आदिवासी मतदार संघातील मतप्रवाह

आणि इतर अभ्यासपूर्ण लेख, शिवाय नेहमीची सदरे.

' हाकारा ' तिसरा, जुलै १९८० : आदिवासी व वन-संवर्धन खास विभाग

१) वृक्षवल्ली आम्हा सोयरी – माधव गाडगीळ
२) ' चिपको ' आंदोलन – जगदीश गोडबोले
३) ' सामूहिक वन-संवर्धना '-द्वारे विकास –
४) प्राचीन वनराजीचे अवशेष – वा. द. वर्तक
५) जंगलच्या राजाला विकासाचे वेध – आ. मा. लेले
६) मानवी प्रगतिची दुसरी बाजू : बिघडते पर्यावरण – शरद कुलकर्णी
७) निसर्ग संतुलनाचा ' राजगड प्रयोग ' – राजेंद्र व्होरा
८) चारशे एकर जंगल-जमीन गडप – मोहन हिराबाई
९) आदिवासी व ग्रामोद्योग – व्ही. के. सावंत
मधमाशा पालन – व. वि. दिवाण
रेशीम उद्योग –
१०) वन-विकास महामंडळाचे कार्य

पुस्तक परिक्षण, संस्था परिचय आदि नेहमीची सदरे.

Registered with the Registrar of Newspapers for India Under No. 35835/80

हाकारा...

(१) आदिवासी व हरिजनांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन (२) कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण (३) शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडविणे (४) मानव विज्ञान, सामाजिकशास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यतः आदिवासींबाबत अभ्यासकांना, एकत्र आणणे (५) मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन व प्रकाशन.

या सर्व उद्देशाने महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशांचे मूर्त स्वरूप म्हणून '**हाकारा**' सुरू करण्यात आला आहे. या कार्यात आपणहि सहभागी होऊ शकता. मानव विज्ञान परिषदेचे सदस्य आणि हाकाराचे वर्गणीदार होऊन !

मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व–

आजीव सभासद	२०० रुपये
सभासद	२० रुपये वार्षिक
आणि	
हाकाराची वार्षिक वर्गणी	१५ रुपये
हाकारा व परिषद यांची संयुक्त वार्षिक वर्गणी	२० रुपये फक्त

आपली सदस्यत्व फी आणि वार्षिक वर्गणी कृपया

महाराष्ट्र मानव-विज्ञान परिषद
मानवशास्त्र विभाग
पुणे विद्यापीठ, पुणे (४११ ००७).

या पत्त्यावर शक्य तेवढ्या लवकर पाठवा.
आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.